१०४ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• मुंबई, मंगळवार २३ जून, २०२६ • वर्ष-१०५, अंक-११०, पाने-८, किंमत: ₹ ७

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 105, Issue - 110 Marathi - Daily - Mumbai, 23 June, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे 24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

महायुतीचा झेंडा पुन्हा फडकला?

navakal.in

@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

# फोडाफोडी, १० लाखांचा पाऊस, फसवणूक! राजकारणाचा चिखल
# महाजनांनी नाटक केले! दराडेंना भाजपानेच पाडले! मविआ सपाट

■ मुंबई

| एकूण जागा | भाजपा | शिंदे गट | अजित पवार राष्ट्रवादी | अपक्ष | मविआ |
|---|---|---|---|---|---|
| १७ | ११ | ३ | २ | १ | ० |

**उमेदवारांना पैशांचे आमिष, मतदारांची १० लाख देऊन फोडाफोडी, फसवणूक आणि विश्वासघात यांचा यथेच्छ वापर झालेल्या विधान परिषद निवडणुकीचा निकाल आज जाहीर झाला. नेत्यांची ही उघड खरेदी-विक्री पाहून महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिकाचे हृदय नक्कीच दुखावले आहे. या निवडणुकीत महायुतीचीच सरशी झाली. तर महाविकास आघाडी भुईसपाट झाली.**



**राजकारणाच्या** या चिखलात नाशिकचा निकाल आणखी धक्कादायक ठरला. भाजपाचे बंडखोर अपक्ष उमेदवार गोकुळ गीते यांनी शिंदे गटाचे उमेदवार नरेंद्र दराडे यांचा दणदणीत पराभव केला. पराभवाने संतापलेल्या दराडे यांनी भाजपाचे संकटमोचक गिरीश महाजन यांच्यासह तिन्ही पक्षांच्या नेत्यांनी आणि मतदारांनी आपला विश्वासघात केल्याचा खळबळजनक आरोप केला. ही जागा शिंदे गटाला सोडली होती. तरीही भाजपाच्या गीते बंधूंनी बंडखोरी करीत उमेदवारी अर्ज भरला. ही बंडखोरी नव्हती तर भाजपाने रचलेले पूर्वनियोजित नाटक होते. गिरीष महाजन नाशिकला बंडखोरी करणाऱ्या गोकुळ आणि गणेश या दोन्ही गीतेंची समजूत काढायला गेले . त्यानंतर गणेश गीते यांनी माघार घेतली. गोकुळ गीते यांनी मात्र माघार घेतली नाही. भाजपाने त्यांच्यावर कारवाईही केली नाही. हा कट आधीच शिजला होता असे आज स्पष्ट झाले. मी प्रयत्न केले असे नाटक महाजन करीत राहिले. पण शिंदेंच्या उमेदवाराला भाजपानेच सुनियोजित पाडले.

नाशिकमध्ये पराभूत उमेदवार नरेंद्र दराडेंचे बंधू आमदार किशोर दराडे निकालानंतर एकनाथ शिंदे यांची भेट घेण्यासाठी तडक मुंबईसाठी रवाना झाले. नाशिकमध्ये विजयासाठी ३०३ मतांचा कोटा निश्चित करण्यात आला होता. महायुतीचे गिरीश महाजन, दादा भुसे आणि उदय सामंत असे तीन मंत्री अधिकृत उमेदवार नरेंद्र दराडे यांच्यासाठी सात-आठ दिवस नाशकात तळ ठोकून बसले होते. गोकुळ गीते यांनी उमेदवारी मागे घ्यावी, यासाठी केलेले प्रयत्न फोल ठरल्यानंतर निवडणुकीआधी शेवटच्या दिवशी एकत्रित पत्रकार परिषद घेत गीते यांनी माघार घेतल्याचे जाहीर केले होते. मात्र तोपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत संपल्यामुळे गीते यांची उमेदवारी कायम राहिली होती. विजयी झाल्यानंतर 'मी प्रचार थांबवतो म्हटले होते, माघार घेतो किंवा महायुतीच्या उमेदवाराला

» पान ७ वर

## अनावश्यक गर्दी कशाला? आशिष देशमुखांची भूमिका

सत्ताधारी महायुतीकडे तीन चतुर्थांशपेक्षाही जास्त संख्याबळ आहे. त्यामुळे आणखी आमदारांची आम्हाला गरज नाही, अनावश्यक गर्दी कशाला हवी, अशी भूमिका भाजपा नेते, नागपूरचे आमदार आशिष देशमुख यांनी आज विधान परिषद निकालांच्या पार्श्वभूमीवर मांडली. सर्व आमदारांना पुरेसा विकास निधी देण्यासाठी आहेत तेवढे आमदार पुरे झाले. आणखी आमदार घेतल्यास पुढे प्रत्येकाला उमेदवारी कशी देणार, असा प्रश्नही निर्माण होईल, असेही देशमुख म्हणाले.

## सहाही खासदार उपस्थित शिंदे सेनेत जाहीर प्रवेश



**उबाठातून बंडखोरी करणाऱ्या ओमराजे निंबाळकर, संजय जाधव, संजय देशमुख, भाऊसाहेब वाकचौरे, संजय दिना पाटील आणि नागेश पाटील आष्टीकर या सहा खासदारांनी आज अखेर एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत अधिकृत प्रवेश केला. त्यामुळे ऑपरेशन टायगर पूर्ण झाले आहे. खासदारांच्या प्रवेशावेळी बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हणाले की, पहिल्या उठावाच्या वेळी ४० आमदार होते. आता दुसऱ्या उठावाच्या वेळी षटकार मारला आहे. शिवसेनेत सहभागी झालेल्या ६ खासदारांच्या मतदारसंघात निधी कमी पडू देणार नाही.**

■ मुंबई

**सहापैकी** संजय जाधव, संजय देशमुख, भाऊसाहेब वाकचौरे आणि नागेश पाटील हे चार बंडखोर खासदार बंडखोरीनंतर प्रथमच मुंबईत आले. मुंबई विमानतळावर उतरल्यानंतर ते कडेकोट सुरक्षेत प्रथम उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नंदनवन या शासकीय निवासस्थानी गेले. संजय दिना पाटील आणि ओमराजे निंबाळकर आधीच तिथे पोहोचले होते. तिथे या खासदारांची दोन तास बैठक झाली. त्यानंतर सर्वजण यशवंतराव चव्हाण सभागृहात पोहोचले. तिथे शिंदे सेनेचे नेते, मंत्री, आमदार, खासदार उपस्थित होते. त्यानंतर खासदारांच्या गळ्यात धनुष्यबाणाचे चिन्ह असलेले उपरणे घालून त्यांचा अधिकृत प्रवेश पार पडला. यावेळी बोलता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले

» पान ७ वर

## कृष्णा आष्टीकरांची उबाठातून हकालपट्टी

उबाठाकडून शिंदे गटात गेलेले हिंगोलीचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांचे पुत्र कृष्णा नागेश पाटील आष्टीकर यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे. कृष्णा यांनी नांदेड मतदार संघातून उबाठाकडून विधान परिषद निवडणूक लढवली होती. पक्षविरोधी कारवायांमध्ये सक्रिय सहभाग असल्याचा ठपका ठेवत पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आल्याची माहिती पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी दिली. खासदार नागेश आष्टीकर बंडखोरी करून शिंदे गटात जाणार असल्याच्या बातम्या आल्यानंतरही कृष्णा यांनी आपण उबाठामध्येच राहाणार असल्याचे जाहीर केले होते. त्यांच्यावर टीका करणाऱ्या उबाठा नेत्या सुषमा अंधारे यांनाही त्यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले होते. आज लागलेल्या विधान परिषद निवडणुकीच्या निकालात त्यांचा पराभव झाला असतानाच उबाठाने त्यांची पक्षातून हकालपट्टी केली.

## फडणवीस सरकारचा नवा विक्रम ९७,००० कोटींच्या पुरवणी मागण्या

■ मुंबई

**मुख्यमंत्री** फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने विधिमंडळात ९७ हजार ७०६ कोटींच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. योजनांचा वाढता खर्च आणि पायाभूत सुविधा प्रकल्पांमुळे राज्याच्या तिजोरीवर मोठा ताण निर्माण होऊन आर्थिक नियोजन कोलमडल्याच्या चर्चेने जोर धरला आहे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा



या पुरवणी मागण्यांपैकी १३ हजार ८२५ कोटी अनिवार्य खर्चासाठी, ६६ हजार ५५९ कोटी विविध योजनांसाठी, तर १७ हजार ३२१ कोटी केंद्र पुरस्कृत योजनांसाठी आहेत. एकूण रक्कम मोठी असली तरी प्रत्यक्ष निव्वळ भार ७४ हजार ८१७ कोटी इतका आहे. यामध्ये 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती' योजनेसाठी २० हजार ५५२ कोटी, वीज वितरण कंपनीच्या कर्जफेडीसाठी १० हजार कोटी, स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी १५ हजार कोटी व 'विकसित भारत' उपक्रमासाठी ७ हजार ३६७ कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

### हे धोकादायक

पुरवणी मागण्या म्हणजे जो खर्च आधी मंजूर झालेला नसतो बजेटमध्ये, तो नवा खर्च दाखवून त्यासाठी निधी थेट मंजूर करतात अधिवेशनात, पुरवणी मागण्या वाढणे हे यामुळेच चांगले लक्षण नाही, कारण हा बजेटमध्ये नियोजित खर्चाच्या पेक्षा अधिकचा खर्च आहे.

## खासदार फुटीनंतर उबाठाच्या बैठकीला ४ आमदारांची दांडी

■ मुंबई

**उबाठाच्या** सहा खासदारांनी बंडखोरी केल्यानंतर पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज आपल्या आमदारांची बैठक बोलावली. मात्र, या बैठकीलाच चार आमदार अनुपस्थित राहिल्याने आता पक्षात आणखी फूट पडणार का, याबाबत चर्चा सुरू झाली आहे.

राज्याच्या पावसाळी अधिवेशनाला पार्श्वभूमीवर आपल्या आमदारांची भूमिका काय असावी या अनुषंगाने उद्धव ठाकरे यांनी आमदारांची बैठक बोलावली होती. ही बैठक आमदार अंबादास दानवे यांच्या 'शिवालय' या शासकीय निवासस्थानी पार पडली. विधानसभेतील आणि विधान परिषदेतील सर्व आमदारांना उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात आले होते. मात्र, बैठकीला विधानसभेतील २० पैकी १६ आमदार उपस्थित होते, तर चार आमदार अनुपस्थित राहिले. अनुपस्थित आमदारांमध्ये संजय पोतनीस, राहुल पाटील, संजय देरकर आणि सुनील शिंदे यांचा समावेश होता. त्यामुळे विविध तर्कवितर्कांना उधाण आले. चर्चा

» पान २ वर

## ठाकूर कुटुंबियांत पहिली फूट हार्दिक राऊत भाजपातून लढणार

■ विरार

**बहुजन** विकास आघाडीचे सर्वेसर्वा हितेंद्र ठाकूर यांच्या कुटुंबियांत पहिली फूट पडली आहे. ठाकूरांचे जवळचे नातेवाईक हार्दिक राऊत हे पालघर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत भाजपाच्या पॅनलतर्फे निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. त्यामुळे हितेंद्र ठाकूर हे राऊत यांच्यावर प्रचंड संतापले असून त्यांच्या हकालपट्टीचे संकेत दिले आहेत.

पालघर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या ११ संचालक पदांसाठी येत्या २७ जून रोजी निवडणूक होणार आहे. या निवडणुकीत हितेंद्र ठाकूर यांची बहुजन विकास आघाडी राष्ट्रवादी शरद पवार गट, शिवसेना (शिंदे) आदींसह सहकार पॅनलच्या माध्यमातून निवडणूक लढवत आहे. त्यांच्यासमोर भाजपा महायुतीचे परिवर्तन पॅनल आहे. मात्र ठाकूर यांच्या कुटुंबातील सदस्य आणि माजी नगरसेवक हार्दिक राऊत हे भाजपाच्या परिवर्तन पॅनलमधून निवडणुकीला उभे आहेत. त्यामुळे ठाकूर कुटुंबियांत फुटीची पहिली ठिणगी पडली आहे. हार्दिक राऊत प्रचार करताना 'एक मत मला द्या अन्य मत कुणालाही द्या' असे सांगत आहेत. सर्व काही दिले तरी बँकेच्या संचालक पदाच्या लालसेपोटी हार्दिक राऊत मतांची भीक मागत आहेत. जे मला सोडून गेले ते गेले. नाती गोती संपली, असे सांगत ठाकूर यांनी कडक शब्दात हार्दिक राऊत यांचा समाचार घेतला.

## शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करा विरोधकांचे पायऱ्यांवर आंदोलन

■ मुंबई

**विधिमंडळात** २०२६ च्या पावसाळी अधिवेशनाला आजपासून सुरुवात झाली. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी शिवरायांच्या प्रतिमेला अभिवादन केले. तर, विरोधकांनी शेतकरी कर्जमाफीच्या मुद्यावरून विधान भवनाच्या पायऱ्यांवर शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करा! या मागणीचे पोस्टर झळकावून आंदोलन केले.




या आंदोलनावेळी विरोधकांनी लबाड लाडगं ढोंग करतंय, कर्जमाफीचं सोंग करतंय, सातबारा कोरा झालाच पाहिजे, अशा घोषणा दिल्या. उबाठा आमदार अंबादास दानवे, आदित्य ठाकरे, काँग्रेस आमदार विजय वडेट्टीवार,सतेज पाटील यांच्यासह मविआ नेते यात

» पान २ वर

## ५ जुलैपर्यंत राज्यभर समाधानकारक पाऊस! पंजाबराव डख यांचे भाकीत

■ अहिल्यानगर

**हवामान** अभ्यासक पंजाबराव डख यांनी राज्यात येत्या काही दिवसांत पावसाचा जोर वाढणार असल्याचा अंदाज व्यक्त केला आहे. विशेषतः अहिल्यानगर जिल्ह्यातील करंजी घाट परिसर आणि पाथर्डी तालुक्यात आज रात्रीपासून जोरदार पावसाला सुरुवात होणार असून हा पाऊस ५ जुलैपर्यंत कायम राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यात विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र व कोकणपट्टी या सर्व भागांमध्ये २२ जूनपासून पावसाचा विस्तार वाढत जाईल. २३ ते २५ जूनदरम्यान पावसाचे क्षेत्र आणखी वाढेल व ५ जुलैपर्यंत राज्यभर समाधानकारक पाऊस पडेल. त्यामुळे शेतकऱ्यांच्या पेरण्या पूर्ण होतील. २ जुलै ते २० जुलैदरम्यान राज्यात काही ठिकाणी अतिवृष्टी होण्याची शक्यता आहे. विशेषतः पुणे जिल्हा, कोकण, मुंबई व उत्तर महाराष्ट्रात जोरदार पावसाचा इशारा आहे. या पावसामुळे जायकवाडी व कोयना धरणांमध्ये पाणीसाठा वाढण्यास सुरुवात होईल. शेतकऱ्यांनी पेरणी करताना जमिनीत पुरेशी ओल (ईदभर) झाल्यानंतरच पेरणी करावी. कमी ओलाव्यात पेरणी केल्यास नुकसान होऊ शकते. जूनमध्ये तुलनेने कमी पाऊस राहील, जुलैमध्ये पावसाचा जोर वाढेल, ऑगस्टमध्ये पाऊस कमी राहील व सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये परतीचा पाऊस राहील, असे भाकीत डख यांनी वर्तवले आहे.

**नीट-युजी २०२६ च्या पेपर फुटीनंतर काल झालेल्या पुनर्परीक्षेदरम्यान डमी विद्यार्थ्यांना परीक्षेला बसवल्याचे गंभीर प्रकरण उघड झाले आहे. बिहारमधील लखीसराय येथे झालेल्या नीट-युजी पुनर्परीक्षेदरम्यान पोलिसांनी एका डमी रॅकेटचा पर्दाफाश केला आहे. या प्रकरणामुळे परीक्षेतील कर्मचारी संगनमत, विद्यार्थ्यांचा सहभाग आणि परीक्षा सुरक्षेबाबत पुन्हा प्रश्न निर्माण झाले आहेत.**

## नीट परीक्षेत 'मुन्नाभाई एमबीबीएस' डमी विद्यार्थ्यांना पेपरला बसवले

■ पटना

'**मुन्नाभाई** एमबीबीएस' चित्रपटात दाखवल्या प्रमाणे उमेदवारांच्या जागी दुसऱ्यांना परीक्षा देण्यासाठी बसवणाऱ्या टोळीचा बिहार पोलिसांनी भांडाफोड केला आहे. पोलिसांच्या मते, ही टोळी उमेदवारांच्या ऐवजी प्रशिक्षित 'सॉल्व्हर'ना परीक्षा देण्यासाठी पाठवत होती. या कारवाईत वैद्यकीय विद्यार्थी आणि परीक्षा प्रक्रियेत सहभागी असलेल्या बायोमेट्रिक कंपनीच्या कर्मचाऱ्यांसह एकूण २४ जणांना अटक करण्यात आली आहे.

### २४ जणांना अटक



पोलिसांच्या संशयानुसार, गया येथील एएनएम मेडिकल कॉलेज अँड हॉस्पिटलचा विद्यार्थी अर्पित राज हा या रॅकेटचा प्रमुख सूत्रधार असू शकतो. २०२४ च्या नीट पेपरफुटी प्रकरणातही त्याची सीबीआयने चौकशी केली होती. याशिवाय, पटना मेडिकल कॉलेज अँड हॉस्पिटलमधील तृतीय वर्षाचा एमबीबीएसचा विद्यार्थी मयंक कश्यप यालाही अटक करण्यात आली आहे. तपासादरम्यान बायोमेट्रिक कंपनीचे १४ कर्मचाऱ्यांनाही अटक करण्यात आले. मयंक कश्यप हा

» पान ७ वर

## कॉकरोच पार्टी आंदोलनाला शेतकरी संघटनेचा पाठिंबा

■ नवी दिल्ली

**नीट पेपरफुटी** प्रकरणाच्या निषेधार्थ कॉकरोच जनता पार्टीचे जंतर-मंतरवरील आंदोलन आज तिसऱ्या दिवशीही सुरू होते. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सुरू असलेल्या या आंदोलनाला भारतीय किसान युनियनसह शेतकरी संघटनांनीही पाठिंबा दिला आहे. विद्यार्थ्यांच्या न्यायाच्या लढ्यात शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन कॉकरोच पार्टीचे संस्थापक अभिजीत दीपके यांनी केले होते.

भारतीय किसान युनियनच्या चरुनी गटाने पाठिंबा देत सांगितले की, देशाला वाचवण्यासाठी आणि चुकीच्या गोष्टींच्या विरोधात कुणी आवाज उठवत असेल, योग्य उद्देशाने लढत असेल तर आम्ही त्याचे समर्थन करतो. आम्ही कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनाचे समर्थन करतो.

## लखनौमध्ये कोचिंग सेंटरच्या आगीत १५ विद्यार्थ्यांचा मृत्यू

■ लखनौ

**लखनौच्या** अलीगंज परिसरातील लर्निंग स्पेस कोचिंग सेंटर आणि कार्यालय असलेल्या तीन मजली इमारतीला दुपारी भीषण आग लागून १५ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला. आगीचा धूर आणि ज्वाळांपासून बचाव करण्यासाठी काही विद्यार्थ्यांनी बाथरूममध्ये आश्रय घेतला, तर अनेकांनी छत आणि बाल्कनीतून उड्या मारल्या. अग्निशमन दल, बचावपथकांनी बचावकार्य केले. या दुर्घटनेत अनेक जण गंभीर जखमी झाले. त्यांना रुग्णालयात दाखल केले. या घटनेची माहिती मिळताच मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी अलीगडमधील नियोजित दौरा अर्धवट सोडून लखनौकडे रवाना झाले. त्यांनी घटनेची दखल घेत तातडीच्या चौकशीचे आदेश दिले आहेत.

अलीगंजमधील पुरानिया परिसरातील या इमारतीत तळमजला व पहिल्या मजल्यावर पाळीव प्राण्यांचे दुकान आणि क्लिनिक होते, तर दुसऱ्या मजल्यावर 'लर्निंग स्पेस' नावाचे कोचिंग सेंटर



आणि 'हेड हॉपर स्टुडिओ' हे निमेशन व गेमिंगसंबंधित कार्यालय आहे. दुपारी अचानक तिसऱ्या मजल्यावर आग लागली आणि काही क्षणांतच संपूर्ण इमारत धूर व आगीच्या ज्वाळांनी वेढली गेली. आग इतक्या वेगाने पसरली की विद्यार्थ्यांना आणि कर्मचाऱ्यांना बाहेर पडण्याची

» पान २ वर

नवाकाळ

Email- contact@navakal.in  www.navakal.in  /navakalofficial

# छोट्या जाहिराती

संपर्क करा
८४२२८१७४४५/८१०८११६४२३

## पाहिजेत

निराधार महिला आणि पुरुषांसाठी केअर टेकर नोकरी (पगार + जेवण + निवास मोफत) घरकुल केअर सेंटर: **9819426634/ 9969529162** {NC260938}

पेस्ट कंट्रोल कंपनीला मुंबई, गोवा, लोणावळा, गुजरातमधील, सहाय्यक, ऑपरेटर, पर्यवेक्षक पाहिजेत. राहण्याची सोय (पगार- १५,०००/-+ बेनिफिट). - **9930016908/ 8291819117** {NC260944}

ETP/ STP/ WTP च्या कामाचा अनुभव असणारे काम करणारे आणि करून घेणारे 5 वर्कींग सुपरवायझर/ टेक्निशियन मेहनती आणि विश्वासू पाहिजे, पगार 30000 शिक्षण 12वी, कमीतकमी 5 वर्षांचा अनुभव आवश्यक, लोअरपरेल **9870569000** {NC261014}

लोन रिकवरी करण्यासाठी ठाणेयेथे मुले, मुली, स्त्री, पुरुष पाहिजेत. **9326370962** {NC260989}

स्क्रीन पेंटिंग राऊंड पेंटर पाहिजे मस्जिद बंदर **9820877126** {NC261007}

कन्स्ट्रक्शन कंपनीच्या साईट वर हाऊसकिपिंग कामासाठी हेल्पर पाहिजेत पगार+ पीएफ+इ एस आय सी+ इतर फायदे. संपर्क- **9967567272** {NC261008}

मुंबईत विलेपार्ले येथे एर्टिगा गाडी चालविण्यासाठी अनुभवी ड्रायव्हर पाहिजे. **9867354944** {NC261009}

गोरेगाव पूर्वयेथे व्हेज/ नॉनव्हेज रेस्टॉरंटसाठी अनुभवी कर्मचारी पाहिजेत- कॅप्टन, किचन मॅनेजर, वेटर्स, किचन हेल्पर्स, टेबल क्लिनिंग बॉय, डिलीव्हरी बॉय, किचन शेफ, फूड पार्सल पॅकींग स्टाफ, कॅशियर/ बिलिंग एक्झिक्युटिव्ह, किचन मोरी स्टाफ. संपर्क: **9833119998** {NC260985}

## पाहिजेत

अनुभवी वायरमन व हेल्पर pahije. वायरमेन पगार 24,000/-. हेल्पर पगार 18,000/- + रेल्वे पास. Mumbai सांताक्रुझ (पूर्व). **9819709886.** {NC261013}

सतगुरू इंटरप्राईज कंपनीकरीता विलेपार्ले येथे नामांकित शाळा आणि कॉलेजमध्ये त्वरित हाऊसकिपिंग सुपरवायझर आणि प्यून पाहिजेत (वयोमर्यादा- 45 वर्षापर्यंत) पत्ता:- 414, ई-विंग, ४ था माळा, झी-शान, opp. सनसिटी सिनेमा, एम.जी. रोड, विलेपार्ले (पूर्व). satguruenterprise1@gmail.com/ **7738144572, 9820426010** {NC261015}

प्युन पाहिजे पिशू ट्रॅव्हेल्स आणि टूर्स. ८४, आनंदीलाल पोद्दार मार्ग, धोबीतलाव मुंबई-२. मो.- **9920207158** {NCC260024}

## Situation Vacant

Wanted experienced Security Guards 8 hour duty at Andheri. Salary 22,222 in hand, Age 25–45 years,10th pass. Contact: **9769733808/ 9920265246**. {NC260990}

## व्यवसायविषयक

स्वतःचा लघुउद्योग सुरू करून दिवसा 3000/- कमवा अनिरुद्धा दादर- **9076403434/ 8652643434** {NC260937}

### वाचकांना सूचना

दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी.

**- मॅनेजर, 'नवाकाळ'**

**पंढरपूरचे शास्त्रीय आणि सुगम संगीत गायक विनोद शेंडगे संगीतकार आणि पंढरपूरच्या अनाहत रेकॉर्डिंग स्टुडिओचे मालक. विनोद हे पंढरपूर येथील संत साहित्याचे अभ्यासक वै.ह.भ.प.सुधाकर शेंडगे हे यांचे चिरंजीव होत. पंढरपुरच्या संगीत विश्वातील एक अग्रेसर नाव म्हणून विनोंद शेंडगे यांच्याकडे पाहिले जाते. गेल्या २५ वर्षांपासून सांगितीक कलेच्या जोरावर येथील प्रत्येक कार्यक्रम शेंडगे यांच्या सूराने जवळ केला आहे.**



# पंढरपूरचे शास्त्रीय आणि सुगम संगीत गायक विनोद शेंडगे

**मुंबई** पुण्यासारख्या मायानगरीनंतर अद्ययावत अशा अनाहत रेकॉर्डिंग स्टुडिओच्या माध्यमातून शेंडगे यांनी आपल्या कलेचा वरचष्मा यापूर्वीच सिध्द केला आहे.

'गाये नाचे उडे आपुलिया
छंदे मनाच्या आनंदे आवडीने।।'

या संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या वचनांनुसार गायनाचे प्रशिक्षण न घेता मनाच्या आवडीने वयाच्या आठव्या वर्षापासून विनोद शेंडगे गाणं गाऊ लागले. हळूहळू अनुभवातून त्यांना राग आणि स्वरांचं ज्ञान होऊ लागले. त्यानंतर त्यांनी गुरूकडून गायनाचे धडे घेतले. मूळचे पंढरपूरमधील असूनही मुंबईतील तुळशीरामबुवा दीक्षित, प्रमोदबुवा दीक्षित, मारुतीबुवा बागडे, खाशाबा कोकाटे या गायनसम्राटांच्या भजन गायकीचे संस्कार शेंडगे यांच्यावर झालेले आहेत. वयाच्या बावीसाव्या वर्षी बडोद्यामध्ये नारायणराव पटवर्धनांकडे जाऊन पाच वर्षे त्यांनी गुरुकुल पद्धतीनं गायनाचं शिक्षण घेतलं. आध्यात्म आणि भारतीय वेदांताचा अभ्यास करण्याची आवड असल्याने दोन वर्षे आळंदीमध्ये राहून भारतीय विद्याभवनची 'किर्तन कोविद' ही पदवी घेऊन किर्तनाच्या माध्यमातून प्रबोधन करण्याची कलाही त्यांनी आत्मसात केली. त्यानंतर बीकॉम करण्यासाठी पुन्हा पंढरपूरमध्ये आले. त्यावेळी डॉ. विकास कशाळकर यांच्या सान्निध्यात राहून शिकताना शब्दब्रम्ह आणि नादब्रह्म हेच आपल्या जीवनाचे ध्येय असल्याची जाणीव त्यांना झाली. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांवर आधारित असलेल्या 'रयतेचा राजा राजा शिवछत्रपती' या नाटकाला पार्श्वसंगीत दिले आहे. पंढरपुरात प्रत्येक गणेशोत्सव मंडळ लाईक डेकोरेशन बनवतं. गणेशोत्सव मंडळाची चार स्कीट्स अशी एकूण दहा मंडळ आहेत. दरवर्षी ते ४०-४५ स्कीट्सचं बॅग्राऊंड परंपरा म्युझिक आणि रेकॉर्डींग करतात. त्यामुळे त्यांना पार्श्वसंगीताचा अनुभव आहे. गाण्यांबाबत बोलायचं तर ते शास्त्रीय गाणी शिकले आहेत. राम कदम, चंद्रशेखर गाडगीळ, यशवंत देव, जयवंत कुलकर्णी, श्रीनिवास खळे यांसारख्या दिग्गजांकडून ते शिकले आहेत.शेंडगे यांचा 'जय जय पांडुरंग हरी' हा टी-सीरिजचा अल्बम गाजला आहे. चंद्रशेखर गाडगीळांच्या 'मूडस ऑफ चंद्रशेखर' मध्येही शेंडगे यांनी गाणी गायली आहेत,

'तू माझा सांगाती' या मालिकेत त्यांनी अभंग गायन केले त्या नंतर आता मात्र शेंडगे यांची भूमिका गायकांवरून थेट संगीत दिग्दर्शकावर येऊन ठेपली आहे. 'साई बाबा-श्रद्धा आणि सबुरी' या मालिकेचे साईराम म्हणा तुम्ही साई श्याम म्हणा... हे मालिकेचं शीर्षक .लोकप्रिय गायक ज्ञानेश्वर मेश्राम आणि सहकाऱ्यांनी गायले असून त्याला संगीत विनोद शेंडगे यांनी दिले आहे. तसेच या मालिकेच्या पार्श्वसंगीतही विनोंद शेंडगे यांनी दिले आहे. या गीतांच्या संगीतामध्ये वारकरी सांप्रदायिक भजनी ठेक्यासह सुफी संगीताचा वापर केला आहे.

तसेच या मालिकेसाठी त्यांनी 'पागल कहलाना...' हे गाणं केलं आहे. याशिवाय कबीरमहाराजांचे दोहे केलेत. हे दोहे संगीतमय रूपात समोर येतील. भारतीय वाद्यं लीडला घेऊन, पार्श्वसंगीतासाठी डफ, चंडा, पखवाज यांचा अधिक वापर केला आहे. याशिवाय सितार, व्हायोलीन, बासरी यांचाही उपयोग केला आहे. कोरसच्या माध्यमातून नोटेशन रूपानं संगीत देण्याचा प्रयोग करत आहे. काही





व्यक्तिरेखांसाठी पाश्चात्य संगीताच्या हिदमच्या जोरावर म्युझिक करायचा विचार आहे.

या मालिकेच्या पार्श्वसंगीता बाबत ते म्हणतात मूळात मी वारकरी संप्रदायाचे असलो तरी साई स्वाध्याय मंडळाच्या माध्यमातून साधारणपणे २० वर्षापूर्वी मी दादा भागवतांच्या साईभक्ती संप्रदायात आलो. तेव्हापासून मला सूफी संगीताचे ज्ञान आहे. साई भवती परंपरेमध्ये आरती साधना हा अतिशय महत्वाचा संगीतप्रकार आहे. दत्त, नाथ आणि सूफी संप्रदायाचं एकत्रिकरण आरतीसाधनामध्ये असल्याचं माझ्या लक्षात आलं. त्याचा उपयोग मला 'साईबाबा' मालिकेला संगीत देताना होत आहे. कारण नाथ संप्रदाय हाच वारकरी संप्रदाय आहे. सूफी आणि भक्तीसंगीत हे एकच आहे. वारकरी फडामधील संगीताचा पायाही शास्त्रीय संगीतावरच आधारित आहे. तोच बेस सूफीमध्येही आहे. त्यामुळे वारकरी असूनही साईभक्तीशी आपल्या संगीताचा मेळ घालणं सोपं गेलं.

# लखनौमध्ये कोचिंग सेंटरच्या आगीत १५ विद्यार्थ्यांचा मृत्यू

पान १ वरून

संधीच मिळाली नाही. अनेकांनी बाल्कनी व छतावरून उड्या मारून स्वतःचा जीव वाचवला. एका विद्यार्थ्याने पहिल्या मजल्यावरून उडी मारली; मात्र तो लोखंडी ग्रीलवर पडल्याने गंभीर जखमी झाला. काही कर्मचारी इमारतीबाहेर लटकलेल्या तारांचा आधार घेत खाली उतरले. आगीची माहिती मिळताच उपमुख्यमंत्री ब्रजेश पाठक यांनी घटनास्थळी पोहोचून बचावकार्याचा आढावा घेतला. त्यांनी सांगितले की, काही विद्यार्थ्यांनी धुरापासून बचाव करण्यासाठी वॉशरूममध्ये आश्रय घेतला होता. त्यामुळे प्रत्येक खोली आणि स्वच्छतागृहाची तपासणी केली. या दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबांना पंतप्रधान मोदी यांनी २ लाख रुपये तर जखमींना ५० हजार रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली आहे.

# पूर्व मुक्त मार्गाचा विस्तार ९४९ बाधित झाडे वाचणार

मुंबई

**मुंबई** महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) राबवत असलेल्या छेडानगर-घाटकोपर-आनंदनगर (ठाणे) पूर्व मुक्त मार्गाच्या (ईस्टर्न फ्रि वे) विस्तारीकरण प्रकल्पाच्या आराखड्यात पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टिकोनातून बदल करण्यात आला आहे. त्यामुळे जुन्या आराखड्यानुसार बाधित होत असलेल्या १,५६६ झाडांपैकी ९४९ झाडे वाचणार आहेत. ३८६ झाडांचे पुनर्रोपण करण्यात येणार असून केवळ ३२० झाडे कापावी लागणार आहेत.

मुंबईतून ठाण्याच्या दिशेने ये-जा करताना वाहनधारकांना प्रचंड वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो.या समस्येवर मात करण्यासाठी छेडानगर ते आनंदनगर या दरम्यान सुमारे १३.९ किलोमीटर लांबीचा पूर्व मुक्त मार्ग विस्तार प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पाच्या संरचनेत तांत्रिक सुधारणा केल्याने बाधित होणाऱ्या झाडांची संख्या कमी करण्यात एमएमआरडीएला यश आले आहे, अशी माहिती एका अधिकाऱ्याने दिली.

# पहिल्याच दिवशी पायऱ्यांवर आंदोलन

पान १ वरून

सहभागी झाले होते. कामकाजाच्या पहिल्या दिवशी आज सुनेत्रा पवार, अक्षय कर्डिले यांनी आमदारकीची शपथ घेतली. काँग्रेस नेते नाना पटोले यांनी या अधिवेशनादरम्यान दुष्काळाच्या मुद्यावर चर्चेची मागणी केली. विधानसभा अध्यक्षांनी याविषयावर चर्चा करण्याचे आश्वासन दिले. यानंतर विधानसभेत विविध प्रख्यात मंडळींच्या निधनावर शोकप्रस्ताव मांडण्यात आला. शोकप्रस्तावानंतर अधिवेशनाच्या पहिल्या दिवसाचे कामकाज स्थगित करण्यात आले.

# खासदार फुटीनंतर उबाठाच्या बैठकीला ४ आमदारांची दांडी

पान १ वरून

सुरू झाल्यानंतर अनुपस्थित आमदारांनी आपापली कारणे स्पष्ट केली. राहुल पाटील यांनी मतमोजणी आणि उद्धव ठाकरे यांच्या दौऱ्याच्या तयारीमुळे उपस्थित राहता आले नसल्याचे सांगितले. सुनील शिंदे यांनी घरातील धार्मिक कार्यक्रमाचे कारण दिले, तर संजय दरेकर यांनी गावी पालखी सोहळ्यामुळे गैरहजर राहिल्याचे कळवले.

या बैठकीला सुनील प्रभू, भास्कर जाधव, अनिल परब, सचिन अहीर यांच्यासह बहुतेक आमदार उपस्थित होते. विशेष म्हणजे, वादानंतर भास्कर जाधव आणि मिलिंद नार्वेकर हे दोघे एकत्र बैठकीत दिसल्याने त्यांच्यातील वादावर मतभेदांवर पडदा पडल्याचे मानले जात आहे. बैठकीत उद्धव ठाकरे यांनी आमदारांना स्पष्ट निर्देश देत, खासदार नेमक्या कोणत्या कारणामुळे फुटले, हे जनतेमध्ये जाऊन सांगा. विधिमंडळात आक्रमक व्हा आणि मतदारसंघातील प्रश्न मार्गी लावा, असे सांगितल्याची माहिती आहे. निधी मिळत नसल्यास विधानसभा अध्यक्षांच्या दालनात जाऊन आंदोलन करण्याचाही सल्ला त्यांनी दिला.



# आजचे राशी भविष्य

मंगळवार ता. २३ जून २०२६
ज्योतिष पंडीत अर्चना तारु

| | |
|---|---|
| मेष | दुपारनंतर महत्त्वाच्या कामांना गती येईल. विरोधकांवर मात करण्यात यश मिळेल. अचानक धनलाभाचे योग. |
| वृषभ | अती धाडस त्रासदायक ठरू शकते. संयमाने वागावे लागेल. बोलण्यावर जाणीवपूर्वक नियंत्रण ठेवणे आवश्यक. जोडीदाराशी मतभेद टाळावेत. |
| मिथुन | कामानिमित्त दूरच्या प्रवासाचे योग येतील. नोकरीत तणावाचे वातावरण राहू शकते. जोडीदाराकडून आर्थिक लाभ होतील. संततीचे सौख्य लाभेल. |
| कर्क | आर्थिक व्यवहार सुरळीत होतील. कार्यक्षेत्रात नवनवीन कल्पना सुचतील. भावंडांचे सहकार्य लाभेल. नोकरीत फायदा होईल. |
| सिंह | नोकरीत कामाची प्रशंसा होईल. नातेवाईकांकडून भेटवस्तू मिळतील. चमचमीत भोजनाचा आस्वाद घ्याल. |
| कन्या | महत्त्वाच्या कामांमध्ये मेहनतीने यश मिळवाल. नोकरीत प्रगती. ओळखी वाढतील. मान मिळेल. |
| तूळ | नवीन गुंतवणूक सावधपणे करा. वैवाहिक जीवनात गैरसमज निर्माण होऊ शकतात. संयम ठेवा. |
| वृश्चिक | नोकरीत सहकाऱ्यांशी पटवून घ्यावे लागेल. प्रवास फायदेशीर ठरतील. वास्तुविषयक कामांमध्ये यश मिळेल. आर्थिक लाभ होतील. |
| धनु | सामाजिक कार्यात पुढाकार घ्याल. जनसंपर्क वाढेल. वडिलधाऱ्यांचे आशीर्वाद लाभतील. |
| मकर | भाग्याची साथ लाभेल. व्यवहार सुरळीत पार पडतील. सामाजिक क्षेत्रात मानसन्मान मिळेल. |
| कुंभ | महत्त्वाच्या कामांमध्ये अचानक अडचणी मनस्ताप देतील. संयम राखा. वाहने जपून चालवा. |
| मीन | व्यवसायात नवीन योजना राबवण्यासाठी प्रयत्नशील राहाल. कौटुंबिक जबाबदारी वाढेल. नोकरीत वरिष्ठांची मर्जी राखण्यात यश मिळेल. |

# लॉटरी

## महाराष्ट्र सागरलक्ष्मी विकली लॉटरी

सोडत दर सोमवारी | तिकीट किंमत रु. 50/- | सोडत क्र. 25 | सोडत दिनांक 22/06/2026

| | |
|---|---|
| पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख | SL-01 : 0461 |
| प्रोत्साहनपर बक्षिस रु. 2500/- (पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी) | 0461 |
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 3335 — अंबिका एजन्सी - दादर, मुंबई; महाराजा असोसिएट्स - इचलकरंजी |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 0423 | 1576 | 1886 | 2724 | 2918 | 3953 | 4431 | 4817 | 4891 | 5122 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1267 | 3420 | 4571 | 6757 | 7478 | 9496 | 9676 | 9728 | 9757 | 9964 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0995 | 1819 | 1922 | 3411 | 4867 | 5923 | 8255 | 8544 | 8798 | 9807 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 3132 | 3321 | 3861 | 5306 | 5381 | 5957 | 6854 | 7055 | 7528 | 7557 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1364 | 2115 | 2883 | 3720 | 4415 | 5353 | 5973 | 6610 | 7307 | 8136 | 8854 | 9560 |
| | | 1375 | 2120 | 2904 | 3731 | 4442 | 5355 | 5996 | 6611 | 7312 | 8140 | 8866 | 9563 |
| | | 1380 | 2131 | 2909 | 3733 | 4453 | 5360 | 6006 | 6616 | 7346 | 8156 | 8873 | 9569 |
| | | 1383 | 2136 | 2910 | 3735 | 4465 | 5428 | 6011 | 6617 | 7375 | 8218 | 8877 | 9584 |
| | | 1410 | 2172 | 2932 | 3804 | 4469 | 5456 | 6044 | 6626 | 7386 | 8231 | 8878 | 9599 |
| 0000 | 0714 | 1422 | 2200 | 2951 | 3810 | 4472 | 5457 | 6060 | 6637 | 7394 | 8241 | 8879 | 9600 |
| 0002 | 0719 | 1424 | 2201 | 2962 | 3833 | 4508 | 5465 | 6061 | 6656 | 7482 | 8277 | 8887 | 9624 |
| 0015 | 0732 | 1450 | 2204 | 3032 | 3839 | 4526 | 5477 | 6067 | 6663 | 7544 | 8310 | 8898 | 9642 |
| 0016 | 0737 | 1511 | 2261 | 3058 | 3873 | 4532 | 5492 | 6068 | 6688 | 7562 | 8313 | 8924 | 9679 |
| 0019 | 0750 | 1512 | 2262 | 3071 | 3926 | 4541 | 5493 | 6074 | 6690 | 7574 | 8328 | 8959 | 9687 |
| 0037 | 0767 | 1518 | 2268 | 3084 | 3932 | 4542 | 5509 | 6079 | 6691 | 7579 | 8331 | 8961 | 9691 |
| 0079 | 0771 | 1519 | 2296 | 3094 | 3951 | 4543 | 5510 | 6086 | 6697 | 7597 | 8343 | 8968 | 9714 |
| 0080 | 0784 | 1551 | 2306 | 3098 | 3953 | 4544 | 5511 | 6115 | 6704 | 7604 | 8362 | 8971 | 9763 |
| 0091 | 0790 | 1560 | 2333 | 3143 | 3966 | 4545 | 5512 | 6176 | 6709 | 7619 | 8381 | 8998 | 9794 |
| 0092 | 0809 | 1628 | 2336 | 3149 | 3967 | 4588 | 5516 | 6181 | 6715 | 7667 | 8408 | 9021 | 9829 |
| 0097 | 0815 | 1644 | 2342 | 3165 | 4015 | 4609 | 5525 | 6185 | 6733 | 7668 | 8435 | 9040 | 9830 |
| 0098 | 0825 | 1678 | 2360 | 3200 | 4024 | 4642 | 5543 | 6196 | 6760 | 7698 | 8448 | 9054 | 9836 |
| 0106 | 0836 | 1711 | 2393 | 3208 | 4043 | 4654 | 5553 | 6221 | 6766 | 7708 | 8458 | 9096 | 9856 |
| 0135 | 0858 | 1715 | 2411 | 3221 | 4052 | 4655 | 5555 | 6224 | 6795 | 7712 | 8490 | 9099 | 9883 |
| 0150 | 0875 | 1721 | 2415 | 3278 | 4067 | 4786 | 5565 | 6226 | 6810 | 7727 | 8505 | 9103 | 9895 |
| 0181 | 0904 | 1733 | 2443 | 3287 | 4074 | 4804 | 5568 | 6236 | 6823 | 7735 | 8508 | 9159 | 9903 |
| 0195 | 0957 | 1781 | 2444 | 3303 | 4096 | 4816 | 5571 | 6252 | 6896 | 7754 | 8524 | 9216 | 9905 |
| 0245 | 1071 | 1782 | 2452 | 3315 | 4143 | 4832 | 5585 | 6298 | 6911 | 7768 | 8538 | 9269 | 9915 |
| 0301 | 1076 | 1801 | 2453 | 3334 | 4147 | 4834 | 5586 | 6328 | 6926 | 7779 | 8547 | 9274 | 9923 |
| 0380 | 1081 | 1804 | 2454 | 3335 | 4154 | 4840 | 5591 | 6344 | 6956 | 7827 | 8598 | 9299 | 9929 |
| 0383 | 1084 | 1811 | 2456 | 3339 | 4164 | 4844 | 5657 | 6356 | 6978 | 7832 | 8604 | 9308 | 9937 |
| 0406 | 1103 | 1815 | 2479 | 3346 | 4174 | 4854 | 5671 | 6361 | 7007 | 7837 | 8624 | 9317 | 9946 |
| 0440 | 1118 | 1818 | 2492 | 3358 | 4192 | 4955 | 5687 | 6369 | 7039 | 7957 | 8644 | 9338 | 9949 |
| 0450 | 1125 | 1821 | 2550 | 3391 | 4221 | 5011 | 5695 | 6382 | 7044 | 7959 | 8661 | 9339 | 9959 |
| 0470 | 1127 | 1871 | 2607 | 3395 | 4246 | 5107 | 5708 | 6392 | 7077 | 7970 | 8669 | 9342 | 9960 |
| 0517 | 1131 | 1906 | 2622 | 3419 | 4251 | 5180 | 5745 | 6424 | 7095 | 7974 | 8674 | 9346 | 9962 |
| 0551 | 1164 | 1930 | 2628 | 3425 | 4252 | 5215 | 5775 | 6436 | 7117 | 7998 | 8682 | 9372 | 9964 |
| 0560 | 1167 | 1940 | 2674 | 3430 | 4254 | 5235 | 5808 | 6458 | 7125 | 8006 | 8698 | 9399 | 9966 |
| 0590 | 1179 | 2002 | 2789 | 3451 | 4269 | 5247 | 5858 | 6459 | 7164 | 8013 | 8711 | 9424 | 9973 |
| 0642 | 1183 | 2010 | 2793 | 3453 | 4284 | 5290 | 5859 | 6478 | 7188 | 8034 | 8732 | 9479 | 9976 |
| 0688 | 1191 | 2015 | 2810 | 3495 | 4291 | 5296 | 5865 | 6484 | 7196 | 8068 | 8770 | 9489 | 9978 |
| 0691 | 1211 | 2055 | 2830 | 3575 | 4293 | 5302 | 5885 | 6514 | 7263 | 8081 | 8783 | 9494 | 9979 |
| 0696 | 1214 | 2064 | 2872 | 3637 | 4339 | 5329 | 5930 | 6576 | 7276 | 8084 | 8787 | 9509 | 9988 |
| 0708 | 1220 | 2076 | 2881 | 3676 | 4354 | 5347 | 5957 | 6594 | 7285 | 8087 | 8798 | 9539 | 9991 |
| 0709 | 1317 | 2086 | 2882 | 3699 | 4388 | 5351 | 5971 | 6596 | 7298 | 8128 | 8823 | 9542 | 9992 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## गणेशलक्ष्मी भाग्यशाली विकली लॉटरी

निकाल | सोडत सायं. 5:00 वाजता
सोडत दर सोमवार • सोडत क्रमांक 25 • तिकिट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 22/06/2026

| | |
|---|---|
| पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- | MG-08 : 9721 |
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 5576 |
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 3500 — श्री एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई |

सर्व मालिकांसाठी - FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES - सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0370 | 1497 | 2482 | 3215 | 4295 | 7531 | 8276 | 8813 | 9108 | 9864 |
| 500/- | 1838 | 2534 | 3189 | 3660 | 4048 | 4803 | 6032 | 6260 | 6810 | 9470 |
| 200/- | 1018 | 2202 | 2782 | 3328 | 5361 | 6598 | 8120 | 8480 | 8532 | 9413 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1484 | 2469 | 3374 | 4484 | 5866 | 6650 | 7757 | 8367 | 8908 |
| | | 1562 | 2479 | 3389 | 4553 | 5870 | 6656 | 7761 | 8436 | 9160 |
| | | 1604 | 2507 | 3392 | 4574 | 5891 | 6664 | 7793 | 8474 | 9173 |
| 0004 | 0500 | 1610 | 2582 | 3401 | 4797 | 6071 | 6829 | 7836 | 8481 | 9339 |
| 0007 | 0519 | 1679 | 2592 | 3455 | 4842 | 6081 | 6832 | 7846 | 8482 | 9429 |
| 0029 | 0524 | 1686 | 2653 | 3525 | 4965 | 6166 | 6849 | 7928 | 8483 | 9548 |
| 0034 | 0584 | 1721 | 2692 | 3554 | 4981 | 6306 | 6956 | 7977 | 8519 | 9597 |
| 0040 | 0600 | 1739 | 2760 | 3555 | 5175 | 6345 | 6962 | 7978 | 8543 | 9664 |
| 0077 | 0646 | 1784 | 2892 | 3579 | 5180 | 6361 | 6992 | 7979 | 8546 | 9679 |
| 0130 | 0713 | 1828 | 2922 | 3636 | 5193 | 6375 | 7037 | 7987 | 8628 | 9696 |
| 0140 | 0721 | 1868 | 2937 | 3859 | 5332 | 6390 | 7059 | 7990 | 8708 | 9703 |
| 0164 | 0908 | 2170 | 2945 | 3890 | 5528 | 6492 | 7157 | 8046 | 8714 | 9705 |
| 0202 | 0924 | 2212 | 3132 | 3922 | 5565 | 6498 | 7168 | 8141 | 8780 | 9789 |
| 0204 | 0962 | 2225 | 3154 | 3988 | 5591 | 6551 | 7227 | 8158 | 8804 | 9792 |
| 0230 | 1015 | 2267 | 3218 | 4089 | 5638 | 6562 | 7236 | 8188 | 8808 | 9832 |
| 0438 | 1048 | 2280 | 3225 | 4098 | 5672 | 6572 | 7273 | 8229 | 8813 | 9899 |
| 0443 | 1061 | 2368 | 3235 | 4133 | 5728 | 6592 | 7358 | 8248 | 8815 | 9947 |
| 0449 | 1091 | 2415 | 3268 | 4159 | 5780 | 6617 | 7409 | 8268 | 8863 | 9952 |
| 0460 | 1200 | 2421 | 3342 | 4263 | 5788 | 6621 | 7527 | 8275 | 8865 | 9961 |
| 0477 | 1308 | 2429 | 3362 | 4407 | 5798 | 6634 | 7567 | 8311 | 8892 | 9977 |
| 0488 | 1481 | 2437 | 3363 | 4418 | 5845 | 6642 | 7751 | 8344 | 8907 | 9997 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## महाराष्ट्र सह्याद्री

महाराष्ट्र राज्य लॉटरी • धनलक्ष्मी विकली लॉटरी •
निकाल | सोडत सायं. 4:30 वाजता
सोडत दर सोमवार • सोडत क्रमांक 25 • तिकिट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 22/06/2026

| | |
|---|---|
| पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- | SL-08 : 6140 |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 0303 | 1194 (हरी श्री लॉटरी सेंटर, नालासोपारा) | 1364 (श्री गणेश एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई) | 2484 (किशोर लॉटरी सेंटर, सांगली) | 5218 | 5971 | 7805 | 7902 | 8372 | 9928 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0416 | 3168 | 3260 | 3833 | 5094 | 7147 | 7416 | 8495 | 9509 | 9774 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0116 | 0464 | 1106 | 1227 | 1297 | 2272 | 4792 | 5064 | 5588 | 9902 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 0650 | 1451 | 3073 | 4488 | 5505 | 6631 | 7443 | 8834 |
| | 0698 | 1862 | 3231 | 4589 | 5541 | 6649 | 7474 | 8858 |
| 0002 | 0709 | 1973 | 3235 | 4645 | 5559 | 6689 | 7475 | 8882 |
| 0097 | 0895 | 2128 | 3309 | 4723 | 5762 | 6770 | 7620 | 8958 |
| 0103 | 0902 | 2214 | 3369 | 4737 | 5823 | 6859 | 7741 | 8997 |
| 0107 | 0914 | 2222 | 3403 | 4852 | 5898 | 6876 | 7875 | 9021 |
| 0222 | 0953 | 2226 | 3636 | 4860 | 6168 | 6919 | 8080 | 9296 |
| 0237 | 1060 | 2246 | 3835 | 4881 | 6199 | 6950 | 8200 | 9306 |
| 0354 | 1064 | 2290 | 3905 | 4918 | 6234 | 7265 | 8435 | 9703 |
| 0459 | 1104 | 2387 | 3982 | 4946 | 6263 | 7279 | 8489 | 9719 |
| 0502 | 1166 | 2808 | 4249 | 5003 | 6296 | 7306 | 8571 | 9913 |
| 0547 | 1334 | 2822 | 4323 | 5190 | 6492 | 7315 | 8807 | 9926 |
| 0625 | 1414 | 2916 | 4418 | 5368 | 6614 | 7370 | 8827 | 9997 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# शुभ राशी ता. २३/६/२०२६

| | | |
|---|---|---|
| १ | ६ | ४ |
| १३ | ६३ | ४३ |
| १८ | ६८ | ४८ |
| १४६ | १६९ | १४९ |
| २९० | ४० | ३४७ |

# मुंबई-गोवा महामार्गावर अपघात दोन सख्ख्या बहिणींचा मृत्यू

सावंतवाडी

**मुंबई-** गोवा महामार्गावर झाराप-पत्रादेवी मार्गावरील नेमळे -ऐरडोकवाडी येथे आज दुपारी झालेल्या भीषण अपघातात दोन सख्ख्या बहिणींचा मृत्यू झाला. गोव्याहून कणकवलीच्या दिशेने चाललेल्या कारच्या चालकाला अचानक डुलकी लागल्याने कार भरवेगात महामार्गालगतच्या सुमारे वीस फूट खोल दरीत कोसळली. या अपघातात कारने तीन कोलांट्या खाल्ल्याने गाडीचा चक्काचूर झाला. कारमधील दोन बहिणींचा जागीच मृत्यू झाला. तर अन्य तिघेजण गंभीर जखमी झाले आहेत. कणकवली तालुक्यातील भिरवंडेतील विलासिनी सातार्डेकर या काही दिवसांपूर्वी गोव्याला आपल्या बहिणीकडे गेल्या होत्या. विलासिनी यांना भिरवंडेला सोडण्यासाठी त्यांची बहीण, तिचे पती व कुटुंबीय कारने कणकवलीच्या दिशेने दुपारी १ वाजता गोव्याहून निघाले. अर्ध्या तासातच त्यांच्या गाडीला अपघात झाला.

## महाराष्ट्र गजलक्ष्मी सोम विकली लॉटरी

महाराष्ट्र राज्य लॉटरी
निकाल | सोडत संध्या. 4:45 वाजता
सोडत दर सोमवार • सोडत क्रमांक 25 • तिकिट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 22/06/2026

| | |
|---|---|
| पहिले बक्षिस रु. 10,000/- | GL-03 : 5849 — डायमंड कॉर्पोरेशन, बोरिवली |

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 0313 | 1406 | 2429 | 2684 | 3168 | 3355 | 6099 (किशोर लॉटरी सेंटर, सांगली) | 6694 | 8037 | 8378 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 1441 | 3005 | 3302 | 4444 | 4582 | 5080 | 8818 | 9399 | 9748 | 9816 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0952 | 1255 | 1376 | 6431 | 6899 | 7620 | 7947 | 8582 | 9508 | 9966 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 1337 | 1982 | 2503 | 5153 | 5375 | 5542 | 5627 | 7288 | 8066 | 9375 |

सहावे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1415 | 2224 | 2932 | 3699 | 4541 | 5570 | 6746 | 7676 | 8386 | 9379 |
| | | 1417 | 2235 | 2937 | 3796 | 4641 | 5584 | 6805 | 7727 | 8484 | 9396 |
| 0001 | 0699 | 1423 | 2237 | 2972 | 3811 | 4704 | 5585 | 6839 | 7757 | 8509 | 9452 |
| 0005 | 0705 | 1481 | 2243 | 3043 | 3833 | 4735 | 5595 | 6857 | 7761 | 8512 | 9573 |
| 0020 | 0730 | 1520 | 2251 | 3108 | 3854 | 4813 | 5735 | 6944 | 7773 | 8608 | 9687 |
| 0027 | 0909 | 1655 | 2311 | 3124 | 3877 | 4828 | 5753 | 6964 | 7784 | 8638 | 9712 |
| 0070 | 0974 | 1680 | 2392 | 3189 | 3961 | 4862 | 5853 | 7037 | 7791 | 8648 | 9734 |
| 0097 | 1096 | 1696 | 2450 | 3223 | 4082 | 4941 | 5933 | 7050 | 7822 | 8671 | 9739 |
| 0108 | 1124 | 1813 | 2464 | 3251 | 4129 | 5031 | 6086 | 7157 | 7880 | 8682 | 9781 |
| 0131 | 1135 | 1816 | 2520 | 3264 | 4200 | 5071 | 6104 | 7169 | 7897 | 8686 | 9799 |
| 0326 | 1181 | 1820 | 2521 | 3283 | 4214 | 5098 | 6153 | 7176 | 7917 | 8718 | 9803 |
| 0366 | 1215 | 1927 | 2584 | 3303 | 4242 | 5115 | 6176 | 7198 | 7947 | 8868 | 9817 |
| 0396 | 1217 | 2012 | 2623 | 3341 | 4247 | 5157 | 6238 | 7262 | 7969 | 8872 | 9819 |
| 0406 | 1231 | 2023 | 2624 | 3344 | 4280 | 5181 | 6271 | 7332 | 8035 | 8875 | 9828 |
| 0440 | 1232 | 2026 | 2627 | 3348 | 4394 | 5264 | 6445 | 7392 | 8080 | 8899 | 9833 |
| 0447 | 1235 | 2084 | 2648 | 3395 | 4423 | 5265 | 6456 | 7427 | 8089 | 8924 | 9901 |
| 0458 | 1240 | 2117 | 2713 | 3451 | 4431 | 5347 | 6461 | 7442 | 8158 | 8982 | 9904 |
| 0468 | 1261 | 2133 | 2730 | 3497 | 4433 | 5450 | 6562 | 7479 | 8171 | 9191 | 9910 |
| 0484 | 1278 | 2165 | 2771 | 3500 | 4445 | 5495 | 6608 | 7500 | 8243 | 9271 | 9921 |
| 0497 | 1315 | 2211 | 2822 | 3631 | 4472 | 5516 | 6619 | 7526 | 8249 | 9299 | 9931 |
| 0542 | 1366 | 2212 | 2828 | 3638 | 4489 | 5522 | 6642 | 7614 | 8338 | 9323 | 9959 |
| 0592 | 1369 | 2216 | 2925 | 3642 | 4531 | 5563 | 6674 | 7644 | 8365 | 9354 | 9970 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# मोठ्या गृहसंकुलांना कचऱ्यावर प्रक्रिया बंधनकारक

■ वसई

**नवीन** घनकचरा अधिनियमानुसार दैनंदिन १०० किलोपेक्षा जास्त कचरा जमा होणार्या गृहसंकुलांना स्वत: कचर्याची विल्हेवाट लावणे बंधनकार करण्यात आले आहे. यासाठी वसई विरार महापालिकेने शहरातील १ हजार मोठी गृहसंकुले, हॉटेल आणि अन्य आस्थापनांची यादी तयार केली.

केंद्र शासनाने नवीन घनकचरा अधिनयमन लागू केला आहे. त्यानुसार ज्या गृहसंकुलात आणि आस्थापनात दररोज १०० किलोपेक्षा जास्त कचरा निघतो त्यांना घाऊक कचरा निर्माते (बीडब्लूजी) असे संबोधण्यात येणार आहे. अशा संकुलांना

## यादी तयार

आपल्या आवारातच कचर्यावर कंपोस्टिंग, बायोमिथनायझेशन किंवा अन्य तंत्रज्ञानाद्वारे प्रक्रिया करावी लागणार आहे. यासाठी पालिकेने शहरातील १ हजारांहून अधिक संकुलांची यादी तयार केली आहे. ज्या आस्थापना या नियमांचे पालन करणार नाही त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली जाईल. १ जुलै पासून या मोठ्या गृहसंकुलांचा दैनंदिन कचरा उचलला जाणार नाही, असे पालिकेने स्पष्ट केले आहे. पालिकेच्या पॅनलवर असेलल्या खासगी संस्थामार्फत मोठ्या गृहसंकुलांना या कर्चय़ावर प्रक्रिया करता येणार आहे. मात्र अशा गृहसंकुलांवर थेट कारवाई न करता आधी जनजागृती केली जाईल. त्यांना मालमत्ता करात सवलत दिली जाईल.

# स्मार्ट मीटरच्या सक्तीविरोधात लोणावळ्यात बाजारपेठ बंद

■ लोणावळा

**स्मार्ट** मीटरच्या सक्तीविरोधात लोणावळ्यात आज बंद पाळण्यात आला. लोणावळा व्यापारी संघटनेच्या नेतृत्वाखाली सर्वपक्षीय नेते, व्यापारी आणि नागरिकांनी या बंदला पाठिंबा दिल्याने शहरातील बाजारपेठा कडकडीत बंद राहिल्या. भरमसाठ वीजबिले, वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा आणि स्मार्ट मीटर सक्तीच्या निर्णयामुळे नागरिकांन निषेध व्यक्त केला. या बंदमुळे शहरातील बहुतांश व्यवहार ठप्प झाले होते. व्यापाऱ्यांनीही स्वयंस्फूर्तीने दुकाने बंद ठेवत आंदोलनाला पाठिंबा दिला. नागरिकांनी स्मार्ट मीटरमुळे वीजदर वाढण्याची भीती व्यक्त करत हा निर्णय तातडीने मागे घ्यावा, अशी मागणी केली.

# कर्जमाफी योजनेवरून रोहित पवारांचा २९ जूनला महाआंदोलनाचा इशारा



■ मुंबई

**राज्य** सरकारने जाहीर केलेल्या कर्जमाफी योजनेतील अटी-शर्तीवरून सध्या राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी या मुद्यावरून राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. सरकारने शेतकऱ्यांचा विश्वासघात केला असून, ही कर्जमाफी योजना पूर्णपणे फसवी असल्याचा घणाघाती आरोप त्यांनी केला आहे. तसेच, येत्या २९ जून रोजी छत्रपती संभाजीनगर येथे महाविकास आघाडीच्या वतीने महाआंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

रोहित पवार यांनी पंढरपूर येथे शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरून केलेल्या अन्नत्याग आंदोलनाचा संदर्भ देत सरकारवर गंभीर आरोप केले. ते म्हणाले की, पंढरपूरमध्ये २६ शेतकऱ्यांसह आम्ही अन्नत्याग आंदोलन केले होते. त्यावेळी सरकारच्या वतीने मंत्री गिरीश महाजन यांनी स्वतः फोन करून आंदोलन मागे घेण्याची विनंती केली आणि २२ तारखेपूर्वी तातडीने बैठक घेऊन शेतकऱ्यांचे प्रश्न ऐकण्याचे आश्वासन दिले होते. मात्र सरकारने तो शब्द पाळला नाही, हा थेट शेतकऱ्यांचा विश्वासघात आहे. या योजनेत इतक्या जाचक अटी घालण्यात आल्या आहेत की, सुमारे ४४ लाख शेतकरी या कर्जमाफीपासून वंचित राहणार आहेत. राज्यातील ५५ लाख शेतकऱ्यांपैकी फक्त मोजक्याच शेतकऱ्यांना याचा लाभ होणार आहे. ही योजना केवळ नावापुरती असून प्रत्यक्षात शेतकऱ्यांना बाहेर ठेवण्याचे काम करण्यात आले आहे. सरकार फसवे आकडे दाखवून जनतेची दिशाभूल करत आहे. २९ जून रोजी छत्रपती संभाजीनगर येथे महाविकास आघाडीच्या वतीने मोठे आंदोलन करण्यात येणार आहे.

# पनवेल पालिकेचा मालमत्ता कर संकलनाचा १०० कोटींचा टप्पा पार

■ पनवेल

**पनवेल** महानगरपालिकेच्या कर संकलन विभागाने चालू आर्थिक वर्षात उल्लेखनीय कामगिरी करत मालमत्ता कर संकलनात १०० कोटी रुपयांचा महत्त्वपूर्ण टप्पा पार केला आहे.

महानगरपालिकेकडून मालमत्ता कर भरण्यासाठी नागरिकांना सातत्याने आवाहन करण्यात येत असून ऑनलाइन तसेच ऑफलाइन पद्धतीने कर भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या आवाहनाला नागरिकांचा सकारात्मक प्रतिसादामुळे आतापर्यंत एकूण ८३ हजार ५२ मालमत्ताधारकांनी १०२ कोटी रुपये मालमत्ता कर भरून महानगरपालिकेला सहकार्य केले आहे. पनवेल महानगरपालिकेच्या मालमत्ता कर संकलन मोहिमेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. पालिकेच्या कर संकलन विभागाने २०२६-२७ या आर्थिक वर्षात जून महिन्यातच १०० कोटींचा महत्त्वपूर्ण टप्पा पार केला आहे.

# पुणे पालिकेत विरोधी पक्षांच्या नगरसेवकांच्या डोक्यावर हेल्मेट

■ पुणे

**पुणे** महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत गेल्या आठवड्यात झालेला वाद आता चांगलाच पेटला. सत्ताधारी भाजपा नगरसेवकांच्या कथित राड्याच्या निषेधार्थ आज विरोधी पक्षांनी महापालिकेत आक्रमक पवित्रा घेतला. काँग्रेस आणि शरद गटाच्या नगरसेवकांनी खांद्याला काळ्या पट्ट्या बांधून महापालिकेच्या पायऱ्यांवर आंदोलन केले. त्यानंतर या नगरसेवकांनी डोक्यावर चक्क 'सेफ्टी हेल्मेट' घालून सभागृहात प्रवेश केल्याने सर्वांच्याच भुवया उंचावल्या. मागील आठवड्यात बुधवारी झालेल्या सर्वसाधारण सभेमध्ये पुणे शहराच्या पाणी प्रश्नावर चर्चा सुरू होती. यावेळी शरद गटाचे नगरसेवक गफूर पठाण हे आपले मत मांडत होते. भाषण करताना पठाण यांनी बोपोडी येथील दर्गा महापालिकेच्या वतीने पाडण्यात आल्याचा मुद्दा उपस्थित केला. या मुद्यावरून सभागृहातील वातावरण अचानक तापले. भाजपाचे नगरसेवक आक्रमक झाले आणि ते थेट गफूर पठाण यांच्या दिशेने धावून गेले. या घटनेचा निषेध करण्यासाठी आज काँग्रेस नगरसेवकांनी अनोखे उपहासात्मक आंदोलन केले. भाजपाचे नगरसेवक थेट अंगावर धावून येतात, त्यांच्यापासून आम्हाला संरक्षण मिळावे, यासाठी आम्ही हे सेफ्टी हेल्मेट घातले आहे, अशी खोचक टीका काँग्रेस नगरसेवकांनी केली.

# पुण्यातील बाबा भिडे पूल ६ जुलैपर्यंत बंद

■ पुणे



**पुणे** शहराच्या मध्यवर्ती भागातील वाहतुकीसाठी महत्त्वाचा असलेला बाबा भिडे पूल ६ जुलैपर्यंत सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहे. डेक्कन जिमखाना मेट्रो स्थानकाजवळ सुरू असलेल्या पादचारी पुलाच्या बांधकामामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे.

पुणे मेट्रो प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार, मेट्रो स्थानक आणि भिडे पूल यांना जोडणाऱ्या पादचारी पुलाचे काम अंतिम टप्प्यात असून ते सुरक्षितपणे पूर्ण करण्यासाठी पुलावरील वाहतूक तात्पुरती बंद करण्यात आली आहे. सध्या या ठिकाणी मोठ्या लोखंडी संरचना उभारण्याचे काम वेगाने सुरू आहे. दरम्यान, ७ जुलैपासून पुढील आदेश येईपर्यंत पुलावरील वाहतूक पूर्ण क्षमतेने सुरू होणार नसून, दररोज रात्री ११ ते सकाळी ६ वाजेपर्यंत वाहतुकीवर निर्बंध कायम राहणार आहेत. दिवसा वाहतूक सुरू ठेवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

# साताऱ्यातील ढेबेवाडी विभागात पाणीटंचाई



■ सातारा

**साताऱ्यातील** ढेबेवाडी विभागातील वांग-मराठवाडी आणि महिंद धरणांनी तळ गाठल्याने परिसरात भीषण पाणीटंचाई निर्माण झाली आहे. एप्रिल-मे महिन्यात वळीव पावसाने साथ न दिल्याने आणि पावसाळा लांबल्याने परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत आहे.

सध्या बंधारे, विहिरी, कूपनलिका तसेच ओढे-नाले पूर्णपणे कोरडे पडले असून पिण्याच्या पाण्यासह शेतीसाठी पाण्याचा प्रश्न तीव्र झाला आहे. विशेषतः वाल्मिकी पठार परिसरात महिलांना दररोज दोन-तीन किलोमीटर अंतर चालत जाऊन पाणी आणावे लागत आहे. धरणांतील पाणीसाठा अत्यल्प झाल्याने नदीपात्रही कोरडे पडले आहे. परिणामी, विहिरींनी तळ गाठला असून अनेक कूपनलिका बंद पडल्या आहेत. याचा थेट परिणाम शेतीवर होत असून पिके करपली आहेत. शेतकऱ्यांसमोर मोठे आर्थिक संकट उभे ठाकले आहे. जनावरांसाठी पाणी व चाऱ्याचा तुटवडा निर्माण झाला असून ओला चारा संपला आहे. धरण परिसरात पाण्यासाठी भटकणारी जनावरे गाळात अडकण्याच्या घटनाही समोर येत आहेत. पक्षी आणि वन्यप्राणीही पाण्याच्या शोधात मानवी वस्तीकडे वळत असल्याने चिंतेचे वातावरण आहे.

# पावसाला विलंब! द्राक्षपंढरी चिंतेत रोपवाटिका व्यवसायावर परिणाम

■ नाशिक

**जूनचा** तिसरा आठवडा सुरू होऊनही मान्सूनने अद्याप हजेरी लावलेली नसल्याने खरीप हंगामातील पेरण्या खोळंबल्या आहेत. याचा फटका द्राक्षपंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या निफाड तालुक्यातील द्राक्ष रोपवाटिका व्यवसायालाही बसत असून शेतकरी व व्यावसायिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

सध्या लाखो द्राक्ष हुंड्यांसाठी पिशव्या मातीने भरून तयार ठेवण्यात आल्या आहेत. मात्र, आवश्यक असलेल्या रूटस्टॉकची वाढ पावसाअभावी मंदावल्याने ते वेळेत उपलब्ध होणार का, याबाबत शंका व्यक्त केली जात आहे. परिणामी, नवीन द्राक्ष लागवडीबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे. दरवर्षी निफाड तालुक्यात मोठ्या प्रमाणावर द्राक्ष हुंडी उत्पादन केले जाते.

# परळमधील डॉ. शिरोडकर मंडईचा पुनर्विकास पालिका ४८ मजली इमारत उभारणार

■ मुंबई

**परळ** येथील मुंबई महापालिकेच्या मालकीच्या डॉ. शिरोडकर मंडईचा बहुप्रतीक्षित पुनर्विकास अखेर मार्गी लागला आहे. मंडईच्या जागेवर अत्याधुनिक सुविधा असलेली तळमजला अधिक ४८ मजली इमारत उभारण्यात येणार असून यासाठी नव्या कंत्राटदाराची नियुक्ती केली आहे. या प्रकल्पावर मुंबई महापालिका २९७.९२ कोटी रुपये खर्च करणार आहे. या संदर्भातील प्रस्तावावर २४ जून रोजी होणाऱ्या स्थायी समितीच्या बैठकीत चर्चा होण्याची शक्यता आहे.

आधी प्रस्तावित असलेले २१ मजली बांधकाम पूर्ण करून त्यासोबतच उर्वरित भूखंडावर तळघरासह ४८ मजली नवी इमारत उभारली जाणार आहे. या प्रकल्पात आधुनिक मंडई, वाहनतळ, सीसीटीव्ही कॅमेरे, अग्निशमन यंत्रणा आणि इतर अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. महापालिकेने मागवलेल्या निविदांमध्ये तीन कंपन्यांनी सहभाग घेतला होता. त्यापैकी कुणाल-हिराणी संयुक्त भागीदारी कंपनीने उणे १५.२९ टक्के दराने सर्वात कमी बोली लावल्याने तिची निवड झाली आहे. या प्रकल्पासाठी मूळ कंत्राटाची किंमत २३९.५० कोटी रुपये आहे.

# अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार पालिका मुख्यालयाबाहेर आंदोलन

■ भाईंदर

**अल्पवयीन** मुलीवरील लैंगिक अत्याचार प्रकरणाच्या निषेधार्थ सोमवारी सर्व विरोधी पक्षांनी मिरा-भाईंदर महानगरपालिका मुख्यालयाबाहेर ठिय्या आंदोलन केले.

भाईंदरमध्ये एका अल्पवयीन मुलीवर झालेल्या लैंगिक अत्याचारामुळे राजकीय वातावरण पेटले आहे. याप्रकरणी महिला व बालकल्याण समितीच्या सभापती तथा भाजपा नगरसेविका अनिता पाटील यांच्या दोन भावांना अटक करण्यात आली आहे. या घटनेच्या निषेधार्थ विरोधी पक्षांनी महापालिका मुख्यालयाबाहेर ठिय्या आंदोलन केले. यावेळी आंदोलकांनी आरोपींना फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली. पीडितेला न्याय द्या, असे सांगत अनिता पाटील यांच्या विरोधात घोषणा देण्यात आल्या. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

# एसआयआर कामातून तातडीने मुक्त करा शिक्षक भारती आंदोलन करणार

■ मुंबई

**शिक्षक** व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना बीएलओ आणि एसआयआरसारख्या अशैक्षणिक कामांतून तातडीने मुक्त करावे, या मागणीसाठी शिक्षक भारतीने आंदोलनाचा इशारा दिला आहे. प्रशासनाने पुढील ८दिवसांत चर्चा करून सकारात्मक निर्णय घेतला नाही, तर राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असे शिक्षक भारतीचे कार्याध्यक्ष सुभाष मोरे यांनी स्पष्ट केले. शिक्षकांवर वाढत्या अशैक्षणिक कामांचा ताण पडत असून त्यामुळे अध्यापनावर परिणाम होत असल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

बीएलओ ड्युटी अन्याय निवारण मंचच्या वतीने गोरेगाव येथील नंदादीप हायस्कूलमध्ये संस्थाचालक, मुख्याध्यापक, शिक्षक संघटना आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची जाहीर सभा आयोजित केली होती. या सभेत विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी शिक्षकांवर वाढत्या अशैक्षणिक कामांच्या ओझ्याबद्दल नाराजी व्यक्त केली. यावेळी मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी सरकारवर जोरदार टीका केली. शाळा सुरू झाल्यानंतर विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याऐवजी शिक्षकांना अशैक्षणिक कामांमध्ये गुंतविणे योग्य आहे का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. शिक्षकांनी नीतिमत्तेच्या चौकटीत राहून अध्यापन करण्याची मागणी केल्याबद्दल त्यांच्यावर तक्रार दाखल करण्याच्या कृतीवरही त्यांनी आक्षेप घेतला तर शिक्षण मंडळ, गोरेगावचे उपाध्यक्ष गिरीश सामंत यांनी बीएलओ ड्युटीविरोधात न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेची माहिती देत या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी न्यायालयीन लढ्यात सहभागी होण्याचे आवाहन केले.

# नळजोडणीसाठी घराचे प्रतिज्ञापत्र द्या पालिकेच्या अटीमुळे ग्रामस्थ संतप्त

■ वसई

**वसई**-विरार महापालिकेने गावांना नळजोडणी देण्यासाठी जाचक अटी लागू केल्या. घर अधिकृत की अनधिकृत आहे, त्याचे प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक केले आहे. यामुळे ग्रामस्थांमध्ये संताप पसरला आहे.

वसईच्या पश्चिम पट्ट्यातील गावांना महापालिकेचे पाणी मिळाले नव्हते. सूर्या प्रकल्पातील अतिरिक्त पाणी आल्यानंतर गावांना पाणी देण्यात येणार आहे. मात्र त्यासाठी महापालिकेने जाचक अटी लागू केल्या आहेत. सर्वात संतापाची बाब म्हणजे घरे अधिकृत आहे की अनधिकृत, याचे प्रतिज्ञापत्र सादर करण्यास सांगण्यात आले आहे. गावातील घरे ग्रामपंचायत काळापासूनची आहे. त्यामुळे या घरांना भोगवटा प्रमाणपत्र नसल्याने ती अधिकृत नाहीत. या बांधकामांवर कारवाई झाल्यास महापालिका जबाबदार नाही, असे या पत्रात म्हटले. त्यामुळे ग्रामस्थांनी घरे अनधिकृत असल्याचे प्रतिज्ञापत्र दिले तर भविष्यात कारवाईची टांगती तलवार कायम राहणार आहे.मते मागताना पाणी देण्याचे आश्वासन दिले होते. आता प्रत्यक्षात पाणी देण्याची वेळ आल्यावर आमच्यावर अशा जाचक अटी लादल्या आहेत, असे ग्रामस्थांनी सांगितले.

# गणपतीपुळे समुद्रात बुडालेल्या पाचही जणांचे मृतदेह हाती

■ रत्नागिरी

**गणपतीपुळे** येथे पर्यटनासाठी आलेल्या आणि समुद्रात बुडून बेपत्ता झालेल्या छत्रपती संभाजीनगरातील पाचही तरुणांचे मृतदेह अखेर शोधण्यात प्रशासनाला यश आले आहे.

छत्रपती संभाजीनगरहून १९ जणांचा पर्यटकांचा गट गणपतीपुळे येथे आला होता. २० जून रोजी सकाळी श्री गणपतीचे दर्शन घेतल्यानंतर काही जण समुद्रकिनाऱ्यावर गेले. त्यापैकी ८ जण पाण्यात उतरले असता भरती, प्रचंड लाटा आणि पाण्याचा वेग यांचा अंदाज न आल्याने ते खोल पाण्यात वाहून गेले. घटनेची माहिती मिळताच स्थानिक जीवरक्षक, मच्छीमार आणि नागरिकांनी तातडीने बचावकार्य सुरू केले. मोठ्या प्रयत्नांनंतर ३ जणांना सुखरूप बाहेर काढण्यात यश आले. मात्र, उर्वरित ५ जण बेपत्ता झाले होते. त्यानंतर पोलीस, कोस्टगार्ड, जीवरक्षक आणि स्थानिक मच्छीमार यांच्या मदतीने शोधमोहीम राबवण्यात आली. प्रतिकूल परिस्थिती, भरती-ओहोटी आणि लाटांचा वेग यांचा सामना करत सर्व मृतदेह बाहेर काढण्यात आले. मृतांमध्ये आदित्य संतोष राऊत, अनिकेत बंडू हिवराळे, आनंद राजू, नरवडे, प्रेम दीपक आदमाने आणि यश रामेश्वर कांबळे यांचा समावेश आहे.

# ओमराजे निंबाळकर नामचीन गद्दार संजय राऊत यांची बोचरी टीका

■ मुंबई

**इतिहासामध्ये** अनेक गद्दार झाले, त्यांना काही भूमिका होती का? एकंदरीत गद्दारांना कोणतीही भूमिका नसते आणि ओमराजे निंबाळकर हे नामचिन गद्दार आहेत, अशी जहरी टीका खासदार संजय राऊत यांनी केली.

संजय राऊत म्हणाले की, गद्दारांना भूमिका असते का? ओमराजे निंबाळकर हे नामचिन गद्दार आहेत. त्यांच्यासोबत असलेले इतरही लोक तितकेच गद्दार आहेत. गद्दारालाही काही भूमिका असते, हे मी प्रथमच ऐकतो आहे. इतिहासात जे गद्दार झाले, त्यांना कोणती भूमिका असू शकते का? महाराष्ट्राच्या स्वाभिमानाची जर कुणाला चिंता असेल, तर या गद्दारांना गद्दारच म्हटले पाहिजे. बैमान, महाराष्ट्राचे शत्रू आणि मराठी माणसाचे दुश्मन असेच संबोधले पाहिजे. त्यांची भूमिका काय आहे, या चर्चेतून तुम्ही सर्वांनी बाहेर पडले पाहिजे. शिवसेना तोडणे म्हणजे महाराष्ट्राचे तुकडे करणे होय आणि हे काम अमित शहा शिंदे गटाच्या माध्यमातून करत आहेत.

ओमराजे यांची मनधरणी केली का? यावर राऊत म्हणाले की, आम्ही ओमराजे यांची कोणतीही मनधरणी केलेली नाही. त्यांना वस्तुस्थिती समजावून सांगण्यासाठी त्यांचे मित्र कैलास पाटील त्यांना भेटले, त्यांच्यासोबत वरुण सरदेसाई होते.

# डॉ.अनघा कांगणेचे एमबीबीएस परीक्षेत यश

■ कल्याण



**कल्याण** येथील गणेश टॉवर, छत्रपती शाहू महाराज चौक, श्री दक्षिणमुखी हनुमान मंदिर परिसरातील वृत्तपत्र विक्रेते अ‍ॅड. मंगल विलास कांगणे व विलास ठकाजी कांगणे यांची कन्या तसेच इंजिनिअर शुभम कांगणे यांची बहीण डॉ. अनघा विलास कांगणे हिने एमबीबीएस परीक्षेत ६६ टक्के गुणांसह प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होण्याचा मान मिळविला आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल डॉ. अनघा कांगणे आणि कांगणे परिवाराचे सर्व स्तरांतून भरभरून अभिनंदन व कौतुक होत आहे.



# मुंबईला राज्य सरकारच्या कोट्यातून अतिरिक्त पाणी

■ मुंबई

**मुंबईला** पाणीपुरवठा करणाऱ्या सातही धरणांतील उपयुक्त जलसाठा घटून केवळ ८.६८ टक्क्यांवर राहिला. पावसाच्या विलंबामुळे संभाव्य पाणीटंचाईचे संकट निर्माण झाल्याने सरकारने कोट्यातील राखीव पाणी मुंबई पालिकेला उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. अप्पर वैतरणा आणि भातसा धरणांतील राखीव साठ्याच्या मदतीने दररोज अतिरिक्त पाणीपुरवठा केला जाणार असून, त्यामुळे मुंबईकरांवरील अतिरिक्त पाणीकपातीचे संकट तूर्तास टळले आहे.

मुंबईची वाढती पाण्याची गरज लक्षात घेऊन सरकारने अप्पर वैतरणा धरणातून ९३ हजार ५०० दशलक्ष लिटर आणि भातसा धरणातून १ लाख ३७ हजार दशलक्ष लिटर इतका राखीव पाणीसाठा उपलब्ध करून दिला होता. तर राज्यसरकार याच धरणांतील राखीव साठा वापरण्यास मंजुरी दिली. या निर्णयानुसार आजपासून मुंबईला दररोज १,६५० दशलक्ष लिटर अतिरिक्त पाणी उपलब्ध होणार आहे. हा साठा आणि धरणांमधील उपलब्ध पाणी मिळून जुलैच्या मध्यापर्यंत मुंबईची पाण्याची गरज भागवता येईल, असा अंदाज पालिकेने व्यक्त केला.

# खासगी शाळांच्या शिक्षकांनाही टीईटी उत्तीर्ण होणे आवश्यक

■ मुंबई

**शिक्षण** क्षेत्राच्या गुणवत्ता वाढीसाठी राज्याच्या शिक्षण विभागाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. आतापर्यंत केवळ शासकीय अनुदानित शाळांमधील शिक्षकांना बंधनकारक असलेली शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) परीक्षा यापुढे खासगी विनाअनुदानित व स्वयंअर्थसहाय्यित शाळांमधील शिक्षकांनाही बंधनकारक करण्यात आली आहे.

या निर्णयामुळे बोगस आणि अपात्र शिक्षकांचे धाबे दणाणले असून खासगी शाळांच्या मनमानी कारभाराला चाप लागणार आहे.शिक्षण हक्क कायद्यानुसार पहिली ते आठवीपर्यंतच्या वर्गांना शिकवणाऱ्या प्रत्येक शिक्षकासाठी टीईटी परीक्षा उत्तीर्ण असणे अनिवार्य आहे. मात्र अनेक खासगी शाळांनी या नियमाकडे सोयीस्कर दुर्लक्ष करत अपात्र शिक्षकांची भरती केल्याच्या तक्रारी येत होत्या.

# शासनाच्या उपजिल्हा अधिकारी कार्यालयासाठी म्हाडाने जागा नाकारली

■ मुंबई

**गोरेगाव** (पश्चिम) एस.व्ही. रोड येथे म्हाडा इमारतीत असलेल्या शासनाच्या उपजिल्हा अधिकारी तथा अतिक्रमण निर्मूलन कार्यालयासाठी पर्यायी जागा देण्यास म्हाडाने नकार दिला आहे. त्यामुळे संबंधित अधिकारी कार्यालयासाठी २ महिन्यांपासून जागेच्या शोधात आहेत.१९८८पासून गोरेगाव येथील म्हाडाच्या इमारतीत उपजिल्हा अधिकारी कार्यालय होते. ही इमारत अतिधोकादायक झाल्यामुळे म्हाडाने पुनर्विकासासाठी तीन महिन्यांपूर्वी पाडली, असे सांगून अधिकारी पुढे म्हणाला, आमच्या कार्यालयाला मालाड मध्ये पर्यायी जागा घ्यावी. अशी म्हाडाकडे पत्राद्वारे मागणी करण्यात आली होती. मात्र आमच्या पत्राला केराची टोपली दाखविण्यात आली. नाईलाजास्तव बोरिवली व दहिसरदरम्यान असलेल्या उपजिल्हा जिल्हा अधिकारी यांच्या कार्यालयात कर्मचाऱ्यांना तात्पुरती बसण्याची सोय करण्यात आली. असे असले तरी गोरेगाव व मालाड मधील नागरिकांना बोरिवली-दहिसर येथील कार्यालयात कार्यालयीन कामकाजासाठी ये-जा करणे प्रवासाच्या दृष्टीने अवघड होत आहे. त्यामुळे गोरेगावमधील उपजिल्हा अधिकारी कार्यालय मध्यवर्ती ठिकाणी असावे. अशी शासनाकडे आमची मागणी आहे.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

|| न मे भक्त प्रणश्यति ||

# नीट परीक्षेची सुरक्षितता आणि गुणवत्ता

गेल्या महिनाभरापासून प्रचंड चर्चेत असलेली आणि वादग्रस्त ठरलेली राष्ट्रीय प्रवेश परीक्षा म्हणजेच नीट अभूतपूर्व बंदोबस्तामध्ये पार पडली. गेल्या महिन्यातल्या पेपरफुटीच्या प्रकारानंतर यावेळच्या परीक्षेत अधिक सावधानता बाळगली गेली. त्याची आवश्यकताही होती. मागच्या नीट परीक्षेपेक्षा यावेळचा नीटचा पेपर कठीण असल्याची प्रतिक्रिया विद्यार्थ्यांनी व्यक्त केली आहे. ही परीक्षा नीट पार पडावी. हीसुद्धा सरकारची तितकीच मोठी परीक्षा होती. काही हलगर्जीपणाचे प्रकार यावेळेलाही घडून आले. एका विद्यार्थ्याच्या प्रवेशपत्रावर अबुधाबीच्या परीक्षा केंद्राचा पत्ता होता किंवा अगदी दोन मिनिटे उशीर झाला म्हणून विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारण्याचा घडलेला प्रकार दुर्दैवीच म्हणावा लागेल. गलथानपणा आणि संवेदनहीनता हे त्याचे उत्तर ठरते. ज्या पद्धतीचा बंदोबस्त राबवला गेला त्यावरून याहीवेळी गडबड गोंधळ होण्याची भीती सरकारला वाटली असावी. देशभरात परीक्षा सुरळीतपणे पार पडल्याने सरकार आणि विशेषतः केंद्रीय शिक्षण खात्याने सुटकेचा निश्वास टाकला असेल. परंतु ही परीक्षा सुरळीत पार पडलेली आहे. ती सुव्यवस्थित पार पडलेली नाही हा फरक लक्षात घ्यावा लागेल. साधारणपणे गेल्या तीस वर्षापासून सलग पेपरफुटीचे प्रकार घडत आहेत. या परीक्षेचा विद्यार्थ्यांवर पडणारा ताण सहन न करू शकणाऱ्या विद्यार्थ्यांची मानसिक अवस्था परीक्षेत अपयशी ठरणाऱ्या विद्यार्थ्यांमधले नैराश्य आणि आत्महत्या या सर्व बाबींचा अतिशय गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे. परीक्षेची कार्यपद्धती किंवा अंमलबजावणी आणि तिचा मूळ उद्देश याबाबतीत अधिक सुव्यवस्थित नियोजन म्हणजेच व्यवस्थापन झाले पाहिजे. केवळ परीक्षा सुरळीत पार पाडून या उर्वरित मुद्दांकडे दुर्लक्ष करता येणार नाही किंवा सरकारला आपली जबाबदारीही झटकता येणार नाही. लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य या एका परीक्षेभोवती गुंतलेले असते आणि केवळ एक परीक्षा विद्यार्थ्यांच्या मानसिक ताणतणावाला कारणीभूत ठरणार असेल तर एकूणच कार्यपद्धतीचा पुनर्विचार करणे हाच एकमेव पर्याय शिल्लक राहातो.

**लाखो विद्यार्थ्यांवर मानसिक दडपण**

परीक्षेची आवश्यकता त्यातून साधला जाणारा नेमका उद्देश त्यासाठी राबवली जाणारी कार्यपद्धती या तीन गोष्टींचा विचार केला तर प्रामुख्याने देशभरातील लाखो विद्यार्थी बारावीच्या परीक्षेपेक्षाही नीटच्या परीक्षेसाठी अधिक मानसिक आणि बौद्धिकदृष्ट्या गुंतून पडतात. कारण बारावीत मिळालेल्या गुणांना फारसे महत्त्व शिल्लक राहात नाही. नीट परीक्षेतली गुणवत्ता ही अधिक महत्त्वाची ठरत गेल्याने विद्यार्थ्यांना बारावीच्या अभ्यासाबरोबर नीट परीक्षांचाही अभ्यास करावा लागतो. या दुहेरी ताणाची आवश्यकता आहे का. केवळ आपल्याला अपेक्षित असलेल्या अभ्यासक्रमाला प्रवेश मिळावा आणि त्यासाठी पुन्हा गुणवत्ता सिद्ध करण्याची झटापट विद्यार्थ्यांना करावी लागते. एकाअर्थी बारावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेची ही दुहेरी शिक्षा सहन करावी लागते. वीस वर्षापूर्वी या प्रवेश परीक्षांचे झेंगट नव्हते. बारावीच्या गुणांवरच वेगवेगळ्या ठिकाणी प्रवेश मिळत असे. परंतु विद्यार्थ्यांना आपल्या आवडीच्या अभ्यासक्रमासाठी अधिकाधिक पर्याय निवडता यावेत. देशभरामध्ये कुठेही प्रवेश घेता येऊ शकतो. एवढाच एकमेव फायदा विद्यार्थ्यांना करावा लागतो. परंतु या एका कारणासाठी त्यांची होणारी मानसिक ससेहोलपट ही अधिकाधिक चिंतेची बाब होत चालली आहे. हा ताण कमी करून नीटच्या परीक्षेत अधिक सहजता आणि सुलभता कशी आणता येईल याचा विचार करण्याची वेळ आलेली आहे. आज विद्यार्थ्यांच्या भवितव्यापेक्षाही परीक्षेची सुरक्षितता त्यातली विद्यार्थ्यांची गुणवत्ता ही अधिक महत्त्वपूर्ण ठरते. मात्र या सगळ्या गोष्टींची अंमलबजावणी करताना सरकारच्या कार्यपद्धतीची इयत्ता घसरलेली पाहायला मिळते. कोणत्याही परिस्थितीमध्ये विद्यार्थी वेठीला धरला जाणार नाही. तो मानसिक दडपणाखाली येणार नाही. परंतु त्याचा अभ्यास सत्कारणी लागेल. अशा पद्धतीची सहजता आणि व्यापकता नीट परीक्षेमध्ये येण्याची आवश्यकता आहे. देशभरातल्या हजारो परीक्षा केंद्रांवर तैनात केला गेलेला पोलिसांचा फौजफाटा, प्रश्नपत्रिका पोहचवण्यासाठी थेट वायूदलाची विमाने वापरण्यापर्यंत गेलेली मजल यावरून नीट परीक्षा म्हणजे युद्धजन्य परिस्थितीचाच नमुना ठरली होती. या सगळ्या वातावरणाचेदेखील विद्यार्थ्यांच्या मनावर दडपण येते हे विसरून चालणार नाही.

**शिक्षणाला असुरक्षिततेचे ग्रहण**


भारताला २०४७ पर्यंत विकसित व्हायचे आहे. भारत सध्या जगातील चौथी आर्थिक सत्ता आहे. या गोष्टी जशा वारंवार कौतुकाने सांगितल्या जातात. परंतु याची विपरित परिस्थिती शिक्षण क्षेत्रामध्ये पाहायला मिळत आहे. नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीची चार वर्षापूर्वी घोषणा झाली. परंतु हे नवे शैक्षणिक धोरण अजूनही पूर्णपणे लागू झालेले नाही. देशाला विकसित होण्यापूर्वी ही शैक्षणिक व्यवस्था विकसित करावी लागेल. केवळ जागतिक विद्यापीठांशी स्पर्धा करण्याच्या उद्देशाने हजारो कोटी रुपये खर्चून परदेशी विद्यापीठांना जागा दिल्या जात आहेत. परंतु शिक्षणातली ही देशी कार्यपद्धती सुधारण्याची चिन्हे दिसत नाहीत. भारतीय युवकांकडे कष्ट, जिद्द, बुद्धिमत्ता या सगळ्या गोष्टी आहेत. परंतु त्यांना योग्य ती संधी मिळत नाही किंवा या बुद्धिमत्तेच्या उपयोगासाठी योग्य पद्धतीची व्यवस्थाही नाही. शिक्षण क्षेत्रच अशा पद्धतीने असुरक्षित असेल तर देशाच्या भावी पिढीचे भवितव्य किती असुरक्षित आहे याची आपण कल्पना करू शकतो. आज आयआयटी , आयआयएमची संख्या वाढवली जाते आहे. परंतु तिथे आवश्यक असणाऱ्या पायाभूत सोयीसुविधांची प्रचंड कमतरता पाहायला मिळते. वैद्यकीय किंवा अभियांत्रिकी महाविद्यालयांची दूरावस्था आणि त्यांची तिथे चालणारी दुकानदारी ही तर आणखीनच चिंताजनक विषय ठरतो. शिक्षण क्षेत्राला लागलेले हे असुरक्षिततेचे ग्रहण अतिशय प्राधान्यक्रमाने दूर केले गेले पाहिजे. एक परीक्षा यशस्वी करण्याकरीता खर्च होणारी शक्ती, वेळ, पैसा आणि त्याचा समाजावर होणारा परिणाम या सर्वांचा सारांश व्यवस्थेत खूप उणीवा असल्याचेच सिद्ध करतात.

## सुविचार

**विलास कोळेकर**
**मालेवाडी, जि. सांगली.** मोबा.९४२२४२०६११

आयुष्यात अपमान, धमक्या आणि अडचणी येणारच. पण त्यांचा बदला रागाने नाही, यशाने घ्यायचा असतो. अपमान लक्षात ठेवा, उत्तर मात्र यशाने द्या.

## पंचांग



**मंगळवार, २३ जून २०२६**
**शक १९४८ पराभवनामसंवत्सर**
*** निज ज्येष्ठ शुक्ल नवमी**
**नक्षत्र : हस्त**

**रवी उदय- ०६-०४**
**रवी अस्त- १९-१८**

**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-०० कन्या**

**महेश नवमी, कुमारी पूजन, डॉ. शामाप्रसाद मुखर्जी स्मृतिदिन**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building; 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती




### टोमॅटो सांबार उपमा



★ **साहित्य:**
१ कप भाजलेला रवा, १ कांदा बारीक चिरून, १ सिमला मिरची बारीक चिरून, १ गाजर बारीक चिरून, १ ते २ हिरव्या मिरच्या, १ टीस्पून हरभरा डाळ, १ टीस्पून उडीद डाळ, १ टीस्पून मोहरी, ४ सुक्या लाल मिरच्या, चिमूटभर हिंग, १० ते १२ काजू, १ टीस्पून आले, २ टोमॅटो प्युरी, १ टीस्पून धने पावडर, १ टीस्पून सांबार मसाला, मीठ चवीनुसार, २ ते ३ चमचे तूप, १ टीस्पून लिंबाचा रस, २ टीस्पून कोथिंबिर.

★ **कृती :-** सर्व प्रथम एका कढईत तूप गरम करा. त्यात काजू घाला आणि हलके सोनेरी होईपर्यंत तळा. आता मोहरी, जिरे, हरभरा डाळ, उडीद डाळ, कढीपत्ता, सुकी लाल मिरची आणि हिंग टाकून फोडणी तयार करा. यानंतर आले, हिरवी मिरची आणि कांदा घालून परता.

कांदा थोडासा पारदर्शक झाल्यावर त्यात गाजर आणि सिमला मिरची घालून काही मिनिटे शिजवा. आता टोमॅटो प्युरी घालून त्यात धनेपूड, हळद, तिखट, सांबार मसाला आणि मीठ घाला. तूप वेगळे होईपर्यंत मसाले शिजवा. यानंतर आवश्यकतेनुसार पाणी घालून उकळू द्या. आता हळूहळू भाजलेला रवा घाला आणि सतत ढवळत राहा म्हणजे गुठळ्या होणार नाहीत. उपमा घट्ट होऊन शिजला की गॅस बंद करा. लिंबाचा रस आणि ताजी कोथिंबीर घालून मिक्स करा.




# ९२ वर्षांनंतर विश्वचषकात इजिप्तचा पहिला विजय

## न्यूझीलंड संघाच्या पराभवासह अडचणीत वाढ

**व्हँकुव्हरमध्ये खेळल्या गेलेल्या फिफा विश्वचषकाच्या सामन्यात मोहम्मद सलाहच्या नेतृत्वाखाली इजिप्तने न्यूझीलंडला ३-१ ने पराभूत करून इतिहास रचला. १९३४ मध्ये विश्वचषकात पदार्पण करणाऱ्या इजिप्तने तब्बल ९२ वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर या स्पर्धेत आपला पहिला विजय नोंदवला. या विजयामुळे इजिप्तने 'गट जी' मध्ये अव्वल स्थान पटकावले आणि बाद फेरी गाठण्याच्या आपल्या आशा बळकट केल्या.**



■ व्हँकुव्हर

**पहिल्या** हाफमध्ये १५ व्या मिनिटाला फिन सेरमनच्या गोलमुळे न्यूझीलंडने सुरुवातीलाच आघाडी घेतली. त्यानंतर इजिप्त अनेक प्रयत्न केले मात्र गोल करता आला नाही. पहिला हाफ १-० ने राहिल्यानंतर दुसऱ्या हाफमध्ये इजिप्तने एक उल्लेखनीय पुनरागमन केले. ५८ व्या मिनिटाला मोस्तफा झिकोने गोल करुन संघासाठी बरोबरी साधली, त्यानंतर ६७ व्या मिनिटाला कर्णधार मोहम्मद सलाहने झिकोसोबत उत्कृष्ट समन्वय साधत एक शानदार गोल करून संघाला आघाडी मिळवून दिली. अखेरी ८२ व्या मिनिटाला ट्रेझेगेटने तिसरा गोल करून विजय निश्चित केला. मोहम्मद सलाहने इजिप्तच्या या ऐतिहासिक विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. त्याने एक गोल केला आणि एका गोलसाठी सहाय्यही केले. सामन्याच्या अंतिम क्षणी जेव्हा तो मैदानाबाहेर गेला, तेव्हा संपूर्ण स्टेडियमने उभे राहून टाळ्यांचा कडकडाट करत त्याचे स्वागत केले.

या सामन्यानंतर इजिप्तचा कर्णधार मोहम्मद सलाह म्हणाला की, हे अविश्वसनीय आहे. शब्दांत वर्णन करणे कठीण आहे. सर्व खेळाडू आणि सपोर्ट स्टाफसाठी ही एक मोठी उपलब्धी आहे. आशा आहे की, आम्ही असेच खेळत राहू, इतिहास घडवू आणि बाद फेरी गाठू.

**२४ जूनला विश्वचषकाचे सामने**

| भारतीय वेळ | संघ |
|---|---|
| मध्यरात्री १२:३० | पोर्तुगाल विरुद्ध उझबेकिस्तान |
| पहाटे ४:३० | इंग्लंड विरुद्ध घाना |
| सकाळी ७:३० | पनामा विरुद्ध क्रोएशिया |
| सकाळी १०:३० | कोलंबिया विरुद्ध काँगो |

इजिप्तने जी गटामध्ये ४ गुण मिळवून अव्वल स्थान पटकावले. इराण आणि बेल्जियम प्रत्येकी २ गुणांसह त्यांच्या मागे आहेत, तर न्यूझीलंड एका गुणासह चौथ्या स्थानावर आहे.

# आजपासून यूएस ओपन बॅडमिंटन स्पर्धा

## लक्ष्य सेन भारतीय संघाचे नेतृत्व करणार

■ कॅलिफोर्निया

**कॅलिफोर्निया** स्टेट युनिव्हर्सिटी येथील टायटन जिम्नॅशियममध्ये मंगळवारपासून सुरू होणाऱ्या यूएस ओपन सुपर ३०० बॅडमिंटन स्पर्धेत अनुभवी लक्ष्य सेन आणि उद्योन्मुख खेळाडू तन्वी शर्मा भारताचे नेतृत्व करतील. पुरुष गटातील किदाम्बी श्रीकांतसह इतर अनेक भारतीय खेळाडूही एकेरी स्पर्धेत आपले नशीब आजमावतील. महिला एकेरी स्पर्धेत एकूण ७ भारतीय खेळाडू सहभागी होतील.

जागतिक क्रमवारीत १४ व्या स्थानावर असलेला लक्ष्य सेन दुसरा मानांकित असून पहिल्या फेरीत त्याचा सामना बेल्जियमच्या ज्युलियन कॅरेगीशी होईल. या महिन्याच्या सुरुवातीला इंडोनेशिया ओपनमधून पहिल्याच फेरीत बाहेर पडल्यानंतर लक्ष्य पुनरागमन करण्यासाठी कोणतीही कसर सोडणार नाही. श्रीकांत पुरुष एकेरीतील आपला पहिला सामना चायनीज तैपेईच्या लियाओ झुओ-फू विरुद्ध खेळेल. आणखी एक भारतीय खेळाडू सनिथ दयानंद जपानच्या चौथ्या मानांकित युदाई ओकिमोतो विरुद्ध आपल्या मोहिमेला सुरुवात करेल. एस. शंकर मुथुसामी सुब्रमण्यन यांनीही मुख्य ड्रॉमध्ये आपले स्थान निश्चित केले असून त्याचा सामना एका पात्रता फेरीतून आलेल्या खेळाडूशी होईल. महिला एकेरीमध्ये पाचवी मानांकित तन्वी शर्मा आणि सहावी मानांकित देविका सिहाग सर्वोत्तम कामगिरी करण्याचा प्रयत्न करतील. त्या अनुक्रमे जागतिक क्रमवारीत ३२ व्या आणि ३४ व्या स्थानावर आहेत. ही १७ वर्षीय खेळाडू जर्मनीच्या इव्हॉन ली विरुद्ध आपला पहिला सामना खेळेल, तर देविकाचा सामना पेरूच्या इनेस लुसिया कॅस्टिलो सालाझारशी होईल.

# काबो वर्दे व उरुग्वेचा सामना

## २-२ अशा बरोबरीत सुटला

■ मियामी

**फिफा** विश्वचषकामध्ये पहिल्यांदाच खेळणाऱ्या काबो वर्दे संघाने दोन वेळच्या विश्वविजेत्या उरुग्वेला २-२ अशा बरोबरीत रोखले. त्यामुळे विश्वचषकाच्या एफ गटाच्या गुणतालिकेत उरुग्वे दोन गुणांसह दुसऱ्या स्थानावर राहिला आणि काबो वर्दे दोन गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे.

मियामी स्टेडियम येथे झालेल्या या सामन्याच्या २१ व्या मिनिटाला केविन पिनाने ३० यार्डवरून अप्रतिम फ्री-किक गोल करत काबो वर्देला ऐतिहासिक आघाडी मिळवून दिली. पहिल्या हाफच्या ४४ व्या मिनिटाला मॅक्सी अराउजो आणि ४५+६ व्या मिनिटाला ऑस्टिन कॅनोबियो यांनी गोल करत उरुग्वेला २-१ अशी आघाडी मिळवून दिली. ६१ व्या मिनिटाला उरुग्वेच्या गोलरक्षकाने (फर्नांडो मुसलेरा) केलेल्या चुकीचा फायदा घेत हॅलियो वारेलाने गोल केला आणि सामना २-२ असा बरोबरीत सोडवला.




■ अटलांटा

# स्पेनचा सौदीवर ४-० ने सहज विजय

## १८ वर्षीय लामिन यामाल चमकला

**फिफा** विश्वचषकाच्या ३८ व्या सामन्यात स्पेनने सौदी अरेबियावर ४-० ने सहज विजय मिळवला. त्यामुळे स्पेन या स्पर्धेच्या एफ गटाच्या गुणतालिकेत ४ गुणांसह अव्वल स्थानावर राहिला. अटलांटा स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात स्पेनने सुरुवातीपासूनच आपले वर्चस्व राखले. १८ वर्षीय लामिन यामाल आणि अनुभवी फॉरवर्ड मायकल ओयार्झाबाल यांनी संघाच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली.

पहिल्या हाफमध्ये स्पेनने आक्रमकपणे सामन्याला सुरुवात केली. १० व्या मिनिटाला मायकल ओयार्झाबालच्या अप्रतिम पासवर लामिन यामालने गोल करून संघाला १-० अशी आघाडी मिळवून दिली. विश्वचषकातील यामालचा हा पहिला गोल होता. त्यानंतर स्पेनने दबाव कायम ठेवला. २१ व्या मिनिटाला ओयार्झाबालने जवळून मिळालेल्या कॉर्नरच्या संधीचे गोलमध्ये रुपांतर करून २-० अशी आघाडी घेतली. अवघ्या ३ मिनिटांनंतर २४ व्या मिनिटाला त्याने आपला दुसरा गोल केला. डॅनी ओल्मोच्या हेडरवर ओयार्झाबालने व्हॉली मारून गोल केला व स्पेनला ३-० अशी भक्कम आघाडी मिळवून दिली. दुसऱ्या हाफच्या सुरुवातीला झालेल्या आत्मघाती गोलमुळे सौदीच्या अडचणी वाढल्या. ४९व्या मिनिटाला हसन अल्तामबक्तीने आत्मघाती गोल केला. मार्क कुकुरेलाचा शॉट गोलकीपरने अडवला,पण चेंडू अल्तामबक्तीला लागून त्याच्याच जाळ्यात गेला. या गोलमुळे स्पेनने ४-० अशी आघाडी घेतली.

# दुखापतग्रस्त लिटन दासच्या जागी महिदुलची निवड

■ ढाका

**बांगलादेशचा** यष्टीरक्षक-फलंदाज लिटन दास डाव्या पायाच्या पोटरीच्या दुखापतीमुळे झिम्बाब्वेविरुद्धच्या एकमेव कसोटी सामन्यातून बाहेर पडला आहे. त्याच्या जागी २७ वर्षीय महिदुल इस्लाम भुईयाँ याची बांगलादेशच्या संघात निवड करण्यात आली आहे. कसोटी सामना २८ जून पासून हरारे स्पोर्ट्स क्लबवर खेळवला जाणार आहे. महिदुल इस्लामने याआधी २०२४ मध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्ध आपल्या कारकिर्दीतील पहिला कसोटी सामना खेळला होता.

# भारतीय हौशी कबड्डी महासंघाच्या अध्यक्षपदी पुनीत बालन बिनविरोध

■ रांची

**भारतीय** हौशी कबड्डी महासंघाच्या अध्यक्षपदी युवा उद्योजक पुनीत बालन यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. या नव्या कार्यकारिणीत देशभरातील विविध राज्यांतील प्रतिनिधींना संधी देण्यात आली असून, एकूण २२ पदाधिकाऱ्यांची घोषणा करण्यात आली.

या महासंघाच्या २०२६ ते २०३० या कालावधीसाठीची निवडणूक रांची (झारखंड) येथे पार पडली. या निवडणुकीसाठी महासंघाचे २२ राज्यातील प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी महाराष्ट्राचे क्रीडा प्रशासक तथा उद्योगपती पुनीत बालन यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. तर विदर्भातील माजी खासदार रामदास तडास यांची अध्यक्ष (प्रेसिडेंट एमेरिटस) म्हणून, तर बिहारचे राजकुमार सिंह यांची मुख्य संरक्षक (चीफ पॅट्रन) म्हणून निवड करण्यात आली आहे सरचिटणीसपदी तेलंगणाच्या उशी रेड्डी यांची इतर महत्त्वाच्या पदांवर आणि कार्यकारिणीत देशातील विविध राज्यांतील प्रतिनिधींची बिनविरोध निवड करण्यात आली.

# बलाढ्य बेल्जियम निष्फळ! इराणविरुद्ध ०-० ने बरोबरी

■ लॉस एंजेलिस

**फिफा** विश्वचषकातील गट 'जी' मधील सामन्यात बेल्जियमला इराणविरुद्ध ०-० अशी बरोबरी स्वीकारावी लागली. या निकालामुळे 'रेड डेव्हिल्स' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बेल्जियमसमोर विश्वचषकातून बाहेर पडण्याचा धोका निर्माण झाला. केविन डी ब्रुयने आणि रोमेलू लुकाकू यांसारख्या अनुभवी खेळाडूंनी सजलेल्या बेल्जियम संघाने चेंडूवरील नियंत्रण राखले, मात्र इराणच्या भक्कम बचावफळीसमोर त्यांना स्पष्ट गोलसंधी निर्माण करण्यात अपयश आले.



पहिल्या हाफमध्ये इराणचा स्टार स्ट्रायकर मेहदी तारेमी याने अप्रतिम फ्री-किकवर चेंडू जाळ्यात धाडला होता. मात्र व्हीएआर तपासणीनंतर त्याला ऑफसाइड ठरवण्यात आले आणि गोल रद्द करण्यात आला. दुसऱ्या हाफमध्ये बेल्जियमला मोठा धक्का बसला. बचावपटू नाथन न्गॉय याने चुकीच्या बॅक-पासमुळे तारेमी गोलकडे धावत असताना त्याला अडवले. त्यामुळे पंचांनी त्याला लाल कार्ड दाखवत मैदानाबाहेर पाठवले आणि बेल्जियमला उर्वरित सामना १० खेळाडूंनी खेळावा लागला. दुसऱ्या हाफमध्येही तारेमीने गोल करण्याचा प्रयत्न केला, परंतु कोर्टुआने पुन्हा एकदा उत्कृष्ट बचाव केला. बेल्जियमचे प्रशिक्षक रुडी गार्सिया यांनी तिहेरी बदल केल्यानंतर संघाच्या आक्रमणात काहीशी धार आली. मॅक्सिम डी क्यूपरचा जवळून मारलेला फटका इराणच्या गोलरक्षकाने रोखला, तर बदली खेळाडू हान्स व्हानाकेनचा प्रयत्न बारच्या वरून गेला. या निकालामुळे गट 'जी' मधील आतापर्यंतचे सर्व तीन सामने बरोबरीत सुटले आहेत.

# कोटींच्या इंदूर-उज्जैन ग्रीनफिल्ड कॉरिडॉरचे भूमिपूजन

■ इंदूर

**सिंहस्थ**-२०२८ महापर्वाच्या पार्श्वभूमीवर मध्य प्रदेश सरकारकडून इंदूर आणि उज्जैन यांना जोडणाऱ्या महत्त्वाकांक्षी ग्रीनफिल्ड कॉरिडॉर प्रकल्पाचे भूमिपूजन करण्यात आले. चंद्रावतीगंज येथे मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव आणि केंद्रीय गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्री मनोहर लाल खट्टर यांनी २,९३५ कोटी रुपयांच्या या चारपदरी मार्गाचे भूमिपूजन केले.

मध्य प्रदेश रस्ते विकास महामंडळ (एमपीआरडीसी) मार्फत सुमारे २,९३५ कोटी रुपये खर्चून ४८ किलोमीटर लांबीचा चारपदरी ग्रीनफिल्ड कॉरिडॉर



विकसित करण्यात येणार आहे. हा मार्ग इंदूरमधील पितृ पर्वत परिसराला उज्जैनच्या चिंतामण गणेश मंदिराजवळील सिंहस्थ बायपासशी जोडणार असून, त्यामुळे इंदूर-उज्जैन दरम्यानचा प्रवास अधिक जलद आणि सुलभ होणार आहे. ४२ हजारांहून अधिक कुटुंबांना लाभ मिळणार असलेल्या २,५४८ कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्चाच्या गृहनिर्माण प्रकल्पांचेही भूमिपूजन करण्यात आले. तसेच ९९२ कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेली सुमारे ३८ हजार घरे लाभार्थ्यांना सुपूर्द करण्यात आली. याशिवाय ४४६ कोटी रुपयांच्या इतर विविध विकास प्रकल्पांचे उद्घाटन करण्यात आले, तर ३१०.८२ कोटी रुपयांच्या नव्या प्रकल्पांचे भूमिपूजनही करण्यात आले. पंतप्रधान स्वनिधी (पीएम स्वनिधी) योजनेअंतर्गत २० हजार पथविक्रेत्यांना ५१ कोटी रुपयांचे आर्थिक सहाय्य वितरित यावेळी करण्यात आले.

देश विदेश

# सरकारविरोधी आंदोलनामुळे बोलिव्हियामध्ये आणीबाणी जाहीर

■ सुक्रे

**दक्षिण** अमेरिकन देश बोलिव्हियाचे राष्ट्राध्यक्ष रॉड्रिगो पाझ यांनी देशभरात आणीबाणी जाहीर केली. ५० दिवसांपासून सुरू असलेली सरकारविरोधी निदर्शने, हिंसक आंदोलने आणि रस्ते नाकेबंदीमुळे निर्माण झालेल्या तीव्र अन्न व इंधन टंचाईच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला.

या घोषणेमुळे आंदोलकांनी बंद केलेले रस्ते मोकळे करण्यासाठी आणि जीवनावश्यक वस्तूंचा सुरळीत पुरवठा पूर्ववत करण्यासाठी सैन्याला (सशस्त्र दल) तैनात करण्याचे अधिकार मिळाले आहेत. अर्थव्यवस्थेतील तूट कमी करण्यासाठी आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीशी वाटाघाटी करण्यासाठी राष्ट्राध्यक्ष पाझ यांनी इंधनावरील सबसिडी अचानक कमी केली. बोलिव्हिया सध्या गेल्या ४० वर्षांतील सर्वात गंभीर आर्थिक संकटाचा सामना करत आहे, ज्यामध्ये डॉलरची टंचाई आणि महागाई वाढली आहे. डावे नेते आणि माजी राष्ट्राध्यक्ष इव्हो मोरालेस यांच्या समर्थकांनी तसेच कामगार संघटनांनी देशव्यापी निदर्शने करत मुख्य रस्ते रोखून धरले.

# पाकिस्तानात सॅनिटरी पॅड, गर्भनिरोधकांवरील टॅक्स रद्द

■ कराची

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

पाकिस्तानमध्ये सॅनिटरी पॅड आणि इतर सर्व प्रकारच्या गर्भनिरोधक उत्पादनांवरील १८ टक्के कर पूर्णपणे काढून टाकण्याचा मोठा निर्णय घेण्यात आला. पाकिस्तानचे अर्थमंत्री मुहम्मद औरंगजेब यांनी ही घोषणा केली. या निर्णयामुळे देशभरातील कोट्यवधी महिलांना आरोग्य उत्पादने खरेदी करणे आता अधिक सोपे आणि परवडणारे होणार आहे.

पाकिस्तानात सॅनिटरी पॅड आणि मासिक पाळीशी संबंधित इतर उत्पादनांना 'लक्झरी वस्तू' मानून त्यावर १८% कर लावला जात होता. महिला संघटना आणि कार्यकर्त्यांनी याला 'पिंक टॅक्स' किंवा 'पीरियड टॅक्स' म्हणून विरोध केला होता. युनिसेफच्या एका अहवालानुसार, अतिरिक्त कर आणि प्रचंड महागड्या किमतींमुळे पाकिस्तानमधील केवळ १२ टक्के महिलाच बाजारात मिळणारे सॅनिटरी पॅड वापरू शकत होत्या, तर उर्वरित महिला जुने कापड किंवा इतर असुरक्षित पर्याय वापरत होत्या. २४-२५ वर्षांच्या 'महकनूर उमर' नावाच्या तरुण मानवाधिकार वकील आणि तिच्या सहकाऱ्यांनी या अन्यायी कराविरोधात न्यायालयात कायदेशीर लढा दिला होता, ज्यापुढे अखेर सरकारला झुकावे लागले.

# आझम खान यांच्या ट्रस्टला आयकर विभागाची नोटीस

■ लखनौ

**समाजवादी** पक्षाचे नेते आझम खान आणि त्यांच्या कुटुंबाशी संबंधित असलेल्या मौलाना मोहम्मद अली जौहर ट्रस्टला पुन्हा एकदा मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. आयकर विभागाने ट्रस्टला नोटीस बजावली असून २३ जून रोजी सुनावणीसाठी बोलावले आहे. या नोटीसमध्ये ट्रस्टचे कार्य, आर्थिक व्यवहार आणि कामकाजांविषयी अनेक प्रश्न उपस्थित करण्यात आले. ट्रस्टच्या उत्तराने विभागाचे समाधान झाले नाही, तर त्याची नोंदणी धोक्यात येऊ शकते.

या नोटीसमध्ये आयकर विभागाने म्हटले की, ट्रस्टचे काही उपक्रम त्याच्या घोषित उद्दिष्टांशी विसंगत असल्याचे आढळले. अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या २०२१ च्या एका निर्णयाचा हवाला देऊन विभागाने जौहर विद्यापीठासाठी संपादित केलेल्या जमिनीशी संबंधित वाद आणि अटींच्या कथित उल्लंघनाचाही उल्लेख केला. विद्यापीठाच्या स्थापनेसाठी काही अटींच्या अधीन राहून, ट्रस्टला विहित मर्यादेपलीकडील जमीन संपादित करण्याची परवानगी देण्यात आली होती, परंतु त्या अटींच्या पालनाबाबत प्रश्न निर्माण झाले आहेत.

# कर्नाटकच्या वीज वितरण क्षेत्रात 'टाटा पॉवर'ला माकपचा विरोध

■ उडुपी

**मार्क्सवादी** कम्युनिस्ट पक्षाने कर्नाटकच्या वीज वितरण क्षेत्रात टाटा पॉवरला प्रवेश देण्याच्या प्रस्तावाला तीव्र विरोध दर्शवला आहे. राज्याच्या वीज वितरण व्यवस्थेच्या खासगीकरणाकडे टाकलेले हे पाऊल असल्याची टीका पक्षाने केली आहे. टाटा पॉवरने कर्नाटकातील सुमारे १५ जिल्ह्यांमध्ये वीज वितरण करण्यासाठी परवाना मिळावा यासाठी कर्नाटक विद्युत नियामक आयोगाकडे अर्ज केला आहे. माकपचा आरोप आहे की, हा निर्णय वीज क्षेत्र खासगी कंपन्यांसाठी खुले करण्याच्या व्यापक धोरणाचा एक भाग आहे. वीज वितरण क्षेत्रात खासगी कंपन्यांना परवानगी दिल्यास सार्वजनिक क्षेत्रातील व्यवस्था कमकुवत होईल आणि त्याचा प्रतिकूल परिणाम ग्राहकांवर होईल. घरगुती वीजपुरवठा, कृषी पंपसेट आणि इतर अत्यावश्यक सेवा या नफ्याच्या उद्देशाने चालविल्या जाणाऱ्या खासगी कंपन्यांच्या हाती सोपवू नयेत.

# युक्रेनने ब्रेझनेव्ह यांच्या पणतूला रशियासाठी लढताना पकडले

■ मॉस्को

**युक्रेनच्या** सैन्याने माजी सोव्हिएत नेते लियोनिद ब्रेझनेव्ह यांचा दत्तक पणतू अँटन मिलायेव याला पकडले. तो रशियन सैन्याच्या वतीने युद्धात सहभागी झाला होता. युद्धकैद्यांच्या व्यवहारासाठी कार्यरत युक्रेनच्या समन्वय मुख्यालयातील सूत्रांनीही या वृत्ताला दुजोरा दिला आहे.

मिलायेव हा ब्रेझनेव्ह यांची मुलगी गॅलिनाचा दत्तक नातू आहे. त्याने २०२५ मध्ये रशियन सशस्त्र दलासोबत लष्करी करार केला आणि युद्धभूमीवर कॉम्बॅट सॅपर (सुरुंग व स्फोटक तज्ज्ञ सैनिक) म्हणून नियुक्ती स्वीकारली. आघाडीवर गेल्यानंतर नोव्हेंबर २०२५ पासून त्याचा आपल्या कुटुंबियांशी संपर्क तुटला होता. नंतर कुटुंबाला तो दक्षिणेकडील खेरसॉन प्रदेशातील युक्रेनच्या नियंत्रणाखालील भागात



युद्धकैदी म्हणून ठेवण्यात आल्याची माहिती मिळाली.

मिलायेवचे पणजोबा लिओनिद ब्रेझनेव्ह यांच्या नेतृत्वाखाली सोव्हिएत संघाने १९६८ मध्ये चेकोस्लोव्हाकिया आक्रमण केले होते. जवळपास २ लाख सैनिक आणि ५,००० रणगाड्यांसह चेकोस्लोव्हाकियात घुसले होते. या कारवाईचा उद्देश प्राग स्प्रिंग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राजकीय उदारीकरण, सेन्सॉरशिपविरोधी चळवळ आणि लोकशाही सुधारणांना दडपणे हा होता. या सुधारणांचे नेतृत्व तत्कालीन झेकोस्लोव्हाक नेते अलेक्झांडर डबसेक करत होते.

# शक्तीपीठ महामार्गाविरोधात सांगलीच्या विट्यात महिलांचा लाटणी मोर्चा

■ सांगली

**प्रस्तावित** शक्तीपीठ महामार्गाविरोधातील आज शेकडो महिलांनी हातात लाटणी घेत सांगली जिल्ह्यातील विटा शहरात मोर्चा काढला. त्यांनी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. खानापूर तालुक्यातील विविध गावांतील महिला आणि शेतकरी सकाळी एकत्र येत क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या पुतळ्यास अभिवादन करून मोर्चास सुरुवात केली. त्यानंतर मोर्चा शहरातील प्रमुख मार्गांवरून जात छत्रपती शिवाजी महाराज चौकात पोहोचला. येथे छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात आले. एकच जिद्द, शक्तीपीठ रद्द आणि जमीन आमच्या हक्काची अशा घोषणा दिल्या. मोर्चा पुढे शासकीय मध्यवर्ती इमारतीपर्यंत नेण्यात आला, जिथे प्रांताधिकारी डॉ. विक्रम बांदल यांना मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. यावेळी विविध संघटनांच्या नेत्यांनी शक्तीपीठ प्रकल्पावर टीका करत हा प्रकल्प शेतकरीविरोधी असल्याचा आरोप केला. शेतकऱ्यांचे नुकसान होणार असून पर्यावरणावरही विपरीत परिणाम होईल, असा इशाराही देण्यात आला. शक्तीपीठ प्रकल्प रद्द होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला.

# कृष्णा साखर कारखाना निवडणुकीचा आज निकाल

**सातारा** - कराड तालुक्यातील रेठरे बुद्रुक येथील यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखाना संचालक मंडळाच्या निवडणुकीत ८२.२६ टक्के मतदान झाले. मतमोजणी उद्या २३ जून रोजी होणार आहे. या कारखान्यावर पुन्हा सत्ताधारी जयवंतराव भोसले सहकार पॅनेल ६८ ते ७२ टक्के मते घेऊन पुन्हा सत्तेवर येण्याचा अंदाज वर्तवण्यात आला. या निवडणुकीत अध्यक्ष सुरेश भोसले आणि आ. अतुल भोसले यांच्या नेतृत्वाखालील जयवंतराव भोसले सहकार पॅनेल तर विरोधात आबासाहेब मोहिते संस्थापक पॅनेलमध्ये थेट लढत झाली. दोन्ही गटांकडून जोरदार प्रचार करण्यात आला होता.निवडणुकीसाठी सातारा व सांगली जिल्ह्यातील १५३ मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया पार पडली.


**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given that the Share Certificate No. 64 comprising Distinctive Nos. 316 to 320, issued by Tirupati Mahalaxmi Co-operative Housing Society Ltd., situated at B.D.Road, Mumbai – 400026, standing in the name of Mr. Vinayak Y Dange, has been lost/misplaced and is not traceable despite diligent search.

Any person(s) having any claim, objection, right, title, interest, or possession in respect of the said Share Certificate is hereby required to notify the undersigned and/or the Society in writing within 15 days from the publication of this notice, failing which the Society shall proceed to issue a duplicate Share Certificate to the concerned member, and all claims, if any, shall be deemed to have been waived.

Place: Mumbai

Member's Name: Vinayak Y Dange
Flat No.: 702 Anand
Contact No.: 9821148121

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**
पाणी पुरवठा विभाग
निविदा सुचना

ठाणे महानगरपालिके तर्फे ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील अस्तित्वातील बोअरवेलसाठी पर्जन्य जल संचयन व विनियोग यासाठी रिचार्ज पिटचे बांधकाम व इतर संबंधित कामे करणेबाबत या कामाबाबत ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. कोरे निविदा प्रपत्र महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथे दि.२३.०६.२०२६ ते दि.३०.०६.२०२६ पर्यंत उपलब्ध आहेत. ऑनलाईन निविदा महापालिकेचे संकेतस्थळ येथे दि.३०.०६.२०२६ रोजी सायंकाळी ४:०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. व सदरची निविदा दि.०१.०७.२०२६ रोजी सायंकाळी ५:०० वाजता उघडण्यात येतील. निविदा सुचना व निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे अधिकृत संकेतस्थळ येथे उपलब्ध आहे. निविदा प्रपत्राची माहिती कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे.

ठामपा/पिआरओ/पा.पु-मु/२२९/२०२६-२७ सही/-
दि:२२.०६.२०२६ कार्यकारी अभियंता
Pls visit our oficial web-site ठाणे महानगरपालिका,ठाणे
www.thanecity.gov.in

**अनधिकृत बांधकामाला आळा घाला..**
**अनधिकृत बांधकाम दिसल्यास प्रभाग समितीत तक्रार करा !**

**महावितरण**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**ई-निविदा सुचना क्र. ०५/२०२६-२७**

महावितरण तर्फे कार्यकारी अभियंता (स्था), स्थापत्य विभाग कार्यालय कोल्हापूर अंतर्गत महावितरणचे विविध कार्यालय / उपकेंद्र येथील स्थापत्य दुरुस्तीची नवीन कामे करणेसाठी महावितरणमधील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून T-१०/२०२६-२७ ते T-२१/२०२६-२७ साठी ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. सदर निविदा महावितरणच्या संकेतस्थळावर (https://etender.mahadiscom.in/eatApp/) दि. २३-०६-२०२६ ते दि. २९-०६-२०२६ पर्यंत सकाळी १३.०० वाजेपर्यंत उपलब्ध आहेत. तसेच निविदा दि. २९-०६-२०२६ रोजी दुपारी १५.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील. सदर निविदा दि. २९-०६-२०२६ रोजी १६.०० वाजता शक्य असल्यास उघडण्यात येतील. निविदा संदर्भात अधिक माहितीसाठी अति. कार्यकारी अभियंता (स्था), स्थापत्य विभाग, कोल्हापूर भ्रमणध्वनी क्र. ७८७५७६९७४५ वर संपर्क साधावा. निम्नस्वाक्षरीकार यांनी कुठलेही कारण न देता सर्व निविदा स्वीकारणे अथवा रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवलेला आहे. तसेच कंत्राटदारांना विनंती करण्यात येते की, महावितरण च्या निविदा संकेतस्थळावर आपली नोंदणी करून घ्यावी. तसेच निविदेबाबत काही मुदतवाढ किंवा शुद्धीपत्रका बाबत फक्त संकेतस्थळावरील "Announcement" मध्येच कळविण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**( पी. आर. ओ. क्र. कोप – ९६ / २०२६-२७)**

**कार्यकारी अभियंता (स्था), स्थापत्य विभाग, कोल्हापूर**

**जाहीर सूचना**

येथे सूचना देण्यात येते की, मे. सिग्मा कन्स्ट्रक्शन कंपनी, त्यांच्या भागीदार मे. वरेही इन्फ्रा एलएलपी मार्फत, मोजमाप सुमारे ५०४.२८ चौ. मी. क्षेत्रफळ असलेल्या जमिनीच्या भाग व खंडावर पुनर्विकास करीत आहे, (४८६.३२ चौ. मी. प्लॉट क्षेत्रफळ आणि १७.९६ चौ. मी. टिट-बिट क्षेत्रफळ (१०.३७ चौ. मी. + ७.५९ चौ. मी.) समाविष्ट आहे, अशा प्रकारे एकूण प्लॉट क्षेत्रफळ ५०४.२८ चौ. मी. असून त्यामध्ये ५४.२० चौ. मी. रस्ता सेटबॅक क्षेत्रफळाचाही समावेश आहे, सदर जमीन सर्व्हे क्र. २३६ए, सीटीएस क्र.५७१०, गाव घाटकोपर (पूर्व), मुंबई – ४०००७५, किरोल, टाउन प्लॅनिंग स्कीम घाटकोपर क्र.III मधील अंतिम प्लॉट क्र. २८४ येथे स्थित आहे, सदर जमिनीवर उभी असलेली इमारत क्र.१३३ म्हणून ज्ञात इमारत, पंतनगर, घाटकोपर (पूर्व), मुंबई – ४०००७५ येथे स्थित असून, तिचा पुनर्विकास **'वरेही सिग्नेचर'** या प्रकल्पांतर्गत **(सदर प्रकल्प)** करण्यात येत आहे.

त्यामुळे, जनतेला सावध करण्यात येत आहे की, मे. सिग्मा कन्स्ट्रक्शन कंपनी आणि त्यांचे भागीदार मे. वरेही इन्फ्रा एलएल.पी. यांच्या माहितीशिवाय आणि लेखी संमतीशिवाय, सदर प्रकल्प 'वरेही सिग्नेचर' मधील कोणत्याही फ्लॅट/युनिटच्या संदर्भात कोणत्याही प्रकारे व्यवहार करू नये किंवा कोणताही करार, लेखी दस्तऐवज करू नये.

पुढे असे निदर्शनास आले आहे की, ग्रेस इन्फ्रा इंटेरियो आणि तिचे भागीदार राकेश गुप्ता व पूनम गुप्ता, जे पूर्वी सदर प्रकल्पात कंत्राटदार होते, ते सदर प्रकल्पातील जागा/फ्लॅट्स तृतीय पक्षांना वाटप करत आहेत. याद्वारे सूचित करण्यात येते की, सदर ग्रेस इन्फ्रा इंटेरियो आणि तिचे भागीदार राकेश गुप्ता व पूनम गुप्ता यांचा सदर प्रकल्पात आणि/किंवा त्याच्या कोणत्याही भागात कोणताही हक्क, शिर्षक आणि हितसंबंध नाही. त्यांच्याकडून झालेल्या चुकांमुळे, मे. सिग्मा कन्स्ट्रक्शन कंपनीने, त्यांचे भागीदार मे. वरेही इन्फ्रा एलएल.पी. यांच्यामार्फत, त्यांचे बांधकाम कंत्राट आधीच रद्द केले आहे. त्यामुळे, सदर प्रकल्पासंदर्भात आणि/किंवा ग्रेस इन्फ्रा इंटेरियो व तिचे भागीदार राकेश गुप्ता आणि पूनम गुप्ता यांच्यासोबत, सदर प्रकल्प किंवा त्याच्या कोणत्याही भागासंदर्भात व्यवहार करणारी कोणतीही व्यक्ती, तो व्यवहार स्वतःच्या जोखमीवर आणि परिणामांसाठी जबाबदार असेल. जर सदर व्यवहार खालील स्वाक्षरीकर्त्याच्या माहिती आणि संमतीशिवाय केला गेला असेल, तर हे घोषित आणि स्पष्ट केले जाते की, सदर प्रकल्पाच्या संदर्भात, केवळ कोणत्याही तृतीय पक्ष आणि ग्रेस इन्फ्रा इंटेरियो व तिचे भागीदार राकेश गुप्ता आणि पूनम गुप्ता यांच्या दरम्यान झालेल्या कोणत्याही कथित व्यवहारासाठी, मग तो भूतकाळातील असो, वर्तमानातील असो किंवा भविष्यातील असो, खालील स्वाक्षरीकर्ता यास जबाबदार राहणार नाही. कोणत्याही परिस्थितीत, असा व्यवहार पूर्णपणे अवैध आणि अप्रवर्तनीय आहे कारण ग्रेस इन्फ्रा इंटेरियो आणि तिचे भागीदार राकेश गुप्ता आणि पूनम गुप्ता यांचा सदर प्रकल्पात कोणताही हक्क, शिर्षक आणि हितसंबंध नाही.

सही/-
**मे. वरेही इन्फ्रा एलएल.पी.**
(मे. सिग्मा कन्स्ट्रक्शन कंपनीचे भागीदार)

**सूचना**

**सर्वसामान्य जनतेस** आणि सर्व संबंधितांना **सूचना देण्यात येत आहे की,** माझे अशिल **आर ॲण्ड बी इन्फ्रा प्रोजेक्ट्स लि. यांनी आदित्य डेव्हलपर्स इतर यांच्याविरुद्ध मुंबई उच्च न्यायालयात व्यावसायिक लवाद याचिका (एल) क्र.१३५४१/२०२६ सोबत व्यावसायिक लवाद अर्ज (एल) क्र.१४४४४/२०२६** दाखल केला आहे, प्रतिवादींना त्यांच्या शेवटच्या ज्ञात पत्त्यावर आरपीएडी आणि हमदस्त मार्फत सूचना बजावण्याचा प्रयत्न करण्यात आला; तथापि, प्रतिवादी सदर पत्त्यावर उपलब्ध नसल्याने ती बजावणी होऊ शकली नाही. उपरोक्त कार्यवाही, म्हणजेच व्यावसायिक लवाद याचिका (एल) क्र.१३५४१/२०२६ सोबत व्यावसायिक लवाद अर्ज (एल) क्र.१४४४४/२०२६, माननीय न्यायालयापुढे **२४ जून, २०२६** रोजी सूचीबद्ध करण्यात आली आहे. कृपया या प्रसिद्धीपत्रकाची दखल घ्यावी आणि सदर तारखेला, आपली इच्छा असल्यास, स्वतः किंवा वकिलामार्फत उपस्थित राहावे, असे न केल्यास, आपल्या अनुपस्थितीतही प्रकरणाची कार्यवाही केली जाऊ शकते आणि कायद्यानुसार योग्य ते आदेश पारित केले जातील, ज्याची नोंद घ्यावी.

दिनांक : २३.०६.२०२६
ठिकाण : मुंबई.

**सही/-**
**म्हात्रे लॉ असोसिएट्स**
फिर्यादींचे वकील
चेंबर क्र.१, म्हात्रे क्रॉस लेन, दत्तपाडा रोड, स्टेट बँक ऑफ इंडिया जवळ, बोरीवली (पूर्व), मुंबई – ४०००६६.
मोबाईल क्र.: **९८२०३४३४३०**
ईमेल : sachin@mlaw.in
ॲडव्होकेट कोड-आय-३१३४१

**फॉर्म बी**
**जाहीर उद्घोषणा**
(भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६ चे विनियमन १२)
**गिग्ज मीडिया प्रायव्हेट लिमिटेडच्या भागधारकांचे लक्ष वेधण्याकरिता**

| अ.क्र. | तपशील | वर्णन |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १. | कॉर्पोरेट ऋणकोचे नाव | गिग्ज मीडिया प्रायव्हेट लिमिटेड |
| २. | कॉर्पोरेट ऋणकोच्या स्थापनेचा दिनांक | दि. १९.१२.२०१७ |
| ३. | प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट ऋणकोची स्थापना/नोंदणीकरण झाले | आरओसी मुंबई। |
| ४. | कॉर्पोरेट ऋणकोचा कॉर्पोरेट ओळख क्र./ मर्यादित दायित्व ओळख क्रमांक | U74999MH2017PTC303079 |
| ५. | कॉर्पोरेट ऋणकोच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा पत्ता (जर असल्यास) | इमारत क्र. II, ४था मजला, स्पेक्ट्रम टॉवर, ऑफ लिंक रोड, माईंड स्पेस, मालाड पश्चिम, मुंबई, महाराष्ट्र, भारत, ४०००६४. |
| ६. | दिवाळखोरी ठराव प्रक्रिया परिसमाप्तीचा दिनांक | दि. १५.०६.२०२६ |
| ७. | कॉर्पोरेट ऋणकोचे परिसमापन सुरू होण्याचा दिनांक | दि. १५.०६.२०२६ (आदेश दि. १९.०६.२०२६ रोजी प्राप्त) |
| ८ | परिसमापक म्हणून काम करणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणीकरण पत्ता | सीए कुणाल जयंत वाजे IBBI/IPA-001/IP-P-02472/2021-2022/13815 |
| ९ | मंडळाकडे नोंदणीकृत असलेला परिसमापकाचा पत्ता आणि ई-मेल | भूखंड क्र. २६, स्नेहल बंगलो, गोकुळवाडी, श्रीरंग नगर, गंगापूर रोड, नाशिक, महाराष्ट्र, भारत-४२२०१३. ईमेल: ipkunalwaje@gmail.com |
| १० | परिसमापकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ई-मेल | भूखंड क्र. २६, स्नेहल बंगलो, गोकुळवाडी, श्रीरंग नगर, गंगापूर रोड, नाशिक, महाराष्ट्र, भारत-४२२०१३. ईमेल: gigsliquidation@gmail.com |

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ यांनी दि. १५ जून, २०२६ रोजी गिग्ज मीडिया प्रायव्हेट लिमिटेडचे परिसमापन सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.

दिनांक: २३.०६.२०२६ सही/-
ठिकाण: नाशिक सीए कुणाल जयंत वाजे

**झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई**

क्र. झोपुप्रा/अभि/३क(१)/जा.सु./रॉयल कॉम्प्लेक्स एस.आर.ए. सह.गृह. संस्था (नियो)/मोहीली/एल/२०२६/२८६८२ दिनांक: १८ जून, २०२६

जाहिर सुचना

याद्वारे कळविण्यात येते की, रॉयल कॉम्प्लेक्स एस.आर.ए. सह. गृह. संस्था (नियो) या संस्थेचे महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) अधिनियम, १९७१ कलम ३क (१) अंतर्गत 'झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र' म्हणून घोषित करावयाच्या प्रस्तावित मिळकतीचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | न.भू.क्र. | मिळकत पत्रिकेनुसार | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | क्षेत्र (चौ.मी.) | धारणाधिकार | मुळधारक / धारक | इतर शेरे |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | ४९५ | २६५.२० | क | – | – |
| २ | ५०२ | ४३७.७० | शेती | | |
| एकूण क्षेत्र | | ७०२.९० | | | |

न.भू.क्र. ४९५ या मिळकतीच्या मिळकत पत्रिकेवर धारक नमूद नसल्याने तसेच न.भू.क्र. ५०२ या मिळकतीचा धारणाधिकार शेती नमूद असल्याने व धारक नमुद नसल्याने क.जा.प. नुसार त्यांचे संबंधित स.नं. / हि.नं. चे ७/१२ नुसार धारक सदरी खालीलप्रमाणे नोंदी आहे.

| अ.क्र. | ७/१२ उताऱ्यानुसार | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | न.भू.क्र. | क.जा.प. नुससार स.क्र./हि.क्र. | क्षेत्र (हे.आर. चौ.मी.) | भूधारणा पध्दती | भोगवटादाराचे नाव | इतर |
| १ | | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | ४९५ | २१/१४ | ०.११.३७ | भोगवटादार वर्ग –१ | मे. रझा कंन्स्ट्रक्शन प्रा. लि. | – |
| २ | ५०२ | २१/१९ | ०.०७.०८ | | लड्डू शिवराम महाजन | |

घोषित करावयाच्या मिळकतींचे क्षेत्र व चतु: सिमा खालीलप्रमाणे :–

मौजे – मोहीली, तालुका – कुर्ला

| अ.क्र. | न.भू.क्र. | मिळकत पत्रिकेनुसार क्षेत्र (चौ.मी.) | घोषित करावयाचे क्षेत्र (चौ.मी.) | एकत्रित चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पूर्वेस | पश्चिमेस | उत्तरेस | दक्षिणेस |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | ४९५ | २६५.२० | २६५.२० | न.भू.क्र. ४९८ | रस्ता | न.भू.क्र. ४९४, ४९८ | न.भू.क्र. ४९६ |
| २ | ५०२ | ४३७.७० | ४३७.७० | न.भू.क्र. ३९३क | न.भू.क्र. ५०३, ३९३ड | न.भू.क्र. ३९३ड | न.भू.क्र. ३९३क |
| एकूण क्षेत्र | | ७०२.९० | ७०२.९० | | | | |

उपरोक्त नमुद मिळकत झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणेबाबत जमीन मालक अथवा कोणाही हितसंबंधीताची हरकत असल्यास, त्यांनी आपली हरकत सदर जाहीर सूचना प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे लेखी दाखल करणेबाबत कळविण्यात येत आहे.

ठिकाण :– वांद्रे(पू), मुंबई
दिनांक :– १८ जून, २०२६
SRA/PRO/93/2026

स्वाक्षरी/–
(डॉ. महेंद्र कल्याणकर)
मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बृहन्मुंबई

प्रशासकीय इमारत, प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०० ०५१.
दूरध्वनी : ०२२-२६५६ ५८००, ६९१२ ५८०० ● फॅक्स: ०२२-२६५९ ०४५७ ● ई-मेल: info@sra.gov.in

**बृहन्मुंबई महानगरपालिका**
क्र. उ.मु.अभि./यां व वि/५३१/प.उ. दि. १९.०६.२०२६

ई-निविदा सूचना

बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त खालील कामांकरिता पात्र बोलीदारांकडून **"शतमान तत्त्वावर" ऑनलाईन ई-निविदा** मागवित आहेत. बोली सुरु होण्याचा दिनांक आणि वेळ व बोली समाप्त होण्याचा दिनांक आणि वेळ बृमुंमपाच्या वेबसाईटवर "निविदा" विभागाअंतर्गत दिलेल्या तपशीलवार निविदा सूचनेमध्ये देण्यात आलेला आहे.

| विभाग: मु. अभि. (यां व वि) | अनुभाग: उ.मु.अभि. (यां व वि) प.उ. |
|---|---|
| ई-निविदा क्र.: | 2026_MCGM_1309644_1 |
| विषय | व्ही. एन. देसाई महापालिका सर्वसाधारण रुग्णालय, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई ४०००५५ येथे अत्यावश्यक सुरक्षा संबंधी कामांची श्रेणीवृद्धी. |
| बोली सुरुवात: बोली समाप्ती: | दिनांक २३.०६.२०२६ वेळ - स. ११.०० दिनांक १३.०७.२०२६ वेळ - दु. १६.०० |
| पोर्टल: | Http://portal.mcgm.gov.in |
| संपर्क व्यक्ती: अ) नाव: ब) संपर्क क्र. (कार्यालय): क) मोबाईल क्र.: ड) ई-मेल पत्ता: | कार्य. अभि. (यां व वि) प.उ. II श्री. नितिन विंदे ०२२-२९६७५८६२ ०७२७६६४०९०७ eews02.me@mcgm.gov.in |

इच्छुक निविदाकारांनी निविदेच्या अधिक तपशिलाकरिता महानगरपालिका वेबसाईट **http://portal.mcgm.gov.in/** येथे भेट द्यावी. निविदा प्रपत्रे टपालाद्वारे पारित केली अथवा स्वीकारली जाणार नाहीत.

सही/-
पीआरओ/६३६/जाही./२०२६-२७ **कार्य. अभि. (यां व वि) प.उ.-II**

कोणताही ताप असू शकतो हिवताप

**MAHAVITARAN**
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

**E-Tender Notice**

**Request for Selection (RfS) Document for Selection of Vendors for Design, manufacture, supply, transport, installation, testing and commissioning of Off-Grid DC Solar Photovoltaic water pumping systems of 3HP, 5HP & 7.5 HP capacity at identified farmer's site in district of Maharashtra, including complete system warranty and its repair and maintenance for 5 Years under "Magel Tyala Saur Krushi Pump / PM KUSUM B" Scheme**

TTender on e-tendering platform are invited for **Selection of Vendors for Design, manufacture, supply, transport, installation, testing and commissioning of Off-Grid DC Solar Photovoltaic water pumping systems of 3HP, 5HP & 7.5 HP capacity at identified farmer's site in district of Maharashtra, including complete system warranty and its repair and maintenance for 5 Years under "Magel Tyala Saur Krushi Pump / PM KUSUM B" Scheme.**

The details of the Tender are available on MSEDCL's e-tendering Website: https://etender.mahadiscom.in/eatApp/

Tender No. MSEDCL/SPD/MTSKPY/2026-27/T-06 Dtd. 22.06.2026

The Important Dates are-

- Date of Availability of Bidding Document on MSEDCL e-tendering Website : 22.06.2026
- Pre-Bid Meeting Date & time : 03.07.2026 at 11:00 Hrs
- Last Date & time for submission of Bid : 04.08.2026 at 15:00 Hrs
- Date and time of opening of Technical Bids : 04.08.2026 at 16:00 Hrs
- Date and time of opening of Price Bids : To be notified later.

Sd/-
HO PR NO 150/26 dt. 22.06.2026 Chief Engineer (SPD), MSEDCL, Mumbai

नवाकाळ

Email- contact@navakal.in
24x7 : www.navakal.in

# 'कबीर सिंग'ने दिली कलाटणी : निकिता दत्ता

**बॉलिवूडमधील** अत्यंत चर्चेत राहिलेल्या 'कबीर सिंग' या चित्रपटाला प्रदर्शित होऊन सात वर्षे पूर्ण झाली आहेत. या निमित्ताने, चित्रपटात जिया शर्मा ही महत्त्वपूर्ण भूमिका साकारणारी अभिनेत्री निकिता दत्ता हिने या ब्लॉकबस्टर चित्रपटाच्या तिच्या करिअरवरील दीर्घकालीन प्रभावाबद्दल सविस्तर भाष्य केले आहे. निकिताने सांगितले की, माझ्या वैयक्तिक आणि व्यावसायिक प्रवासासाठी हा चित्रपट मैलाचा दगड ठरला आहे. २०१९ नंतर चित्रपट निर्मात्यांचा माझ्याकडे पाहण्याचा आणि मला भूमिकांसाठी दृष्टिकोन मांडण्याचा दृष्टिकोन पूर्णपणे बदलला. माझ्या करिअरला मिळालेल्या या नव्या गतीचे ९९ टक्के श्रेय मी 'कबीर सिंग' चित्रपटालाच देते.

मूळ तेलगू चित्रपट 'अर्जुन रेड्डी' अत्यंत यशस्वी ठरला असला, तरी त्याचा हिंदी रिमेक इतका मोठा इतिहास रचेल याबद्दल निकिताच्या मनात सुरुवातीला साशंकता होती. दाक्षिणात्य चित्रपट हिंदीत तितकीच कमाल दाखवू शकतील का, याबद्दल तिला खात्री नव्हती, मात्र या चित्रपटाच्या यशाने स्वतःच्या चौकटीबाहेर जाऊन दिग्दर्शकाच्या दृष्टीवर विश्वास ठेवण्याचा मोठा धडा दिल्याचे तिने स्पष्ट केले. निकिता म्हणाली की, या चित्रपटाच्या यशाने तिला प्रचंड आत्मविश्वास दिला. दरम्यान, निकिता नुकतीच नेटफ्लिक्सच्या 'ज्वेल थीफ - द हिस्ट बिगिन्स' या ॲक्शन थ्रिलर चित्रपटात सैफ अली खान व जयदीप अहलावत यांच्यासोबत दिसली असून, आगामी काळात ती करण जोहरच्या धर्माटिक एंटरटेन्मेंट निर्मित 'नझदीकियां' या रोमँटिक-कॉमेडी मालिकेत मुख्य भूमिकेत दिसणार आहे.






## कष्टाळूपणा माझ्या डीएनएतच

**चित्रपटसृष्टीतील** अष्टपैलू अभिनेते मनोज बाजपेयी यांनी आपल्या अभिनय प्रवासातील संघर्षावर आणि चित्रपट निवडीच्या निकषांवर मनमोकळा संवाद साधला आहे. कष्ट करणे आणि मेहनत घेणे हे माझ्या जनुकातच (डीएनए) आहे, असे सांगत त्यांनी स्वतंत्र सिनेमा आणि मोठ्या बजेटचे व्यावसायिक चित्रपट या दोन्हीतील फरकावर प्रकाश टाकला. स्वतंत्र चित्रपटांचे चित्रीकरण शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या अत्यंत थकवणारे असले तरी तेच खरे आत्मिक समाधान देतात, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. मनोज यांनी स्पष्ट केले की, छोट्या बजेटच्या किंवा स्वतंत्र चित्रपटांमध्ये काम करताना प्रत्येक दिवसाचे महत्त्व असते. तेथे मर्यादित संसाधनांमुळे कलाकारांना अत्यंत कठीण परिस्थितीत आणि सतत धावपळ करत काम करावे लागते. हे काम प्रचंड थकवणारे असले तरी एक अभिनेता म्हणून मिळणारा आनंद आणि थरार याच सिनेमातून मिळतो. याउलट, मोठ्या बजेटचे व्यावसायिक चित्रपट हे एखाद्या 'पिकनिक'सारखे किंवा सुट्टी घालवण्यासारखे असतात. तेथे सर्व सुविधा उपलब्ध असतात, कामाचा वेग संथ असतो आणि मानधनही मोठे मिळते. त्यामुळे अशा चित्रपटांचे आमंत्रण स्वीकारण्याचा मोह अनेकदा होतो, कारण तिथे फारसा ताण नसतो. चित्रपट निवडीबाबत बोलताना ते म्हणाले की, मी जेव्हा जेव्हा एखादा मोठा व्यावसायिक चित्रपट करतो, तेव्हा दोन-तीन दिवसांतच मला तिथला संथपणा अस्वस्थ करू लागतो आणि माझे मन पुन्हा एखाद्या आव्हानात्मक, स्वतंत्र चित्रपटाच्या सेटवर जाण्यासाठी आसुसते.

# प्रियांकाला कंटाळा लवकर उठण्याचा

**अभिनेत्री,** गायिका आणि आई अशा विविध भूमिका चोख बजावणारी प्रियांका नेहमीच तिच्या शिस्तीसाठी ओळखली जाते, मात्र वैयक्तिक आयुष्यात तिला सकाळी लवकर उठणे अजिबात आवडत नसल्याचे तिने मान्य केले आहे. नुकतेच एका मुलाखतीत प्रियांकाने सांगितले की, ती 'मॉर्निंग पर्सन' (सकाळी लवकर उठणारी व्यक्ती) नाही. मला सकाळी लवकर उठण्याचा प्रचंड वीट येतो.

ती हसत म्हणाली, मी पहाटे ७ वाजेपर्यंत जागी राहू शकते, पण जोपर्यंत मी एखाद्या प्रोजेक्टवर काम करत नाही आणि मला तिथे काम करण्याचे अधिकृतपणे पैसे मिळत नाहीत, तोपर्यंत मला कोणीही सकाळी लवकर उठवू नका. असे असले तरी प्रियांका तिच्या कामाप्रती प्रचंड प्रामाणिक आहे. 'द ब्लफ' या चित्रपटाच्या चित्रीकरणादरम्यान ऑस्ट्रेलियात असताना अनेकदा तिला पहाटे ५ वाजता उठून सलग १२ तासांच्या शिफ्टमध्ये काम करावे लागले होते. कामावरून परतल्यानंतर ती तिची मुलगी मालती मेरी आणि आई मधू चोप्रा यांच्यासोबत वेळ घालवायची.






# अभिनेत्रींमध्ये क्रेझ कॉर्सेट लूकची

**बॉलिवूडच्या** आघाडीच्या अभिनेत्रींमध्ये सध्या कॉर्सेट लुकची क्रेझ मोठ्या प्रमाणावर पाहायला मिळत आहे. आलिया भट्ट, करीना कपूर खान, जान्हवी कपूर, कियारा अडवाणी आणि भूमी पेडणेकर या अभिनेत्रींनी हा पेहराव कशाप्रकारे परिधान करावा आणि त्यात आपली छाप कशी पाडावी, याचे उत्तम उदाहरण सादर केले आहे. या अभिनेत्रींनी वेगवेगळ्या कार्यक्रमांमध्ये आणि फोटोशूटदरम्यान कॉर्सेट टॉप्स, गाउन्स आणि वेस्टर्न आउटफिट्स अतिशय आत्म विश्वासाने आणि स्टायलिश पद्धतीने कॅरी केले आहेत. आलिया भट्टने एका पुरस्कार सोहळ्यात जांभळ्या रंगाचा कॉर्सेट गाऊन परिधान करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते, ज्यामध्ये तिची फॅशन निवड अत्यंत आधुनिक आणि शोभिवंत दिसत होती. दुसरीकडे, फॅशन आयकॉन करीना कपूर खान हिने ब्लॅक लेदर कॉर्सेट टॉप आणि पँट परिधान करून आपल्या बोल्ड आणि बिनधास्त लूकची झलक दाखवून दिली. जान्हवी कपूरने पांढऱ्या रंगाच्या फ्लोरल कॉर्सेट ड्रेसमध्ये तिचा रोमँटिक आणि ग्लॅमरस अंदाज सादर केला, तर कियारा अडवाणी हिने पेस्टल रंगाच्या कॉर्सेट आउटफिटमध्ये तिची सुबक आणि देखणी शैली चाहत्यांसमोर आणली. भूमी पेडणेकर हिने देखील एका ग्लॅमरस कार्यक्रमात गडद रंगाचा सिल्क कॉर्सेट टॉप परिधान करून आपली बोल्ड फॅशन स्टाईल सिद्ध केली.

# धनुष आणि मृणालमधील कथित अफेअर संपुष्टात

**दाक्षिणात्य** सुपरस्टार धनुष आणि बॉलिवूड अभिनेत्री मृणाल ठाकूर यांच्यातील कथित प्रेमसंबंध आता संपुष्टात आले असल्याची चर्चा सध्या सिनेवर्तुळात सर्वत्र ऐकू येत आहे. गेल्या काही महिन्यांपासून चित्रपट वर्तुळात आणि समाजमाध्यमांवर या दोघांच्या डेटिंगच्या चर्चा रंगत होत्या. मात्र, ताज्या माहितीनुसार, या दोघांनीही परस्पर संमतीने आपले मार्ग वेगळे करण्याचा निर्णय घेतला असून त्यांच्यातील या कथित रोमान्सवर आता पडदा पडला आहे. त्यांच्या या अचानक झालेल्या ब्रेकअपचे नेमके कारण काय, याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. धनुष आणि मृणाल यांच्यातील जवळीक गेल्या वर्षी अधिक चर्चेत आली होती, जेव्हा हे दोन्ही कलाकार अनेक सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये आणि चित्रपटांच्या प्रीमियरदरम्यान एकत्र दिसले होते. धनुषने मृणालच्या 'सन ऑफ सरदार २' या चित्रपटाच्या विशेष स्क्रिनिंगला हजेरी लावली होती, तर मृणाल देखील धनुषच्या चित्रपटाच्या पार्ट्यांमध्ये सहभागी झाल्याचे पाहायला मिळाले होते. या वाढत्या भेटीगाठींमुळे त्यांच्यात प्रेमसंबंध असल्याचे कयास बांधले जात होते. दरम्यान, मृणाल ठाकूर हिने काही मुलाखतींमध्ये या चर्चा केवळ अफवा असल्याचे सांगत धनुष हा आपला फक्त एक चांगला मित्र असल्याचे स्पष्ट केले होते आणि तिच्या व्यस्त वेळापत्रकामुळे तिला वैयक्तिक आयुष्यासाठी वेळ नसल्याचे म्हटले होते.





# 'टॉक्सिक' येणार ऑगस्टमध्ये

**'केजीएफ'** फेम दाक्षिणात्य सुपरस्टार यश याच्या आगामी 'टॉक्सिक: अ फेअरी टेल फॉर ग्रोउन-अप्स' या चित्रपटाची अधिकृत प्रदर्शन तारीख निर्मात्यांनी जाहीर केली आहे. राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या दिग्दर्शिका गीतू मोहनदास यांच्या दिग्दर्शनाखाली साकारत असलेला हा भव्य ॲक्शनपट २६ ऑगस्ट २०२६ रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. निर्मात्यांनी सोशल मीडियावर एक विशेष आणि लक्षवेधी व्हिडिओ शेअर करत या नव्या तारखेची घोषणा केली असून, त्यामुळे सिनेप्रेक्षकांमधील उत्सुकता कमालीची वाढली आहे. या चित्रपटाच्या शीर्षकासोबत जोडलेली 'अ फेअरी टेल फॉर ग्रोउन-अप्स' ही टॅगलाईन या कथेमध्ये काहीतरी वेगळे आणि गूढ असणार असल्याचे संकेत देते. यशच्या या नव्या लूकची आणि भूमिकेची झलक पाहण्यासाठी चाहते गेल्या अनेक महिन्यांपासून उत्सुक होते. आता प्रदर्शन तारीख निश्चित झाल्यामुळे या चित्रपटाच्या पोस्ट-प्रोडक्शन कामाला आणि व्यापक प्रमोशन मोहिमेला लवकरच सुरुवात होणार आहे.



# अण्णा हजारेंचा ५ जुलैपासून आमरण उपोषणाचा इशारा

## आरटीआय नियमांत जाचक बदल

■ मुंबई

**राज्य** सरकारने जाहीर केलेल्या 'महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम २०२६' वरून ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी नाराजी व्यक्त केली. माहितीचा अधिकार हा नागरिकांचा घटनात्मक हक्क असून, नव्या नियमांमुळे या कायद्याची धार बोथट होत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. हे नियम तात्काळ रद्द न केल्यास ५ जुलै २०२६ पासून राळेगणसिद्धी येथील यादवबाबा मंदिरात आमरण उपोषण सुरू करण्याचा इशारा हजारे यांनी दिला आहे.

अण्णा हजारे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना सविस्तर पत्र पाठवून नव्या नियमांवर कडक आक्षेप नोंदवले आहेत. १२ जून रोजी करण्यात आलेल्या दुरुस्त्या बेकायदेशीर असून, या बदलांमुळे पारदर्शकतेऐवजी भ्रष्टाचाराला चालना मिळेल. माहिती मागताना ओळखपत्राची सक्ती करणे, माहिती मागण्याचे कारण विचारणे, शुल्कवाढ आणि 'एक विषय-एक अर्ज' ही अट नागरिकांसाठी जाचक ठरणार आहे. पुनरावृत्ती अर्ज निकाली काढण्याची तरतूद, सुनावणीला गैरहजर राहिल्यास अपील फेटाळणे, अर्जदाराच्या मृत्यूनंतर केस बंद करणे आणि वकिलांची मदत घेण्यास बंदी या बाबीही अन्यायकारक आहे. या सर्व बदलांमुळे पारदर्शकतेऐवजी भ्रष्टाचाराला चालना मिळेल. सरकारने या जाचक अटी मागे घ्याव्यात,असे हजारे यांनी पत्रात नमूद केले.

# प. बंगाल सरकारचा अर्थसंकल्प मदरशांच्या निधीत मोठी कपात

■ कोलकाता

**पश्चिम** बंगालमधील भाजपा सरकारने पहिला अर्थसंकल्प सादर केला. मदरसा आणि अल्पसंख्याक कल्याण विभागाच्या निधीत मोठी कपात करण्यात आली आहे. अल्पसंख्याक कल्याण आणि मदरसा विभागासाठीचा निधी ५.७१३ कोटी रुपयांवरून २.१६५.४२ कोटी इतका कमी केला आहे. एक लाखांहून अधिक सरकारी पदे भरण्याची घोषणाही सरकारने केली आहे. यामध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्यात येणार आहे. त्याचवेळी सरकारी कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता वाढवून ३८ टक्के करण्याची घोषणा केली. याशिवाय कोलकात्यात नवीन विमानतळ उभारण्याचाही निर्णयही जाहीर केला.

# यशवाडी मंदिर दुर्घटना प्रकरणी कंत्राटदारावर कारवाईची मागणी



■ परभणी

**मानवत** तालुक्यातील यशवाडी येथे मंदिराच्या गाभाऱ्याचे छत कोसळून ५ भाविकांचा मृत्यू झाल्याच्या घटनेनंतर संताप व्यक्त होत असून, कंत्राटदारावर कारवाईची मागणी जोर धरत आहे. मंदिर संस्थानचे अध्यक्ष शिवेंद्र स्वामी यांनी या दुर्घटनेसाठी संबंधित कंत्राटदारालाच जबाबदार धरत प्रशासनाने सखोल चौकशी करून दोषींवर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी केली आहे.

शनिवारी २० जून रोजी घडलेल्या या दुर्घटनेत ५ भाविकांचा मृत्यू झाला तर १८ जण जखमी झाले आहेत. जखमींपैकी एकाची प्रकृती गंभीर होती, मात्र त्यांना नांदेड येथे हलवल्यानंतर आता प्रकृती स्थिर असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली आहे. दरम्यान, प्रशासनाने मंदिर तीन दिवसांसाठी बंद ठेवले असून परिसरात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला. मंदिराच्या बांधकामावेळी दर्शन बंद ठेवण्याबाबत राजस्थानच्या कंत्राटदाराला विचारणा करण्यात आली होती. मात्र त्याने दर्शन सुरू ठेवण्यास हरकत नसल्याचे सांगितल्याचा आरोप करण्यात येत आहे. त्यामुळे निष्काळजीपणामुळे ही दुर्घटना घडल्याचे सांगितले जात आहे. घटनेनंतर परभणीतील पुरातत्त्व व बांधकाम विभागाच्या अभियंत्यांनी घटनास्थळी पाहणी केली. मंदिराचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यासाठी पुणे आणि छत्रपती संभाजीनगर येथील तज्ज्ञ पथके बोलावण्यात आली.

# पनवेल तालुक्यातील घेरावाडी प्रकाशमान


■ पनवेल

**तालुक्यातील** आपटा ग्रामपंचायत हद्दीत, कर्नाळा किल्ल्याच्या पायथ्याशी वसलेले घेरावाडी हे छोटेसे आदिवासी गाव आता वीजप्रकाशाने उजळून निघाले आहे.



मुख्य अभियंता, भांडुप परिमंडल, संजय पाटील व अधीक्षक अभियंता, पेण मंडळ, धनराज बिक्कड यांच्या मार्गदर्शनाखाली १९ जून २०२६ रोजी पनवेलचे आमदार महेश बालदी यांच्या हस्ते घेरावाडीतील नागरिकांना महावितरणमार्फत नवीन वीजजोडण्या प्रदान करण्यात आल्या. यावेळी रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मा. मंगेश वाकडीकर, पनवेल पंचायत समितीच्या अध्यक्षा सौ. रंजनाताई वास्कर, पनवेल ग्रामीण विभागाचे कार्यकारी अभियंता दिवाकर देशमुख प्रामुख्याने उपस्थित होते. चोहोबाजूंनी चार ते पाच किलोमीटर जंगलाने वेढलेल्या या दुर्गम डोंगराळ वाडीत प्रथमच वीज पोहोचविण्याचे आव्हानात्मक काम महावितरणने यशस्वीपणे पूर्ण केले.

# ठाण्यात ४८ तास पाणीपुरवठा बंद



■ ठाणे

ठाणे महानगरपालिकेने मुंब्रा, दिवा, कळवा, माजिवडा-मानपाडा आणि वागळे प्रभाग समितीअंतर्गत येणाऱ्या अनेक भागांमध्ये पुढील ४८ तास पाणीपुरवठा पूर्णपणे बंद राहणार असल्याची घोषणा केली आहे. उद्या रात्री १२ वाजल्यापासून गुरुवार, २५ जून रोजी रात्री १२ वाजेपर्यंत बारवी, जांभूळ आणि शहाड जलशुद्धीकरण केंद्रांमधून होणारा पाणीपुरवठा बंद ठेवण्यात येणार आहे.

पालिकेने परिपत्रक जारी करून नागरिकांना पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन केले आहे. दिवा आणि कळवा प्रभाग समितीअंतर्गत सर्व भाग, मुंब्रा प्रभागातील बहुतांश परिसर, वागळे प्रभागातील रुपादेवी पाडा, किसननगर क्रमांक २ आणि नेहरूनगर तसेच माजिवडा-मानपाडा प्रभागातील कोलशेत खालचा गाव या भागांमध्ये पाणीपुरवठा बंद राहणार आहे. त्यामुळे नागरिकांनी आवश्यक तेवढा पाण्याचा साठा करून ठेवावा, असे आवाहन पालिका प्रशासनाने केले आहे.

# खासदार फोडायला पैसे आहेत लाडक्या बहिणींसाठी नाहीत

## आदित्य ठाकरेंचा हल्लाबोल

■ मुंबई

**राज्य** विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी उबाठा आमदार नेते आदित्य ठाकरे यांनी सत्ताधारी सरकारवर हल्लाबोल केला. राज्यातील शेतकरी कर्जमाफी, पाणीटंचाई, वीजप्रश्न, लाडकी बहीण योजना आणि पक्षफोडीच्या राजकारणावरून त्यांनी सरकारला लक्ष्य केले. लाडक्या बहिणींना पैसे देण्यासाठी सरकारकडे निधी नाही, शेतकऱ्यांची कर्जमाफी होत नाही. मात्र खासदार आणि आमदार फोडण्यासाठी पैसा उपलब्ध आहे, असा आरोप त्यांनी केला.

आदित्य ठाकरे म्हणाले की, सरकारचे संपूर्ण लक्ष शासन चालवण्यापेक्षा आमदार, खासदार आणि नगरसेवक फोडण्यावर आहे. २०२१ साली आम्ही मंजूर केलेला समुद्राचे पाणी गोड करण्याचा (डिसॅलिनेशन) प्रकल्प वेळेत पूर्ण झाला असता, तर आज मुंबईकरांवर पाणीकपातीची वेळ आली नसती. विरोधी पक्षातील आमदारांना निधी दिला जात नाही. हा अन्याय फक्त आमच्या मतदारसंघांवर नाही, तर जनतेवर आहे. आम्हाला उबाठा पक्ष म्हणून आणि भाजपाविरोधी भूमिका म्हणून जनतेने निवडून दिले आहे. निधी न देऊन पक्षांतरासाठी दबाव आणला जात आहे. राज्यात सर्वत्र भ्रष्टाचार दिसतो. रस्ते, महामार्ग आणि विविध प्रकल्पांमध्ये गैरव्यवहार झाले.भाजपाला पुन्हा दोन-तृतीयांश बहुमत हवे आहे. म्हणूनच विरोधी पक्षांचे खासदार फोडण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

# जात पडताळणी समिती स्वत:च्या निर्णयाचे पुनर्विलोकन करू शकत नाही

## मुरलीधर मोहोळांना दिलासा

■ मुंबई

**जात** प्रमाणपत्र पडताळणी समितीला एकदा जारी केलेल्या जात वैधता प्रमाणपत्राचा स्वतःहून किंवा तक्रारीच्या आधारे पुनर्विलोकन करण्याचा कोणताही कायदेशीर अधिकार नाही, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा उच्च न्यायालयाने दिला. या निर्णयामुळे केंद्रीय राज्यमंत्री आणि पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ यांच्यासह अन्य याचिकाकर्त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

न्या. जी. एस. कुलकर्णी आणि न्या. आरती साठे यांच्या खंडपीठाने हा निकाल दिला. पुणे जात पडताळणी समितीने २००७ मध्ये मोहोळ व इतरांच्या वैधतेबाबत घेतलेले पुनर्विलोकनाचे आदेश पूर्णपणे अधिकारबाह्य आणि बेकायदेशीर ठरवत न्यायालयाने ते रद्द केले आहेत. मुरलीधर मोहोळ, अंकुश तिडके, पृथ्वीराज सुतार आणि विष्णू हरिहर यांना सक्षम प्राधिकरणाकडून जात प्रमाणपत्रे मिळाली होती. त्यानंतर जात पडताळणी समितीने त्यांची तपासणी करून वैधता प्रमाणपत्रेही जारी केली होती. मात्र, २००७ मध्ये काही खासगी व्यक्तींनी केलेल्या तक्रारींनंतर पुणे जात पडताळणी समितीने पुनर्विलोकन अधिकाराचा वापर करत स्वतःचेच जुने आदेश बाजूला ठेवले होते. या बेकायदेशीर कारवाईविरोधात याचिकाकर्त्यांनी २००७ मध्ये उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केल्या होत्या. त्यावर खंडपीठाने दोन्ही बाजूकडील सविस्तर युक्तिवाद ऐकून घेतले. त्यानंतर मुरलीधर मोहोळ आणि इतर याचिकाकर्त्यांच्या बाजूने निकाल देत जात पडताळणी समितीने २००७ मध्ये जारी केलेले वादग्रस्त आदेश रद्द केले. समितीने स्वतःचे निर्णय बदलणे हे पूर्णपणे अधिकार क्षेत्राबाहेरचे आहे. कायद्यात समितीला स्वतःच्या अंतिम निर्णयाचा पुनर्विलोकन करण्याचा कोणताही स्पष्ट अधिकार दिलेला नाही, असे खंडपीठाने निर्णय देताना स्पष्ट केले.

# पीएनजी असलेल्या परिसरात एलपीजी पुरवठ्यावर निर्बंध

■ मुंबई

**अमेरिका**-इराण युद्धामुळे होर्मुज सामुद्रधुनी पुन्हा एकदा बंद झाल्यामुळे भारतावरील इंधनाचे संकट अधिक गहिरे झाले आहे. त्यामुळे केंद्र सरकारने एलपीजी आणि पीएनजीबाबत कठोर नियम बनवले असून येत्या ३० जूननंतर पीएनजी उपलब्ध असलेल्या परिसरांमध्ये एलपीजी गॅस पुरवठ्यावर काही प्रमाणात निर्बंध लागू केले जाणार आहेत.

सरकारने आता एका कुटुंबात एकच गॅस कनेक्शन ठेवण्याचा नियम सक्तीचा केला आहे. ज्यांच्याकडे आधी एलपीजी कनेक्शन आहे त्यांनी पीएनजी घेतल्यानंतर ३० दिवसांत एलपीजी सिलिंडर गॅस एजन्सीमध्ये जमा करावे लागणार आहेत. ज्या भागांत पीएनजीचा पुरवठा सुरू करण्यात आला आहे तिथे गॅस एजन्सी पीएनजी कनेक्शन घेण्यासाठी ग्राहकांना नोटीस पाठवली जाईल. या नोटिशीनंतर ९० दिवसांच्या आत पीएनजीसाठी अर्ज न केल्यास एलपीजी मिळण्यात अडचणी येऊ शकतात.

सरकारच्या आवाहनानंतर हजारो ग्राहकांनी एलपीजीऐवजी पीएनजीचा पर्याय निवडला आहे. मार्च २०२६ च्या आकडेवारीनुसार एकाच महिन्यात सुमारे एक लाख कुटुंबांनी एलपीजी सिलिंडर गॅस एजन्सीकडे जमा केले आहेत. सध्या देशात सुमारे १३.२४ लाख पीएनजी कनेक्शन देण्यात आली आहेत.


# डीपीसीची बैठक लांबल्याने म्हाडा कर्मचाऱ्याची पदोन्नती

■ मुंबई

**गेले** दोन वर्ष होत आले म्हाडा प्राधिकरणाने डीपीसीची बैठक न घेतल्याने अनेक कर्मचाऱ्यांच्या खाते अंतर्गत होणाऱ्या पदोन्नत्या रखडल्या आहेत, असा नाराजीचा सूर उमटू लागला आहे.

म्हाडाची दहा विविध मंडळाची कार्यालय आहेत. यामध्ये असलेल्या कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती संदर्भात प्राधिकरणाने ऑगस्ट २०१४ मध्ये डीपीसी बैठक घेतली होती. नियमानुसार पदोन्नती संदर्भात दरवर्षी डीपीसीची बैठक घेऊन पुढील आढावा घेणे अपेक्षित आहे. मात्र दोन वर्षे होत आले. प्राधिकरणाने डीपीसी बैठक न घेतल्याने म्हाडातील शिपाई, कनिष्ठ लिपिक, सहाय्यक मिळकत वरिष्ठ लिपिक अशा अनेक कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती कधी होतील या प्रतिक्षेत शेकडो कर्मचारी प्राधिकरणाच्या बैठकीकडे डोळे लावून आहेत.

## नवाकाळ शब्दकोडे-१६४५



**आडवे शब्द –**

१. अमर्याद, गणपतीचे एक नाव ४. पारशी नववर्षदिन ७. इडलीबरोबर येणारा पदार्थ ११. मेलेला १२. नसता उद्योग १३. जड व क्लिष्ट भाषेतले, चटकन न समजणारे १५. अब्रूदार १६. उपयोगात आणणे १७. फाल्गुन महिन्यातला सण १८. चहाडी, चुगली २०. तोटा २२. चुलता २३. देवांची घोडागाडी २६. टिंगल २७. कळस, शिखर २८. योगदान २९. तृण, चारा ३२. कच खाणे, अडखळणे ३५. घोडा ३६. सागराच्या पोटातील अग्नी ३८. परिवर्तन, फेरफार ४०. पतन ४१. ईर्ष्या, चुरस ४२. कालिंदी नदी ४४. निलाजरा, निर्लज्ज ४७. हवेली, मोठा वाडा ४९. बैठक ५१. पातळ पदार्थ ५३. मोठेपणा, थोरवी ५५. मुक्तता ५७. रेषा ५८. ताबडतोब, लगेच ५९. लेखनिक, क्लार्क ६०. जुन्या रुपयातले आठ आण्यांचे नाणे ६२. रामाची राजधानी ६४. मिश्रण, खिचडी ६६. माणूस ६७. हार, हरणे ६९. इसम, व्यक्ती ७१. इंद्राचा हत्ती ७२. सुंदर स्त्री ७३. सारमेय, कुत्रा ७४. नूतन ७६. मनाई, मज्जाव ७७. एक द्रवरूप धातू ८०. ब्रह्मचारी, संधी ८१. अवलंबन ८२. पिशाच्च, भूत ८४. अतिशय कद्रू ८६. अभ्यागत, अतिथी ८८. अजाण ८९. टेंभा ९०. पदोन्नती, प्रमोशन ९१. प्रखर, तिखट ९२. अभिमंत्रित ९५. कर्णा, ध्वनिवर्धक ९६. खास पाहुणचार, सरबराई ९८. अंगारक ग्रह ९९. गीतरचना १००. सडेतोड, फटकळ १०१. धीर सुटलेला १०२. पिशवी, थैली १०५. प्राप्ती, फायदा १०७. ग्रामस्थ १०८. झोपडी १०९ . रागाने कुरकुरणे

**उभे शब्द –**

१. संत ज्ञानेश्वरांची एक रचना २. अल्प ३. पेठ, मोहल्ला ४. अननुभवी, शिकत असलेला ५. नोकरी, पोटापाण्याचा कामधंदा ६. वजनदार ७. शोले सिनेमात गब्बरचा साथीदार ८. लहान मूल ९. सकाळ १०. आख्यायिका १२. मुंज १४. यादी, सूची १५. युद्ध, लढाई १६. तुळईला आधार देणारा खांब १९. लुबाडणे, ढापणे २१. एक पालेभाजी-खाद्यतेल २२. कासोटा, काष्टा २४. काठ, किनारा २५. कुशल २७. मनात नसताना, जबरदस्तीने ३०. वर्तुळ ३१. धीमा, संथ ३३. घड्याळातील घंटा, अलार्म ३४. अहंकार, ताठा ३५. प्रवेश करायला जागा ३७. उत्तराधिकारी ३८. ढोंग, कारस्थान ३९. लचांड, लटांबर ४०. पूर्वग्रह ४३. छपाई करणारा ४५. पराकाष्ठा ४६. आपलेपणा, माया ४७. वेग, झपाटा ४८. भरमसाट, अवाच्या सव्वा ५०. नशिबात लिहिलेले ५२. पिकलेला ५४. दूत, निरोप्या ५५. नेत्रांजनाचा एक प्रकार ५६. करंजी ५८. सांप्रत ६०. प्रचीती घेणे, अंदाज घेणे ६१. काचेची बाटली ६३. लढवय्या ६५. सुंदर स्त्री ६८. पोपट ६९. एखाद्या विषयाची कल्पना नसलेला ७०. बारावी रास, मत्स्य ७१. बसून खायला सोकावलेला, ऐतखाऊ ७५. गावाच्या सीमेवरील पहारेकरी ७६. पाश, बंधने ७७. पाच पेंढ्यांची जुडी ७८. पेरणीआधी जमीन भाजणे ७९. चिमणीचे घरटे, स्त्रियांचा अंबाडा ८३. लोकमान्य टिळकांना इंग्रजांनी या तुरुंगात ठेवले होते ८४. अतिशय उष्ण ८५. धान्य साठवण्यासाठी बांबूचा उभट झारा ८७. धुडगूस ८८. टोक ८९. पाषाण ९१. शुश्रुषा, देखभाल, निगा, राबणे ९२. पवित्र, मुलींचे एक नाव ९३. पातळ गादी ९४. रानमेव्यातील एक फळ ९५. मुलींचा अश्विन महिन्यातला एक खेळ ९६. सोटा ९७. अंग भाजून काढणारे ९८. जरीचा काठ असलेले पागोटे १०२. प्रमुख ख्रिस्ती धर्मगुरू १०३. किनारा १०४. नगरवासी १०६. चांगला, सज्जन •

**नवाकाळ कोडे क्रमांक १६४४ चे उत्तर**

**आडवे शब्द :** २. अरेरावी ५. मोह ८. कंचनी १०. चाक १२. गांडीव १३. बरड १५. मगरमिठी १८. लिखापढी १९. सरिता २१. हाय खाणे २२. तमा २३. परका २४. आळी २५. सशक्त २६. वत्स २९. रात ३०. माधव ३४. मरणासन्न ३८. रडतखडत ४२. यक्ष ४३. सूर मारणे ४५. बरकत ४७. जंगलराज ५०. यमन ५१. सावकार ५३. संगणक ५४. अगम्य ५६. पराग ५८. बहर ६०. आयता ६२. मयासुर ६४. गवगवा ६७. डग्गा ६८. महा ६९. जनन ७०. सवलत ७२. शमन ७४. सफलता ७५. रेटा ७६. राघव ७८. हंडा ७९. मोल ८०. शिवालय ८२. रांजण ८३. शेंडी ८४. गमन ८६. ईर ८७. धरबंध ९०. दादा ९१. शीर्ष ९२. दंभ ९३. विपणन ९५. रडगाणे ९६. खांब ९७. सारंग ९९. शिवार १००. मठ्ठा १०१. जादा १०२. भंपक १०३. नवार १०४. मस्का १०५. जपा १०६. मुंगळा १०७. कुटीर १०८. जठर १०९. साईल

**उभे शब्द :** १. रंगांध २. अवसर ३. राबता ४. वीर ६. हमखास ७. हेर ८. कंठी ९. नीलिमा १०. चापट ११. कढी १४. डहाळी १६. गणेश १७. मिष्ट २०. रिकामा २२. तत्सम २३. पत २४. आवड २७. बाणा २८. अन्न २९. राजसूय ३१. धरणे ३२. रोख ३३. संयत ३५. रणांगण ३६. सहारा ३७. इमान ३९. तलाव ४०. डबर ४१. तर ४४. रमणीय ४६. कचरा ४७. जंगजंग ४८. लकब ४९. जहर ५१. साम्य ५२. कालिया ५५. गदा ५६. पर ५७. गगन ५९. हबेलहंडी ६०. आकाश मोगरा ६१. ताडन ६२. महालय ६३. सुज्ञ ६५. वनराज ६६. वासव ६८. मफलर ६९. जटा ७१. तडा ७३. मलम ७४. सवाई ७७. घण ८१. वध ८२. रांधण ८३. शेंदाड शिपाई ८५. नशीब ८८. रविवार ८९. बंपर ९०. दार ९०अ. बाणेदार ९२. दंग ९४. नमस्कार ९६. खांदा ९७. सापळा ९८. रंक ९९. शिवार १०१. जाड १०२. भंग १०३. नटी १०४. मठ १०५. जसा

# फोडाफोडी, १० लाखांचा पाऊस, फसवणूक! राजकारणाचा चिखल

पान १ वरून

पाठिंबा देतो म्हटले नव्हते', अशी सूचक प्रतिक्रिया गोकुळ गीते यांनी दिली. महत्त्वाची बाब म्हणजे गीते विजयी होताच एकनाथ शिंदे यांनी वेगळीच चाल खेळली. त्यांनी गीतेंना तातडीने मुंबईला बोलावून घेतले. त्यांच्यासाठी खास विमानही पाठवले. एवढेच नव्हे तर शिवसेनेचे गीते यांना सहयोगी सदस्यही बनवले. शिंदे यांच्या नंदनवन निवासस्थानी एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन चर्चा केल्यानंतर गोकुळ गिते म्हणाले की, हे मी पहिल्यापासून सांगत आलो आहे की, माझे भाऊ आणि वहिनी भाजपासाठी काम करतात. मात्र मी भाजपाचा सक्रिय सदस्य नाही. कार्यकर्त्यांच्या आग्रह आणि दबावामुळे मी ही निवडणूक लढवली. मला एकनाथ शिंदे यांच्यासोबत भविष्यात काम करायचे आहे. त्यामुळे मी शिवसेनेचा सहयोगी सदस्य राहणार आहे.

या निकालावर गिरीश महाजन म्हणाले की, नाशिकचा निकाल आमच्यासाठी धक्कादायक आहे. आम्ही खूप प्रयत्न केले. जळगावला निवडणूक असताना मी एकही दिवस तिथे गेलो नाही. फक्त मतदानाच्या चार पाच दिवसांपूर्वी सर्व मतदारांसोबत एक सभा घेतलेली होती. त्यानंतर मी नाशिकमध्ये होतो. नाशिकमध्ये मी पूर्ण वेळ बूथवर होतो, तरीही मतदारांनी आमच्या बाजूने कौल दिला नाही. नाशिकमध्ये ६२० पैकी पावणे पाचशे मते महायुतीची होती. तरीसुद्धा इतकी कमी मते पडली याचे कारण शोधण्याची आवश्यकता आहे. आता मी एकनाथ शिंदेंशी जाऊन बोलणार आहे.

नाशिकचा निकाल वगळता राज्यात इतर सगळ्या मतदारसंघात महायुतीने बाजी मारली. मविआचा अक्षरशः दारुण पराभव झाला. राज्याचे लक्ष लागलेल्या सांगली-सातारा मतदारसंघात भाजपाचे धैर्यशील कदम यांनी शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे मविआचे उमेदवार अभयसिंह जगताप यांचा ३०१ मतांनी पराभव केला. हा निकाल राष्ट्रवादीचे नेते जयंत पाटील यांच्या राजकारणासाठी मोठा धक्का मानला जातो. तर धाराशिव-बीड-लातूर मतदारसंघात भाजपाचे बसवराज पाटील यांनी काँग्रेसचे महेश देशमुख यांचा ७२१ मतांनी पराभव करत राज्यात सर्वाधिक मताधिक्क्याचा विक्रम केला.

धाराशिवमध्ये मतमोजणी होण्याआधीच भाजपाच्या विजयाचे बॅनर झळकल्याने राजकीय वातावरण चांगलेच तापले होते. येथे भाजपाचे बसवराज पाटील यांचा विजय झाला. त्यांना ८४५ तर काँग्रेसचे महेश देशमुख यांना १२४ मते मिळाली.

नागपूर मतदारसंघात भाजपाचे राजीव पोतदार तब्बल ६८२ मते मिळवून विजयी झाले. तर काँग्रेसचे अतुल लोंढे यांना केवळ १३० मते मिळाली. येथे काँग्रेसची स्वतःची १७० मते होती. तर मविआचे एकत्रित संख्याबळ २११ होते. तरीही लोंढे यांना १३० मते मिळाल्याने काँग्रेस आणि मित्रपक्षांची मते फुटल्याचे स्पष्ट झाले. निकालानंतर माध्यमांशी बोलताना लोंढे यांनी भाजपावर हल्लाबोल केला. भाजपाने प्रत्येक मताला १०-१० लाख रुपये देऊन १०० मते वळवली, असा आरोप करत आपला पराभव झाला असला तरी नैतिक विजय झाल्याचा दावा लोंढे यांनी केला. ते म्हणाले की, मी निवडणूक हरलो असलो तरी नैतिकदृष्ट्या जिंकलो आहे. भाजपाचा दबाव आणि दादागिरीसमोर हिंमतीने उभा राहिलो. निवडणूक बिनविरोध होऊ दिली नाही. मला मिळालेली १३० मते ही विकली न गेलेल्या काँग्रेस आणि मविआतील मित्रपक्षांची आहे, हे या निकालातून सिध्द झाले.

छत्रपती संभाजीनगर-जालना मतदारसंघात महायुती विरूद्ध मविआ अशी थेट लढत होती. इथे मविआचे उबाठाचे उमेदवार गणेश लोखंडे यांचा भाजपाच्या सुहास शिरसाठ यांनी पराभव केला. मविआकडे संख्याबळ कमी असल्याने विजय महायुतीचा होईल, अशीच अपेक्षा होती. मात्र उबाठा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचा ही निवडणूक बिनविरोध होऊ नये असा आग्रह होता. निकालानंतर पराभूत उमेदवार लोखंडे यांनी उद्धव ठाकरेंचा शब्द पाळून निवडणूक लढवल्याबद्दल समाधान व्यक्त केले. ते म्हणाले की, मविआकडे संख्याबळ कमी होते याची आम्हाला जाणीव होती. परंतु पक्षप्रमुखांना ही निवडणूक बिनविरोध होऊ द्यायची नव्हती. म्हणून मी लढलो. पराभूत झाल्याबद्दल मला खंत नाही.

### १७ पैकी १६ जागा महायुतीने जिंकल्या

या निवडणुकीत महायुतीने ठाणे (रवींद्र फाटक - शिवसेना), यवतमाळ (दुष्यंत चतुर्वेदी - शिवसेना), रायगड - रत्नागिरी - सिंधुदुर्ग (अनिकेत तटकरे - राष्ट्रवादी काँग्रेस), पुणे (विक्रम काकडे - राष्ट्रवादी काँग्रेस) वर्धा - गडचिरोली - चंद्रपूर (अरुण लखाणी - भाजपा), अहिल्यानगर (प्राजक्त तनपुरे - भाजपा) या सहा जागा बिनविरोध जिंकल्या आहेत. आजच्या निकालानंतर एकूण १७ पैकी १६ जागी महायुतीचा विजय झाला आहे. त्यात सर्वाधिक ११ जागा भाजपाला मिळाल्या आहेत. तर शिवसेनेला ३ आणि राष्ट्रवादी काँग्रेसला फक्त २ जागा मिळाली आहे.

पण आमच्यामुळे भाजपाला विजयासाठी बरेच प्रयत्न करावे लागले. सुरुवातीला भाजपाच्या बड्या नेत्यांना वाटत होते की ही निवडणूक सहज जिंकू. म्हणून ते सुरुवातीला मतदारांना भेटतही नव्हते. परंतु आम्ही प्रत्येक मतदाराशी थेट संपर्क करत आहोत हे पाहून भाजपा नेते जागे झाले. त्यांना प्रत्येक मतदाराच्या घरी जाणे भाग पडले. मतांसाठी घोडेबाजारही करावा लागला. एवढे केल्यावर त्यांचा उमेदवार विजयी झाला खरा. परंतु मला मविआच्या एकूण संख्याबळापेक्षा १५ मते जास्त मिळाली. मविआकडे ११९ मते होती आणि मला १३४ मते मिळाली. याचा अर्थ भाजपाची १५ मते मला मिळाली. हे मतदार भाजपावर नाराज आहेत, हे यावरून स्पष्ट झाले.

अमरावतीत भाजपाच्या प्रवीण पोटे यांनी सलग तिसऱ्यांदा विजय मिळवत हॅटट्रिक साधली. दुसरीकडे काँग्रेसचे उमेदवार हर्षजीत देशमुख यांना एकही मत मिळाले नाही. एकतर्फी झालेल्या या निवडणुकीत पोटे यांनी वंचित बहुजन आघाडीचे निलेश विश्वकर्मा यांच्या ३५९ मतांनी पराभव केला. अमरावतीत काँग्रेसने नगरसेवकांसाठी तटस्थ राहण्याचा व्हिप काढला असूनही काही मतदारांनी तो धुडकावून मतदानात सहभाग घेतला होता. नांदेडमध्ये भाजपाचे उमेदवार अमरनाथ राजुरकर विजयी झाले. सोलापूरमध्ये भाजपाचे राजेंद्र राऊत, परभणी-हिंगोली मतदारसंघातून अपेक्षेप्रमाणे महायुतीचे सईद खान (शिंदे गट) २४२ मतांसह विजयी झाले. मात्र येथे महायुतीकडे तीन पक्षांची मिळून ३०० हून अधिक मते असूनही सईद खान यांना फक्त २४२ मते मिळाल्याने महायुतीची ५६ मते फुटल्याचे स्पष्ट झाले. विशेषतः सईद खान यांच्या उमेदवारीवरून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात नाराजी होती. ती मतदानातून बाहेर पडली, अशी चर्चा आहे. संख्याबळाच्या दृष्टीने येथे अजित पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा १३१ जागांसह महायुतीतील सर्वात मोठा पक्ष होता. त्यामुळे ही जागा राष्ट्रवादीला मिळावी, यासाठी आमदार राजेश विटेकर व अन्य स्थानिक नेत्यांनी बरेच प्रयत्न केले होते. मात्र २०१८ मध्ये ही जागा शिंदेंच्या शिवसेनेकडे असल्याने एकनाथ शिंदे यांनी या जागेसाठी आग्रह धरला. जालना-छत्रपती संभाजीनगर मतदारसंघाची जागा भाजपाला दिल्यामुळे शिंदे यांच्या परभणीवरील दाव्याला मान्यता देण्यात आली. त्यामुळे अल्पसंख्याक चेहऱ्याला उमेदवारी देण्याच्या भूमिकेतून शिंदेंनी सईद खान यांना उमेदवारी दिली होती. गेली काही वर्षे परभणी जिल्ह्यात सईद खान यांनी शिवसेनेची संघटनात्मक ताकद वाढवण्यात मोठे योगदान दिले.

पाथरी नगरपरिषदेत शरद पवार गटाचे माजी आमदार बाबाजानी दुर्रानी यांच्या ३५ वर्षांच्या सत्तेला सुरुंग लावत त्यांनी सत्ता मिळवून दिली होती. याचे बक्षीस म्हणून सईद खान यांना उमेदवारी देण्यात आली. जळगाव स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणुकीत महायुतीचे अधिकृत उमेदवार नंदकिशोर महाजन यांनी ५७७ मताधिक्य मिळवून दणदणीत विजय संपादन केला. मविआचे शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार शरद तायडे यांना फक्त १७ मते मिळाली.

**TENDER NOTICE**

**NEW COMAT TOWER CHSL**

Situated at MIRA-BHAYANDER ROAD, NEAR BHARTI PARK, MIRA ROAD (E), DIST-THANE- 401107

**Sealed Item Rate Tender are Invited for Repair and Painting Work.**

Tender can be collected from Consultant Office

From: **23/06/2026 up to 30/06/2026**

Between 11.00 Am To 5.00 Pm

Date of Submission on **02/07/2026** (up to 5.00 PM)

**at NEW COMAT TOWER CHSL Society Office.**

(Refer Address from above)

Note: Only Sealed Tender Package will be accepted

STAR ASSOCIATES PMC PVT. LTD. ----Consulting Engineers----

Office Address - B.O.Shop No.2, Bldg.No.6, A-Wing, Green Park, Near Gokul Village, Mira Road (East) Tel. Office. 98208 18155

**Tender Cost Rs. 2,500/- (Non-Refundable)**

# सहाही खासदार उपस्थित! शिंदे सेनेत जाहीर प्रवेश

पान १ वरून

की, शिवसेना हा एक परिवार आहे. या परिवारात कट्टर शिवसैनिक खासदार सहभागी झाले आहेत. आता आमच्याकडे चार संजय आहेत. चार वर्षापूर्वी २२ जून २०२२ रोजी शिवसेनेत उठाव झाला. तो उठाव पक्ष वाचण्यासाठी, बाळासाहेबांचे विचार वाचवण्यासाठी उठाव झाला. आपला लढा कट्टर हिंदुत्ववादी विचार जपण्याचा आहे. शिंदे पुढे म्हणाले की, संजय जाधव हे ग्रासरूटला काम करतात. हा जनतेशी घट्ट नाळ जपणारा खासदार आहे. संजय दिना पाटील हे बेधडक आहेत. दोस्ती यारी साठी उत्तम आहेत. संजय पाटील हे दिनांचा कैवारी आहे. ओम राजे हे मनाचे राजे आहेत. हे खासदार स्वार्थासाठी आलेले नाहीत तर मतदारसंघातील जनतेला न्याय देण्यासाठी आले आहेत. शिवसेना ठाण्यापुरती मर्यादित असल्याचे म्हणत होते. पण शिवसेना चांदा ते बांदापर्यंत पोहोचली आहे. ६० आमदार निवडून आले आहेत. ही शिवसेना शब्द पाळणारी आहे. शिवसेना बळकट होत आहे. हा मतदारांचा. कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. इथे कोणी मालक नाही. इथे एका परिवारातील म्हणून प्रश्न सोडवले जातात. कोणी म्हणतात त्यांना तुडवा, तर मला सांगायचे आहे की बाळासाहेबांनी आम्हाला सांगितले आहे की, कोणी आडवे आले तर शिंगावर घ्या. एकनाथ शिंदे तुमच्यासोबत कार्यकर्ता म्हणूनच वागेल. तुमच्यासोबत असलेल्या कार्यकर्त्यांचा मान-सन्मान राखला जाईल. पुढच्या काळात जे विकासासाठी आवश्यक आहे. ते देण्यासाठी हे डबल इंजिनचे सरकार आहे. आपली कामे होतील आणि अडचणी सुटतील. आपल्या विश्वासाला कदापिही तडा मी जाऊ देणार नाही. या खासदारांना २०२९ मध्ये शिवसेनेच्या तिकिटावरच निवडून आणेन.

**PUBLIC NOTICE**

**CASABLANCA SHIPPING PRIVATE LIMITED.**

This is to inform all concerned that the RPSL Licence No. MUM-394 of Casablanca Shipping Private Limited is presently non-operational due to compliance-related issues. Accordingly, no person or entity is authorised to use or represent the Company's RPSL for any recruitment, placement, or seafarer-related activities until further notice.

Further, the Company's office is currently being shifted and the existing office shall remain non-functional during this period. The new office address and updated contact details will be notified separately. The Company shall not be responsible for any unauthorised use of its RPSL or any representations made by any third party.

Place: Andheri
Date: 22/06/2026

ManjitSing Jolly
Sd/-
Advocate, High Court
154, Citi Mall, New Link Road,
Andheri (West), Mumbai – 400053
98197 70623/ 9820174463
Chandrakanta950@gmail.com

### आई सुरक्षा रक्षकाचे पाय पकडते

नीट- युजी पुनर्परीक्षेसाठी उशिरा पोहोचलेल्या आपल्या मुलीला परीक्षा केंद्रात प्रवेश मिळावा यासाठी एक महिला सुरक्षा रक्षकांच्या पाय पकडून विनवणी करत असल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. व्हिडिओमध्ये संबंधित महिला सुरक्षा कर्मचाऱ्यांना वारंवार विनंती करताना दिसते. मात्र, नियमांनुसार ठरलेल्या वेळेनंतर कोणत्याही उमेदवाराला परीक्षा केंद्रात प्रवेश देता येत नसल्याने रक्षकांनी तिला प्रवेश देण्यास नकार दिला. राष्ट्रीय परीक्षा संस्थेने पुनर्परीक्षेसाठी जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांमध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे की, प्रवेशपत्रावर दिलेल्या रिपोर्टिंग वेळेनंतर कोणत्याही उमेदवाराला परीक्षा केंद्रात प्रवेश दिला जाणार नाही. या घटनेचा व्हिडिओ समोर आल्यानंतर सोशल मीडियावर विविध प्रतिक्रिया उमटत आहेत. काहींनी आईच्या असहायतेबद्दल सहानुभूती व्यक्त केली, तर काहींनी परीक्षेच्या नियमांचे काटेकोर पालन आवश्यक असल्याचे मत मांडले.

# नीट परीक्षेत 'मुन्नाभाई एमबीबीएस' डमी विद्यार्थ्यांना पेपरला बसवले

पान १ वरून

बायोमेट्रिक कंपनीचा कर्मचारी असल्याचे भासवून हसनपूर हायस्कूल परीक्षा केंद्रात प्रवेश करताना आढळला. तपासादरम्यान सर्वप्रथम त्यालाच पकडण्यात आले. त्यानंतर पोलिसांनी लखीसरायमधील केआरके हायर सेकंडरी स्कूल आणि केंद्रीय विद्यालय येथे छापे टाकले. या कारवाईत सात उमेदवारांसह अनेक संशयितांना अटक करण्यात आली. तपास अधिकाऱ्यांच्या मते, परीक्षा प्रक्रियेत आतल्या लोकांच्या मदतीने खऱ्या उमेदवारांच्या जागी प्रशिक्षित सॉल्व्हर बसवण्याचा कट रचला गेला होता.

तपासात वैद्यकीय आणि नर्सिंग क्षेत्रातील विद्यार्थ्यांचा सहभागही उघड झाला आहे. बनारस हिंदू युनिव्हर्सिटी मधील नर्सिंग विद्यार्थिनी पूनम कुमारी हिने दुसऱ्या उमेदवाराच्या नावाने परीक्षा दिल्याचा आरोप आहे. तसेच एम्स रायबरेलीचा विद्यार्थी सौरभ झा यालाही अटक करण्यात आली. दिल्लीतील शाहदरा मेडिकल कॉलेजमधील इंटर्न अमन अग्रवाल, तसेच नालंदा मेडिकल कॉलेज अँड हॉस्पिटलचा नर्सिंग विद्यार्थी संजीत आणि त्याचा भाऊ यांनाही अटक करण्यात आली आहे. नीट परीक्षेदरम्यान वैद्यकीय महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना कॅम्पस सोडू नये, असे निर्देश दिले होते. काही महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांवर लक्ष ठेवण्यासाठी सेमिनार आणि क्विझ स्पर्धाही आयोजित केल्या होत्या. तरीही काही विद्यार्थी या उपक्रमांना अनुपस्थित राहिले. मयंक कश्यप आजारी असल्याचे कारण देऊन महाविद्यालयातून बाहेर पडल्याचे आढळले असून, नंतर त्याला लखीसराय येथे अटक करण्यात आली. सध्या बिहार पोलीस या संपूर्ण रॅकेटचा तपास करत असून, यात आणखी कोणाचा सहभाग आहे, परीक्षा प्रक्रियेत कितपत फेरफार झाला आणि या गैरप्रकाराचे जाळे किती मोठे आहे, याचा शोध घेत आहेत.

**TENDER NOTICE**

**POONAM SHRUSHTI C,D,E & F CHSL.**

Situated at Latiff Park, Opp. S.K. Stone, Mira Road (East), Thane – 401 107.

**Sealed Item Rate Tender are Invited for Repair and Painting Work.**

Tender can be collected from Consultant Office

From: **23/06/2026 up to 30/06/2026**

Between 11.00 Am To 5.00 Pm

Date of Submission on **02/07/2026** (up to 5.00 PM)

**at Poonam Shrushti C.D.E. & F Society Office.**

(Refer Address from above)

Note: Only Sealed Tender Package will be accepted

STAR ASSOCIATES PMC PVT. LTD. ----Consulting Engineers----

Office Address - B.O.Shop No.2, Bldg.No.6, A-Wing, Green Park, Near Gokul Village, Mira Road (East) Tel. Office. 98208 18155

**Tender Cost Rs. 5,000/- (Non-Refundable)**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**2nd Call RFx (E-TENDER) NOTICE**

MSETCL invites online bids from reputed and registered contractors of appropriate class with MSETCL. Please visit Mahatransco website **https://srmetender.mahatransco.in** for following work.

| RFx (Tender) No. | Name of work | Estimated cost in Rs. | EMD (Rs.) | Tender fee incl. GST (Rs.) |
|---|---|---|---|---|
| 7000040194 | 2nd Call for Providing Catering Services at Training Centre and ABB residential Camp at Regional Training Centre under HVDC RS (O&M) Circle, Padghe for FY 2026-27. | INR 18,50,000/- (including taxes) | INR 18,500/- | INR 590/- |

| | | |
|---|---|---|
| 1 | Date of download of RFx (e tender) documents | From- 23.06.2026 from 00.00 hrs. to 03.07.2026 up to 10.00 hrs. |
| 2 | Date of submission of RFx (e tender) | 03.07.2026 up to 10.00 hrs. |
| 3 | Date of technical bid opening | 03.07.2026 at 11.00 hrs. (If possible) |
| 4 | Date of commercial bid opening | 03.07.2026 at 13.00 hrs. (If possible) |

**Contact Person: The Executive Engineer (ADM),**
HVDC RS (O&M) Circle, Padghe, Mob. No: 9011021483
For further details visit our website: **https://srmetender.mahatransco.in**

Sd/-
Superintending Engineer
HVDC RS O&M Circle, Padghe

नवा काळ

• मुंबई। मंगळवार २३ जून, २०२६ • पान -८

# ब्रिटनचे पंतप्रधान स्टार्मर यांचा अखेर राजीनामा



**लंडन -** एकापाठोपाठ एक उघड होत चाललेल्या घोटाळ्यांमुळे अडचणीत आलेले आणि अनेकदा निर्णय घेऊन नंतर मागे घेण्यामुळे टीकेचे धनी ठरलेले ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांनी अखेर आज आपल्या पदाचा राजीनामा दिला. स्टार्मर राजीनामा देतील, असे वृत्त कालच माध्यमांमध्ये प्रसिद्ध झाले होते. स्टार्मर यांच्या राजीनाम्यामुळे मागील दहा वर्षांच्या कालावधीत ब्रिटनला ७ वा पंतप्रधान मिळणार आहे. २०२४ च्या सार्वत्रिक निवडणुकीत स्टार्मर यांच्या नेतृत्वाखाली मजूर पक्षाला दणदणीत विजय मिळाला होता. नव्या पंतप्रधानांना मी मनात कोणताही किंतु परंतु न ठेवता पाठिंबा देईन आणि सत्तेचे हस्तांतरण अत्यंत सुरळीत व्हावे, यासाठी प्रयत्न करेन, असे स्टार्मर यांनी पंतप्रधानपदाचा राजीनामा दिल्यानंतर माध्यमांशी बोलताना सांगितले.

# इतरांची जबाबदारी समजून घ्या

**एका दिवशी पत्नीने सहजपणे सांगितले, ऐका, मी माझ्या एका मैत्रिणीसोबत थोडा वेळ बाहेर जात आहे. पती फोन पाहत होते. त्यांनी फक्त वर पाहिले आणि शांतपणे म्हणाले,**

**ठीक आहे. मजा करून या. पत्नीला थोडं आश्चर्य वाटलं.... कारण नेहमी ते विचारायचे - जाणं आवश्यक आहे का...? उशीर करू नकोस. खरंच जायचं आहे का? पण त्या दिवशी काहीच नाही. ना उसासा, ना प्रश्न - फक्त शांतपणे, ठीक आहे.**

**काही** तासांनी त्यांचा किशोरवयीन मुलगा स्वयंपाकघरात आला. हातात एक कागद होता आणि चेहरा उतरलेला होता.

बाबा, तो हळू आवाजात म्हणाला,

माझ्या मॉक परीक्षेचे निकाल आले आणि ते खूप खराब आले आहेत. तो घाबरत उभा राहिला. त्याला वाटलं, नेहमीप्रमाणे आता ओरडा मिळेल. बाबा नेहमी अभ्यासाबद्दल काळजी करायचे, त्यामुळे त्याने मोठ्या भाषणाची तयारी करून ठेवली होती. पण त्याऐवजी वडील शांतपणे म्हणाले,

ठीक आहे.

मुलगा आश्चर्याने म्हणाला,

फक्त ठीक आहे?

हो, वडील हळुवारपणे म्हणाले.

जास्त अभ्यास केलास तर पुढे चांगले गुण मिळतील. नाही केलास तर कदाचित सेमिस्टर पुन्हा करावं लागेल. तो तुझा निर्णय आहे. दोन्ही परिस्थितीत मी तुझ्यासोबत आहे.

मुलगा थक्क झाला. बाबा इतके शांत कधी झाले?

दुसऱ्या दिवशी दुपारी त्यांची मुलगी घाबरत आली. हॉलमध्ये उभी राहून म्हणाली,

बाबा माझ्याकडून गाडी धडकली. खूप मोठं नाही, पण डेंट पडला आहे.

वडिलांनी ना ओरडलं, ना राग व्यक्त केला. त्यांनी फक्त इतकंच म्हटलं,

ठीक आहे. उद्या गाडी वर्कशॉपमध्ये घेऊन जा.

मुलगी चकित झाली.

तुम्हाला राग आला नाही?

त्यांनी हलकंसं हसत म्हटलं,

नाही. राग केल्याने गाडी दुरुस्त होणार नाही.......

पुढच्या वेळी काळजी घे.


आता घरच्यांना काळजी वाटू लागली. हा माणूस - तोच नवरा, तोच बाबा - आता आधीसारखा राहिला नव्हता. तो आधी पटकन रागावणारा, तणावात राहणारा आणि लगेच प्रतिक्रिया देणारा होता. आता मात्र तो शांत, स्थिर आणि आतून समाधानी वाटत होता.

सगळे कुजबुजू लागले - काहीतरी बिनसलं आहे का? त्यांची तब्येत ठीक आहे ना? काही घडलं आहे का?

शेवटी त्या संध्याकाळी सगळे स्वयंपाकघरातील टेबलाजवळ बसले.

पत्नी म्हणाली,

ऐका, तुम्ही आजकाल खूप बदललात. काहीही झालं तरी तुम्ही रागावत नाही किंवा प्रतिक्रिया देत नाही. सगळं ठीक आहे ना?



त्यांनी सगळ्यांच्या चेहऱ्याकडे पाहिलं आणि स्मितहास्य केलं.

काहीच चुकीचं नाही, ते म्हणाले. सगळं अगदी ठीक आहे. मला फक्त एक गोष्ट समजली आहे.

सगळे शांत झाले.

ते म्हणाले,

खूप वर्षांनी मला समजलं की ; प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या आयुष्यासाठी स्वतःच जबाबदार असतो.

पत्नीने विचारलं,

म्हणजे?

त्यांनी हात जोडत म्हटलं,

पूर्वी मी प्रत्येक गोष्टीची काळजी करायचो. तुम्ही उशिरा आलात तर चिंता, मुलांना कमी गुण मिळाले तर अपराधीपणा, काही तुटलं तर राग, कुणी दुःखी असेल तर ते ठीक करण्याचा प्रयत्न मी सगळ्यांच्या समस्या माझ्या समस्या मानत होतो.... ....पण एक दिवस मला समजलं.... - माझी चिंता त्यांच्या समस्या सोडवत नाही. ती फक्त माझी शांतता हिरावून घेते.

मुलगी शांतपणे ऐकत होती.

ते पुढे म्हणाले,

माझा तणाव तुमचं भलं करत नाही. माझ्या झगड्यामुळे तुमचं आयुष्य सोपं होत नाही - फक्त माझं आयुष्य कठीण होतं. मी तुम्हाला सल्ला, प्रेम आणि आधार देऊ शकतो. पण तुमचं आयुष्य मी तुमच्या जागी जगू शकत नाही. तुमच्या निर्णयांचे परिणाम - चांगले असोत किंवा वाईट - तुम्हालाच भोगावे लागतील.

क्षणभर थांबून ते पुन्हा हसले.

म्हणून मी ठरवलं की; जे माझ्या नियंत्रणात नाही, ते नियंत्रित करण्याचा प्रयत्न आता करणार नाही.

मुलगा पुढे झुकून म्हणाला,

म्हणजे आता तुम्हाला आमची काळजी नाही..?

त्यांनी उत्तर दिलं.....,

अर्थात आहे. पण काळजी करणे आणि नियंत्रण ठेवणे - या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. मी तुम्हाला प्रेम करू शकतो, तुमचं पालनपोषण करू शकतो- पण माझी शांतता गमावून नाही.

खोलीत शांतता पसरली.

त्यांनी तिघांकडे प्रेमाने पाहिलं आणि म्हणाले,

माझी भूमिका म्हणजे तुम्हाला प्रेम देणं, मार्गदर्शन करणं, गरजा पूर्ण करणं आणि गरज पडली तर तुमच्यासोबत उभं राहणं. पण तुमची भूमिका म्हणजे तुमचं आयुष्य स्वतः सांभाळणं. निर्णय घेणं. त्यांचे परिणाम स्वीकारणं. अशानेच माणूस घडतो.

ते शांतपणे पुढे म्हणाले,

आता जेव्हा काही चुकीचं घडतं, तेव्हा मी स्वतःला आठवण करून देतो - हे मला दुरुस्त करायचं नाही. मी शांत राहीन आणि विश्वास ठेवीन की तुम्ही त्यातून शिकाल. कारण जीवन असंच शिकवतं.

काही क्षण घरात पूर्ण शांतता होती. पण वातावरणात काहीतरी बदललं होतं.

पत्नीने त्यांचा हात धरून म्हटलं,

आज तुम्ही आम्हा सगळ्यांना काहीतरी महत्त्वाचं शिकवलं.

ते हसून म्हणाले,

कदाचित. पण आधी मला स्वतः ला ते शिकावं लागलं.

त्या रात्री प्रत्येकाने त्यांच्या शब्दांवर विचार केला.

मुलगा पुन्हा अभ्यासाला बसला - बाबांच्या ओरडण्यामुळे नाही, तर आता त्याला समजलं होतं की ; जबाबदारी त्याची स्वतःची आहे.

मुलीने स्वतः गाडी दुरुस्त करण्याची जबाबदारी घेतली आणि इन्शुरन्स प्रक्रियेबद्दल जाणून घेण्यास सुरुवात केली.

पत्नीनेही घर अधिक समजूतदारपणे सांभाळायला सुरुवात केली - कारण आता ती मजबुरी नव्हती,

तर स्वतःची जाणीव होती.

हळूहळू घर हलकं आणि शांत वाटू लागलं.

आता कोणीही भीतीमुळे काम करत नव्हतं, तर समजुतीमुळे करत होतं. कुणालाही ओरडण्याच्या भीतीने दडपण वाटत नव्हतं.

कारण जेव्हा घरात एक व्यक्ती शांतता निवडते, तेव्हा

ती शांतता हळूहळू सगळ्यांमध्ये पसरू लागते.

जेव्हा एक व्यक्ती नियंत्रण सोडते, तेव्हा इतर लोक स्वतःला नियंत्रित करायला शिकतात.

आणि अशाप्रकारे - शांतताही प्रेमासारखीच पसरते.

राग, दबाव किंवा अधिकाराने इतरांना नियंत्रित करण्याचा प्रयत्न करू नका....

त्याऐवजी स्वतः जबाबदारीने वागा आणि इतरांना त्यांच्या जबाबदाऱ्या समजून घेण्यास मदत करा. •••

# एसटी कर्मचाऱ्यांना वेतनासह महागाई, घरभाडे भत्तावाढ



■ मुंबई

**राज्य** परिवहन (एसटी) कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांवर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक आणि कृति समिती यांच्यात आज झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत तीन मोठे निर्णय घेण्यात आले. २०१६ ते २०२० च्या कालावधीतील एक टक्का वेतनवाढीचा फरक, वाढीव महागाई भत्ता आणि वाढीव घरभाडे भत्त्याचा त्यात समावेश आहे. कृति समितीने हे 'मोठे यश' असल्याचे म्हटले आहे.

कृति समितीच्या माहितीनुसार, बैठकीत सर्वप्रथम वार्षिक वेतनवाढीचा दर पुन्हा ३ टक्के करण्याचा निर्णय घेण्यात आला. यापूर्वी हा दर एकतर्फी २ टक्क्यांवर आणण्यात आला होता. याशिवाय महागाई भत्ता (डीए) ५८ टक्के कायम ठेवत येणार आहे. यापूर्वी ८, १६ आणि २४ टक्क्यांवर घरभाडे भत्ता वाढवून आता १०, २० आणि ३० टक्के करण्यास मान्यता देण्यात आली आहे. ही वाढ जुलै-ऑगस्ट महिन्यापासून लागू होणार आहे. या सर्व निर्णयांमुळे एसटी महामंडळावर दरमहा सुमारे ४४.६६ कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार पडणार आहे. यामध्ये महागाई भत्त्यासाठी सुमारे १३.२० कोटी, घरभाडे भत्त्यासाठी ४.४० कोटी आणि वेतनवाढीसाठी सुमारे २७.६ कोटी रुपयांचा समावेश आहे. या निर्णयांमुळे चालक, वाहक, कार्यशाळा कर्मचारी आणि लिपिक वर्गाला थेट आर्थिक फायदा होणार आहे.

एका टक्क्याच्या वाढीमुळे चालकांच्या मूळ वेतनात सुमारे १,००० रुपयांची वाढ होणार असून, एकूण फरकाची रक्कम जवळपास ९८ हजार रुपये इतकी मिळू शकते.

# विराट कोहलीचा शूज ब्रँड लाँच किंमत कसोटी धावसंख्येइतकी

■ मुंबई

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा



**भारतीय** क्रिकेटचा सुपरस्टार विराट कोहली याने हॉटेल व्यवसायानंतर उद्योग क्षेत्रात दमदार पाऊल टाकत स्वतःचा शूज आणि कपड्याचा ब्रँड लाँच केला. मात्र या नव्या ब्रँडपेक्षा अधिक चर्चा त्याच्या शूजच्या किमतीची होत आहे. त्याने आपल्या ब्रँडच्या विशेष आवृत्तीच्या शूजची किंमत आपल्या कसोटी कारकिर्दीतील धावसंख्येइतकीच म्हणजे ९,२३० रुपये ठेवली आहे. या कार्यक्रमात त्याला पुन्हा पांढऱ्या जर्सीत भारतीय संघासाठी खेळण्याबाबत प्रश्न विचारला, तेव्हा त्यावर मिश्कील उत्तर देत, विराटने म्हटले की, नव्या शूजची विक्री कमी झाली तरी चालेल, पण कसोटी निवृत्तीचा निर्णय बदलणार नाही.

# ओएनजीसी ऑइल अँड गॅस आता गॅस अँड ऑइल कंपनी

**नवी दिल्ली -** ऑइल अँड नॅचरल गॅस कॉर्पोरेशन (ओएनजीसी) आता स्वतः कडे 'ऑइल अँड गॅस' कंपनी म्हणून पाहात आहे. कारण ती आता तेलापेक्षा नैसर्गिक वायूचे अधिक उत्पादन करत आहे, असे वक्तव्य कंपनीचे अध्यक्ष अरुणकुमार सिंह यांनी केले आहे. सिंह म्हणाले की, खनिज तेलाच्या तुलनेत नैसर्गिक वायूचे उत्पादन अधिक वेगाने वाढत आहे. त्यामुळे कंपनीच्या एकूण पोर्टफोलिओमध्ये गॅसचे प्रमाण आता तेलापेक्षा अधिक झाले आहे. या पार्श्वभूमीवर ओएनजीसीच्या धोरणात महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे. मोठे नवीन तेलसाठे सापडत नाहीत कच्च्या तेलाचे उत्पादन साधारण स्थिर राहण्याची शक्यता आहे.

# नार्वेकर कोण लागून गेले? जाधवांवर नार्वेकर नाराज

■ मुंबई

**खासदारांच्या** फुटीमुळे उबाठाला मोठा धक्का बसलेला असतानाच दुसऱ्या बाजूला नेत्यांमधील नाराजी आणि शाब्दिक चकमकीमुळे अंतर्गत वादही उफाळून आला आहे. आमदार भास्कर जाधव यांनी नार्वेकर कोण लागून गेले? असे वक्तव्य केल्याचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर नाराज झालेले उबाठाचेच दुसरे आमदार मिलिंद नार्वेकर यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उद्देशून एक पोस्ट करत भास्कर जाधव यांची विरोधी पक्षनेतेपदी नियुक्ती लवकर व्हावी. त्याचा आम्हाला मानसिक त्रास होतो, अशी खोचक टिपण्णी केली. त्यानंतर भास्कर जाधव यांनी सारवासारव करत हा सर्व प्रकार गैरसमजातून घडल्याचे सांगत मिलिंद नार्वेकर हे आपले मित्र असल्याचे सांगितले.

उबाठा पक्षाच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात आमदार भास्कर जाधव माध्यमांशी संवाद साधत होते. त्यावेळी मागून एका वाहनाचा हॉर्न वारंवार वाजत होता. गर्दीमुळे वाहनाला पुढे जाण्यास अडथळा येत असल्याने हा हॉर्न वाजवला जात होता. यावेळी भास्कर जाधव यांनी कोणाची गाडी? अशी विचारणा केली. त्यावर उपस्थितांनी नार्वेकरांची गाडी असे सांगितले. त्यानंतर जाधव यांनी सहजपणे नार्वेकर कोण लागून गेले? अशी प्रतिक्रिया दिली.

# सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांची तीन वर्षांसाठी पुनर्नियुक्ती

■ नवी दिल्ली



**केंद्रीय** मंत्रिमंडळाच्या समितीने ज्येष्ठ वकील तुषार मेहता यांची भारताचे सॉलिसिटर जनरल म्हणून आणखी तीन वर्षांसाठी पुनर्नियुक्ती मंजूर केली आहे. तसेच सर्वोच्च न्यायालयातील पाच अतिरिक्त सॉलिसिटर जनरल आणि दिल्ली उच्च न्यायालयासाठी ज्येष्ठ वकील चेतन शर्मा यांच्या नियुक्तीलाही मंजुरी देण्यात आली आहे.

२० जून रोजी कार्मिक व प्रशिक्षण विभागाने जारी केलेल्या आदेशानुसार, तुषार मेहता यांचा नवीन कार्यकाळ १ जुलै २०२६ पासून लागू होईल. ही नियुक्ती तीन वर्षांसाठी किंवा पुढील आदेश येईपर्यंत, यापैकी जे आधी होईल त्यानुसार वैध राहील. तुषार मेहता १० ऑक्टोबर २०१८ पासून सॉलिसिटर जनरल पदावर काम करत आहेत.

यापूर्वी त्यांची १ जुलै २०२३ पासून ३० जून २०२६ पर्यंतच्या कालावधीसाठी पुनर्नियुक्ती करण्यात आली होती. या समितीने सर्वोच्च न्यायालयातील पाच अतिरिक्त सॉलिसिटर जनरल यांच्या पुनर्नियुक्तीलाही मंजुरी दिली आहे.

# मतदानाचा अधिकार मूलभूत अधिकार करा! काँग्रेसची मागणी

■ नवी दिल्ली

**मतदानाचा** अधिकार हा मूलभूत अधिकार घोषित करण्याची जोरदार मागणी काँग्रेसने केली आहे. विविध राज्यांमध्ये एसआयआर म्हणजे विशेष सखोल पुनरावलोकन प्रक्रियेदरम्यान मोठ्या प्रमाणावर मतदारांची नावे वगळली जाणे किंवा मनमानी अपात्रता लादली जाण्याच्या घटनांवर अंकुश ठेवण्यासाठी हा महत्त्वाचा उपाय ठरेल, असे पक्षाने म्हटले. काँग्रेसचे नेते जयराम रमेश यांनी सांगितले की, भारत निवडणूक आयोगाच्या कथित पक्षपाती कामकाजामुळे आणि तो पंतप्रधान नरेंद्र मोदी तसेच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या निर्देशानुसार काम करत असल्याच्या आरोपानंतर मतदानाचा अधिकार हा अधिकार करण्याची वेळ आली आहे. त्यामुळे या अधिकाराला न्यायालयीन संरक्षण आणि पुनरावलोकनाची सर्वोच्च पातळी मिळेल.

# अभिनेता पंकज त्रिपाठी यांच्या मोठ्या भावावर कुऱ्हाड हल्ला

■ गोपालगंज

**बॉलिवूड** अभिनेता पंकज त्रिपाठी यांचे बंधू विजेंद्र नाथ तिवारी यांच्यावर गोपालगंजमध्ये कुऱ्हाडीने हल्ला करण्यात आला आहे. या घटनेत ते गंभीर जखमी झाले. त्यांना पुढील उपचारांसाठी पाटणा पीएमसीएच येथे पाठवण्यात आले आहे. ही घटना बरौली पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बेलसंड गावातील आहे.

विजेंद्र नाथ तिवारी रविवारी संध्याकाळी उशिरा त्यांच्या घराबाहेर बसले असताना काही लोकांनी तिथे येऊन अचानक त्यांच्यावर हल्ला केला. हल्ल्यात ते रक्तबंबाळ होऊन तिथेच कोसळले. आजूबाजूचे लोक आणि कुटुंबीय घटनास्थळी पोहोचताच हल्लेखोर पळून गेले. विजेंद्र नाथ तिवारी यांना तत्काळ सदर रुग्णालयाच्या आपत्कालीन विभागात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर डॉक्टरांनी त्यांची प्रकृती पाहून त्यांना पाटणा येथील रुग्णालयात पाठवले. तेथील डॉक्टर ए.के.मिश्रा यांनी सांगितले की, पाठीवर अर्धा इंच, मानेखाली खांद्यावर एक इंच आणि मानेजवळच खांद्यावर अर्धा इंच खोल जखमा आहेत. पालिसांनी प्रकरणाची चौकशी सुरू केली. पोलिसांनी पीडित आणि प्रत्यक्षदर्शींच्या जबाबाच्या आधारे गुन्हा दाखल केला आहे.




# पश्चिम घाट 'संवेदनशील क्षेत्र' म्हणून जाहीर होणार! केंद्राची तयारी सुरू

■ नवी दिल्ली

**पश्चिम** घाटातील पर्यावरण संरक्षणाचा अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला मुद्दा अखेर निकाली लागण्याच्या मार्गावर असून केंद्र सरकारकडून या भागाला पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र म्हणून जाहीर करण्याची तयारी सुरू झाली आहे. सुरुवातीला महाराष्ट्र, गुजरात आणि गोवा या तीन राज्यांतील पश्चिम घाट क्षेत्रांचा यात समावेश होण्याची शक्यता आहे.

इस्रोचे माजी प्रमुख के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखालील समितीने २०१३ साली सादर केलेल्या अहवालात सहा राज्यांमधील सुमारे ५६ हजार चौरस किलोमीटर क्षेत्र संवेदनशील म्हणून घोषित करण्याची शिफारस केली होती.



मात्र, त्यानंतर केवळ प्राथमिक अधिसूचना जारी झाली. तर पुढील कार्यवाही रखडली होती. आता पुन्हा केंद्राने या प्रक्रियेला गती दिली आहे. पश्चिम घाट संवेदनशील क्षेत्र म्हणून जाहीर झाल्यास या भागात खाणकाम, थर्मल पॉवर प्रकल्प, प्रदूषणकारी उद्योग तसेच मोठ्या प्रमाणातील बांधकामांवर बंदी येणार आहे. पर्यावरण संवर्धनासाठी हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. मात्र, या प्रस्तावावर सर्व राज्यांची एकमताने सहमती अद्याप झालेली नाही. केरळ आणि कर्नाटकने अद्याप संपूर्ण सहमती दर्शवलेली नाही.

# सरकारविरोधी पोस्ट करणाऱ्या भारत तिवारी चकमकीची चौकशी

■ पाटणा

**बिहारमधील** भोजपूर जिल्ह्यात सामाजिक कार्यकर्ते भारत तिवारी यांच्या पोलीस चकमकीत झालेल्या मृत्यू प्रकरणाने राज्यात राजकीय वादळ निर्माण झाले. तिवारी सरकारविरोधी पोस्ट आणि जनसामान्यांच्या प्रश्नांवर आवाज उठवणारे म्हणून ओळखले जात. त्यांच्या चकमकीवर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर बिहार सरकारने प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करण्याचे आदेश दिले असून निवृत्त उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या देखरेखीखाली संपूर्ण घटनेचा निष्पक्ष तपास केला जाणार आहे.

दरम्यान, एन्काऊंटर बनावट असल्याचा आरोप करत स्थानिक नागरिकांनी आंदोलन छेडले असून या प्रकरणाची सीबीआय चौकशी करण्याची मागणीही सुरू आहे. पोलिसांनी मात्र स्वसंरक्षणासाठी कारवाई केल्याचा दावा केला असून, या प्रकरणामुळे बिहारच्या राजकारणात आणि प्रशासनात खळबळ उडाली आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, १७ जून रोजी तिवारी गावात पिस्तूल घेऊन फिरत असून सार्वजनिक ठिकाणी गोळीबार करत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानंतर पोलीस आणि एसटीएफचे पथक घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी तिवारी यांना वारंवार शरण येण्याचे आवाहन केले, मात्र त्यांनी पोलिसांवर गोळीबार सुरूच ठेवला. त्यामुळे स्वसंरक्षणासाठी आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी प्रत्युत्तरादाखल गोळीबार केला.